वर्ष ३२, अंक ६६, ५ रुपये, शहर आवृत्ती, वृत्तान्तसह पृष्ठे १२



नागपूर, शुक्रवार, २३ जून २०२३ WWW.LOKSATTA.COM

# लोकसत्ता

नागपूर, मुंबई, पुणे, अहमदनगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती !

**अग्रलेख**

**श्रीमंत सम्राटांची दरिद्री प्रजा!**

सत्ताधारी सम्राट आणि शिक्षणसम्राट यांच्या कात्रीत अडकलेली आपली शिक्षणव्यवस्था पाहिली की आयआयटी, आयआयएम, एनएसडी वगैरे संस्थांचे मोठेपण अधोरेखित होते...



**क्रीडा**

**प्रणॉयचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश**

**तापमान**

कमाल ३८.३°से | किमान २८.७°से

हवामानाचा अंदाज

आकाश निरभ्र राहील.

**काय चाललंय काय!**

प्रशांत कुलकर्णी



उगाच नस्ती आफत नको म्हणून मी स्टेटस 'शून्य' असं ठेवलं, तर पोलिसांनी तेही आक्षेपार्ह ठरवलं! त्यांच्या मते यातून सरकारची कामगिरी दिसते !!

# लोकशाहीत भेदभावाला स्थान नाही !

## देशातील मानवाधिकार उल्लंघनाच्या मुद्द्यावर पंतप्रधानांचे प्रतिपादन

**पीटीआय, वॉशिंग्टन**

**भारत** हा खऱ्या अर्थाने लोकशाही देश असून त्यामध्ये धर्म, जाती, पंथ, वर्ण यावर भेदभावाला कोणतेही स्थान नाही. असा भेदभाव होत असेल, तर त्या देशाला लोकशाही म्हणता येणार नाही, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी केले. 'व्हाइट हाऊस'मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांच्याशी झालेल्या द्वीपक्षीय चर्चेनंतर दोघांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. भारतातील मुस्लिमांवर होणाऱ्या कथित अन्यायासह मानवाधिकार उल्लंघनांबाबत विचारलेल्या प्रश्नाला यावेळी पंतप्रधानांनी उत्तर दिले.



'व्हाइट हाऊस'मधील सुप्रसिद्ध 'ओव्हल ऑफिस'मध्ये पंतप्रधान मोदी आणि बायडेन यांच्यात द्विपक्षीय चर्चा झाली.

'तेजस'च्या इंजिनांसाठी 'जीई'बरोबर करार/२


भारत आणि अमेरिका या दोन्ही देशांच्या नसानसांमध्ये लोकशाही आहे. 'सबका साथ, सबका विकास' या धोरणावर आपल्या सरकारचा विश्वास असून, त्यानुसार समाजातील प्रत्येक घटकाला विकासामध्ये समाविष्ट करून घेतले जाते, असे मोदी म्हणाले. धर्म, वंश, वर्ण, जात, भाषा असा भेदभाव न करता प्रत्येकाला समान संधी दिली जाते, असा दावाही मोदी यांनी केला. लोकशाहीमुळे यश मिळते, हे आपल्या देशाने सिद्ध केले आहे असेही ते म्हणाले. मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यामध्ये मानवाधिकारांचा प्रश्न सातत्याने उपस्थित होत होता. अमेरिकेमध्ये काही भागात या मुद्द्यावर निदर्शनेही सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी प्रथमच जाहीर भाष्य केले आहे.

हिंद-प्रशांत क्षेत्रामध्ये शांतता, स्थैर्य आणि (पान ४ वर)

### ओबामांच्या कानपिचक्या



भारतामध्ये अल्पसंख्याक मुस्लिमांच्या संरक्षणाच्या मुद्द्यावर चर्चा व्हायला हवी, असे मत बायडेन यांचे स्वपक्षीय नेते आणि अमेरिकेचे माजी अध्यक्ष बराक ओबामा यांनी व्यक्त केले. मोदी यांच्याशी चर्चा करताना हा मुद्दाही घ्यावा, असा सल्ला मोदी–बायडेन भेटीपूर्वी 'सीएनएन'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये ओबामा यांनी दिला. ही एक तासाची मुलाखत शुक्रवारी सकाळी प्रसारित होईल. मोदी यांच्याशी भेट झाली असती तर अल्पसंख्याकांच्या हक्कांचा मुद्दा उपस्थित केला असता, असेही ते म्हणाले.




अमुल गर्ल निर्माते, जाहिरात विश्वातील महागुरू सिल्वेस्टर डाकुन्हा यांना विनम्र आदरांजली

### ओबीसींनाही पक्षात पद मिळावे – भुजबळ

**मुंबई :** प्रदेशाध्यक्ष किंवा विरोधी पक्षनेता यापैकी एका पदावर इतर मागासवर्ग समाजातील (ओबीसी) नेत्याला संधी द्यावी आणि भाजप व काँग्रेसप्रमाणेच जातीचे समीकरण साधावे, अशी भूमिका माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी गुरुवारी मांडली. त्यामुळे विरोधी पक्षनेतेपदाच्या जबाबदारीतून मुक्त करून पक्ष संघटनेत पद मिळावे, या अजित पवार यांच्या मागणीमुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये निर्माण झालेला गुंता अधिकच वाढला आहे. – पान ४

### परदेशी शिष्यवृत्ती योजना अर्ज प्रक्रियेस अखेर ५ जुलैपर्यंत मुदतवाढ

**नागपूर :** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती, नवबौद्ध प्रवर्गातील ७५ विद्यार्थ्यांना परदेशामध्ये विशेष अध्ययनासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेंतर्गत शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. मात्र, प्रवेश निश्चिती पत्राअभावी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करताना अनेक विद्यार्थ्यांना अडचण येत असल्याचे वृत्त 'लोकसत्ता'ने प्रकाशित केले होते. याची दखल घेत अखेर सामाजिक न्याय विभागाने अर्जासाठी ५ जुलैपर्यंत मुदतवाढ दिली आहे. -पान ११

### चीनच्या उपाहारगृहातील स्फोटात ३१ जण ठार

**बीजिंग :** ड्रागो नौका उत्सवाच्या पूर्वसंध्येला नैर्ऋत्य चीनमधील एका उपाहारगृहामध्ये स्वयंपाकाच्या गॅसचा स्फोट होऊन किमान ३१ लोक ठार, तर सात जण जखमी झाले. यासंबंधात उपाहारगृहाच्या मालकासह नऊ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

हा स्फोट बुधवारी रात्री यिनचुआनच्या झिनगिंग जिल्ह्यात उपाहारगृहात गॅस सिलिंडरच्या गळतीमुळे झाला, असे वृत्त झिन्हुआ या सरकारी वृत्तसंस्थेने दिले.

### २२ भारतीय मच्छीमारांना अटक

**कोलंबो :** जाफनानजीकच्या डेल्फ्ट बेटांच्या वायव्येला कथितरीत्या श्रीलंकेच्या सागरी हद्दीत मासेमारी केल्याबद्दल श्रीलंकेच्या नौदलाने चार ट्रॉलरवरील २२ भारतीय मच्छीमारांना अटक केली आहे.

# राज्याच्या घशाला कोरड

## ६० धरणांनी तळ गाठला, गतवर्षीच्या तुलनेत ४ टक्के कमी पाणीसाठा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्यात नैर्ऋत्य मोसमी वारे दाखल होण्यास विलंब होत असून पावसाने प्रचंड ओढ दिली आहे. त्यामुळे राज्यातील धरणांतील पाणीसाठा झपाट्याने घटला असून सुमारे ६० धरणांनी पूर्णपणे तळ गाठला आहे. उर्वरित धरणांमधील पाण्याची स्थितीही चिंताजनक आहे. जून महिन्यात राज्यातील सहाही विभागांत असलेल्या धरणांची पाणीपातळी २३ टक्क्यांवर आली असून ती गेल्या वर्षीपेक्षा चार टक्क्यांनी कमी आहे.

जलसंपदा विभागाचे अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोकण, नागपूर, नाशिक आणि पुणे असे सहा प्रादेशिक विभाग आहेत. या विभागांत २९८९ मोठे, तर २५९० मध्यम प्रकल्प आहेत. याखेरीज कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, सिमेंट बंधारे व लहान तलाव आहेत. गेल्या कित्येक वर्षांत मुख्य धरणांच्या क्षेत्रात पावसाळ्यात दमदार पाऊस होत असल्याने आणि जूनमध्ये पावसाला सुरुवात होत असल्याने धरणांमध्ये किमान पाणीसाठा शिल्लक राहतो. मात्र, यंदा बिपरजॉय चक्रीवादळ, बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे पट्टे वेळेवर तयार न होणे, समुद्रात वादळासारखी स्थिती अशा विविध कारणांमुळे केरळमध्ये मोसमी वारे पोहोचण्यास विलंब झाला व त्याची पुढील वाटचालही अडली आहे. वास्तविक जून महिन्याच्या अखेरपर्यंत राज्यात पाऊस सर्वदूर स्थिरावलेला असतो. यंदा वातावरणातील बदलामुळे पाऊस लांबला. त्याचा (पान ४ वर)



नाशिक जिल्ह्यातील गंगापूर धरणात अत्यल्प पाणीसाठा आहे.

### कारणे काय?

- लांबलेला पाऊस
- कडक उन्हाळ्यामुळे पाण्याचे बाष्पीभवन
- पाणीचोरी, गळती
- पाऊस नसल्याने वाढती मागणी

### ६० टक्के नद्या कोरड्या

**नागपूर :** राज्यातील नद्या सध्या मरणासन्न अवस्थेत असल्याचे 'चला जाणू या नदीला' या मोहिमेंतर्गत केलेल्या निरीक्षणात आढळून आले आहे. राज्यातील ६० टक्के नद्या पूर्णपणे कोरड्या पडल्या असून उर्वरित ४० टक्के नद्यांना नाल्याचे स्वरूप आले असल्याची माहिती जलतज्ज्ञ आणि या उपक्रमाचे प्रणेते राजेंद्र सिंग यांनी दिली. - पान २

### नागपुरात अखेर पावसाची वर्दी

उन्हाचा तडाखा सहन करणाऱ्या नागपूर शहरात अखेर मोठ्या पावसाने वर्दी दिली. गुरुवारी रात्री १० नंतर येथे मेघगर्जनेसह पावसाला सुरुवात झाली. भारतीय हवामान खात्याने २३ जूनपासून राज्यातील काही भागात पावसाचा अंदाज वर्तवला होता. त्याच्या एक दिवसाआधीच पाऊस नागपुरात धडकला. मोसमी पावसाचे आगमन लांबल्याने खरीप हंगाम अडचणीत आला होता. परंतु, गुरुवारी आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांनाही मोठा दिलासा मिळाला आहे.

### भाज्यांचे दर कडाडण्याची भीती



**पुणे :** लांबलेला मोसमी पाऊस, सिंचनासाठीच्या पाण्याचा तुटवडा आणि वाढलेल्या तापमानामुळे भाज्यांच्या लागवडीत मोठी घट झाली आहे. खरिपातील सरासरी लागवडीच्या वीस टक्केही लागवड झालेली नाही. त्यामुळे जुलै, ऑगस्ट महिन्यात भाज्यांचा तुटवडा निर्माण होऊन दर कडाडण्याची भीती आहे.

# जबाबदारी सामूहिक, लक्ष्य मात्र जयस्वाल!

## करोना केंद्रांबाबत 'ईडी' कारवाईमुळे अस्वस्थ अधिकाऱ्यांची मुख्य सचिवांकडे धाव

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबईतील करोना केंद्रांमध्ये बाह्यस्त्रोतांद्वारे वैद्यकीय सेवा पुरविण्याचा ठेका देण्यात अनियमितता झाल्याच्या आरोपावरून मुंबई पालिकेचे तत्कालीन अतिरिक्त आयुक्त व म्हाडाचे विद्यमान उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांच्यावर अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) घातलेल्या छाप्यांमुळे नवा वाद निर्माण होण्याची चिन्हे आहेत. करोना केंद्रे चालवण्याच्या कामाचा ठेका देताना मंजुरीची अंतिम मोहोर आयुक्त इक्बालसिंह चहल यांनी उमटवल्याची माहिती आता पुढे येत आहे. मात्र, या प्रकरणात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय असलेल्या जयस्वाल यांच्यावरच कारवाईचा बडगा उगारण्यात आल्याने राजकीय, प्रशासकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त होत असून, अस्वस्थ सनदी अधिकाऱ्यांनी मुख्य सचिवांकडे धाव घेतली.

मुंबई महापालिकेच्या 'जम्बो कोव्हिड सेंटर'मध्ये एक हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप मध्यंतरी भाजपने केला होता. करोनाकाळात या केंद्रांची जबाबदारी (पान ४ वर)

### 'कहीं पे निगाहे, कहीं पे निशाना'?

मुंबई पालिकेचे तत्कालीन अतिरिक्त आयुक्त संजीव जयस्वाल यांच्यावर 'ईडी'ने केलेल्या कारवाईचे सनदी अधिकाऱ्यांच्या वर्तुळात तीव्र पडसाद उमटू लागले आहेत. राजकीय संघर्षातून ठरावीक अधिकाऱ्यांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न होत असल्याबद्दलची नाराजी काही वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांनी मुख्य सचिव मनोज सौनिक यांच्याकडे व्यक्त केल्याचे समजते. करोनाकाळात आवश्यक असलेल्या सामग्रीसाठी तयार करण्यात आलेल्या केंद्रीय खरेदी विभागाचे अधिकार अतिरिक्त आयुक्त पी. वेलारसु यांच्याकडे होते. मात्र, या प्रकरणी उपमुख्यमंत्र्यांचे निकटवर्तीय असणारे जयस्वाल यांनाच लक्ष्य करण्यात आल्याने ही कारवाई 'कहीं पे निगाहे, कहीं पे निशाना' अशा स्वरूपाची आहे का, अशी चर्चा मंत्रालयात सुरू आहे.



# हाफकिनच्या जागेवर वक्रदृष्टी

## पोलिओ लशींच्या गोदामांची १८२६ चौरस मीटर जागा 'आयसीएमआर'ला

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** परळ येथील हाफकिनमध्ये पोलिओ लशी साठविण्यासाठी असलेल्या गोदामांची १,८२६ चौरस मीटर जागा भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषदेअंतर्गत (आयसीएमआर) असलेल्या आंत्रविषाणु अनुसंधान केंद्राला (एनआयव्ही) हस्तांतरित करण्याचा निर्णय जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आहे. हाफकिन महामंडळाला अंधारात ठेवून हा निर्णय घेण्यात आल्याचा आरोप करीत कर्मचारी संघटनेने गुरुवारी आंदोलन केले.

राज्य सरकारने २०१२ मध्ये हाफकिन महामंडळाची ५ एकर जागा टाटा मेमोरिअल रुग्णालयाला 'बाल व महिला कर्करोग रुग्णालय' आणि 'रेडिओ थेरपी केंद्र' उभारण्यासाठी दिली होती. त्या मोबदल्यात टाटा रुग्णालयाने हाफकिन महामंडळाला स्वखर्चाने दोन टॉवर बांधून द्यावे, असा करार झाला होता. मात्र, या जागेवर कर्करुग्णालय आणि रेडिओ थेरपी केंद्र उभारण्याऐवजी टाटा रुग्णालयाने डॉक्टर, परिचारिका आणि कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने उभारली. 'हाफकिन बायो फार्मास्युटिकल कॉर्पोरेशन एम्प्लॉइज युनियन'ने त्यास अनेकदा आक्षेप घेतला. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करून आता जिल्हाधिकाऱ्यांनी हाफकिन महामंडळाची १,८२६ चौरस मीटर जागा भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषदेअंतर्गत (आयसीएमआर) असलेल्या आंत्रविषाणु अनुसंधान केंद्राला देण्याचा निर्णय घेतला आहे. ही जागा हस्तांतरित करण्यासाठी हाफकिन महामंडळाला अंधारात ठेवण्यात आले असून, हस्तांतरणाबाबत (पान ४ वर)

### 'हाफकिन संपवण्याचा घाट'

राज्य सरकार हाफकिन महामंडळाची थोडी–थोडी जमीन केंद्र सरकारच्या उपक्रमांना देत आहे. त्यातून हाफकिन महामंडळ संपविण्याचा घाट घालण्यात येत असल्याचा आरोप 'हाफकिन जैव औषध निर्माण महामंडळातील कर्मचारी संघटनेने केला आहे.

दर्शना पवार खूनप्रकरणी आरोपीची कबुली

# लग्नास नकार दिल्याने हत्या

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्य लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत राज्यात तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या दर्शना पवार हिची हत्या तिचा मित्र सुधीर ऊर्फ राहुल दत्तात्रय हंडोरे यानेच केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. पुणे ग्रामीण पोलिसांनी राहुलला मुंबईतील अंधेरी रेल्वे स्थानकातून बुधवारी रात्री ताब्यात घेतले. लग्नाला नकार दिल्याने दर्शनाची हत्या केल्याची कबुली राहुलने दिली आहे.

१८ जून रोजी राजगड किल्ल्याच्या पायथ्याला दर्शनाचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत सापडला होता. दर्शना आणि राहुल १२ जून रोजी सकाळी साडेआठला राजगड किल्ल्यावर गेले होते. सकाळी पावणेअकराला राहुल गडावरून एकटाच खाली आल्याचे किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या उपाहारगृहाच्या परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरणातून स्पष्ट झाल्याने त्याचा शोध घेण्यात येत होता. राहुलला बुधवारी रात्री अंधेरी स्थानक येथून ताब्यात घेण्यात आले (पान ४ वर)



### जुनी मैत्री, लग्नासाठी तगादा...

दर्शनाच्या मामाच्या घराजवळ राहुलचे घर असल्याने या दोघांची जुनी मैत्री होती. दर्शनाने एमएस्सी (मॅथ्स) आणि राहुलने बीएस्सीपर्यंतचे (बॉटनी) शिक्षण घेतले होते. दोघेही स्पर्धा परीक्षांची तयारी करीत होते. अन्नपदार्थांची घरपोच सेवा देणारी अर्धवेळ नोकरी राहुल करीत होता. दर्शना परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर तो लग्नासाठी तिच्या मागे लागला होता.

**भाजपविरोधात 'एकास एक' उमेदवारीबाबत चर्चा**

# महाआघाडीची आज पाटण्यात बैठक

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** भाजपविरोधी ऐक्यासाठी शुक्रवारी पाटण्यात होणाऱ्या महाआघाडीच्या पहिल्या बैठकीची तयारी पूर्ण झाली असून या वेळी जागावाटपाच्या प्रमुख मुद्द्यावर चर्चा होणार आहे. काँग्रेससह इतर प्रादेशिक पक्षांमध्ये सहमती झाल्यास आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये देशभरातील सुमारे साडेचारशे जागांवर एकास एक उमेदवार देण्याचा प्रस्ताव मांडला जाऊ शकतो.

बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या निवासस्थानी होणाऱ्या बैठकीमध्ये किमान २० भाजपेतर पक्षांचे प्रमुख व नेते सहभागी होणार आहेत. तृणमूल (पान ४ वर)




### 'आप'चा बहिष्काराचा इशारा

दिल्लीतील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांबाबत केंद्राच्या वटहुकमाविरोधात काँग्रेसने पाठिंबा दिला नाही तर, महाआघाडीच्या बैठकीवर बहिष्कार टाकण्याचा आम आदमी पक्षाचा इशारा कायम आहे. मात्र भाजपेतर पक्षांच्या प्रमुखांना मोठ्या कष्टाने बैठकीसाठी एकत्र आणले असल्याने 'आप'ची खेळी यशस्वी होऊ न देण्याचे प्रयत्न बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्याकडून केले जात आहेत.

### पवारांकडे मोठी जबाबदारी?

- नितीशकुमार यांनी एकास एक उमेदवार उभा करण्याचे सूत्र मांडले आहे. त्यावर सविस्तर चर्चा होणे अपेक्षित असून सहमती झाल्या, किमान समान कार्यक्रमावर चर्चा होऊ शकेल.
- ही जबाबदारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याकडे दिली जाण्याची शक्यता आहे.
- दुसरीकडे भाजपच्या हिंदुत्वाच्या मुद्द्याला आव्हान देण्यासाठी जातनिहाय जनगणना हा आगामी लोकसभा निवडणुकीत प्रचाराचा मुख्य मुद्दा करण्याबाबतही बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे.

### 'मोदींच्या अनुपस्थितीत सर्वपक्षीय बैठक का?'

**नवी दिल्ली :** मणिपूरमधील हिंसक परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शनिवारी, २४ जून रोजी दिल्लीत सर्वपक्षीय बैठक बोलावली असली तरी, पंतप्रधान मोदींच्या गैरहजेरीत बैठक घेऊन काय फायदा होणार, असा प्रश्न काँग्रेस व 'माकप'ने विचारला आहे. मणिपूरमधील हिंसाचार थांबवण्यात केंद्रीय गृहमंत्री अपयशी ठरले आहेत. अशा वेळी त्यांच्याच अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक कशासाठी बोलावली, असा सवाल काँग्रेसचे माध्यम विभागप्रमुख जयराम रमेश यांनी उपस्थित केला. ही बैठक दिल्लीत नव्हे तर, इम्फाळमध्ये घेण्याची गरज असल्याचेही रमेश म्हणाले.

# २०३० पर्यंत ६३० जिल्ह्यांना नैसर्गिक गॅस वाहिनीने जोडण्याचे लक्ष्य

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** केंद्र सरकारकडून देशातील महानगरांपाठोपाठ आता लहान शहरांमध्येही पाइप गॅस पोहोचवण्याची योजना राबवली जात असून, त्यानुसार २०३० पर्यंत देशभरातील ६३० जिल्ह्यांमध्ये गॅस वाहिन्यांचे जाळे विस्तारण्यात येणार आहे. त्यात नागपूरचाही समावेश आहे.

पेट्रोलियम व नैसर्गिक गॅस मंत्रालयांतर्गत कार्यरत पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस नियामक मंडळ हे देशातील विविध जिल्ह्यांत पाइपद्वारे नैसर्गिक गॅसपुरवठा करण्यासाठी भौगोलिक क्षेत्रांना परवानगी देते. केंद्रीय पेट्रोलियम मंत्रालयाच्या माहितीनुसार, २०३० पर्यंत देशातील ६३० शहरांमध्ये पाइप गॅस पोहोचवण्याचे उद्दिष्ट आहे. यामध्ये नागपूरसह देशभरातील मोठ्या शहरांचा समावेश आहे.

निर्धारित लक्ष्यपूर्तीसाठी ३३,६६४ किलोमीटर गॅसवाहिनीची गरज असून, त्यापैकी ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत २२,३६५ किलोमीटर वाहिनीचे काम पूर्ण झाले आहे. सध्या १२,९५५ किलोमीटरचे काम सुरू आहे. २०१४ मध्ये २५ लाख कुटुंबांना पाइपद्वारे गॅसपुरवठा होत होता. २०२० मध्ये ही संख्या ६५ लाख होती, तर २०२२ मध्ये ही संख्या १ कोटीहून अधिक झाल्याचा पेट्रोलियम मंत्रालयाचा दावा आहे.

### भूसंपादनाची प्रक्रिया सुरू

नागपूरमार्गे जाणारी गॅसवाहिनी ओडिशापर्यंत जाणार आहे. नागपूर व गोंदिया जिल्ह्यांत यासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू झाली आहे. नागपूर जिल्ह्यातील मौजा कळमेश्वर, कवठा (ता. सावनेर), कापसी (ता. कामठी), चारभा (ता. मौदा), वेळा (नागपूर ग्रामीण) आदी गावांतील जमिनींचा यात समावेश आहे.

epaper.loksatta.com

FOUNDATION
COURSE FOR UNDER GRADUATE SATURDAY & SUNDAY
UPSC
IAS/IPS/IFS REGULAR COURSE FOR GRADUATE
MPSC राज्यसेवा
Dp. COLL./DY. SP. REGULAR COURSE FOR GRADUATE

AJIT PADWAL
Director - Lakshya Academy
(Ex Journalist)
22 YEARS OF SUCCESS
LAKSHYA ACADEMY
Aim, Think & Achieve
www.lakshyaacademy.co I www.lakshyaiasacademy.com
NEW BATCHES ADMISSSIONS OPEN
1st BATCH FULL
2nd BATCH ADMISSIONS OPEN
For Enquiry Head Office Dadar (W) : 9820971345 / 9223209699 I Branches: Mulund (W) I Thane (W) I Nerul (W) I Panvel I Pune
Follow Us On: @Lakshya IAS Academy

# कुमार गंधर्व जन्मशताब्दीनिमित्त ‘लोकसत्ता’चा खास विशेषांक

## प्रकाशनानिमित्त पुण्यात खास कार्यक्रमाचे आयोजन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** शिवपुत्र कोमकली या नावाच्या मुलाने वयाच्या सहाव्या वर्षी स्वरांच्या अद्भुतरम्य विश्वात जो प्रवेश केला, तो अगदी शेवटच्या श्वासापर्यंत. स्वरांच्या प्रांगणात आपल्या प्रतिभेने चैतन्याचे मळे फुलवणारा हा कलावंत वयाच्या सातव्या वर्षीच कुमार गंधर्व या पदवीने सन्मानित झाला. या कलावंताने लहान वयातच साऱ्या देशातील रसिकांचे लक्ष वेधले आणि नंतरच्या आयुष्यात आपल्या असामान्य कल्पनाशक्तीने साऱ्यांनाच अचंबित केले. पंडित कुमार गंधर्व यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांना मानवंदना देण्यासाठी ‘लोकसत्ता’च्या वतीने ‘सुनता है गुरु ग्यानी’ या खास विशेषांकाचे आयोजन केले असून,



त्याचे प्रकाशन येत्या दि. ३० जून रोजी पुण्यात होणार आहे.

प्रकाशनानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमात कुमारजींचे नातू भुवनेश कोमकली आणि ज्येष्ठ गायिका श्रीमती आरती अंकलीकर हे सहभागी होणार आहेत. कुमारजींच्या संगीतविश्वाचा साक्षात्कार त्यांनी रचलेल्या बंदिशींमधून जसा होतो, तसाच




त्यांनी सादर केलेल्या विशिष्ट विषयांना वाहिलेल्या विशेष कार्यक्रमांमधूनही होतो. त्याची झलक या कार्यक्रमात रसिकांना ऐकायला मिळणार आहे.

हा कार्यक्रम, शुक्रवारी (दि. ३०) सायंकाळी सहाला टिळक स्मारक मंदिर येथे होणार आहे. सर्वांना मुक्त प्रवेश असलेल्या या सांगीतिक कार्यक्रमाच्या प्रवेशिका आधीच उपलब्ध होणार असून, त्याबाबतचा तपशील लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

कलावंताला सर्जनाची प्रक्रिया समजावून सांगता येतेच असे नाही. कुमार गंधर्व मात्र त्याला अपवाद ठरले. संगीतविद्येचा सूक्ष्मात जाऊन अभ्यास करण्याची त्यांची वृत्ती आणि अभ्यासाला अभिजाततेचा दर्जा मिळवून देत त्याचे सादरीकरण करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये होती. त्यामुळेच कलावंत आणि विचारवंत अशा दोन्ही प्रांतांतील त्यांचे महत्त्व अधोरेखित होते. ‘सुनता है गुरु ग्यानी’ या विशेषांकात कुमारजींच्या या वैशिष्ट्यांची उकल करणारे लेखन समाविष्ट आहेच, त्याशिवाय त्यांच्या खास शैलीचे रसग्रहण करणाऱ्या लेखांचाही समावेश आहे. त्यामुळे संगीतरसिकांसाठी संग्राह्य ठरणाऱ्या या विशेषांकाच्या प्रकाशन सोहळ्यात रसिकांना स्वरशब्दांची मेजवानीच मिळणार आहे.

**मुख्य प्रायोजक:**
- भारती विद्यापीठ, पुणे

**सहप्रायोजक:**
- पुनीत बालन ग्रुप
- लोकमान्य मल्टीपर्पज को–ऑप सोसायटी लि.

**पॉवर्ड बाय:**
- मांडके हिअरिंग सर्व्हिसेस
- कोहिनूर – कृष्णकुमार गोयल एंटरप्राइज

**‘सुनता है गुरु ग्यानी’ विशेषांक प्रकाशन**
- शुक्रवार, दि. ३० जून
- स्थळ : टिळक स्मारक मंदिर
- वेळ : सायंकाळी सहा वाजता.

# १४० कोटी भारतीयांचा सन्मान!

## ‘व्हाइट हाऊस’मधील स्वागतानंतर पंतप्रधानांचे उद्गार

**पीटीआय, वॉशिंग्टन**

**अमेरिकेचे अध्यक्ष** जो बायडेन आणि ‘फर्स्ट लेडी’ जिल बायडेन यांनी ‘व्हाइट हाऊस’मध्ये केलेले आपले स्वागत हा १४० कोटी भारतीय नागरिकांचा सन्मान आहे, असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. तर २१व्या शतकात भारत आणि अमेरिकेचे नाते हे सर्वांत घट्ट आहे, असे बायडेन म्हणाले.

अमेरिकेच्या पहिल्या अधिकृत दौऱ्यावर गेलेल्या पंतप्रधान मोदी यांचे गुरूवारी भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री ८च्या सुमारास पंतप्रधान अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या अधिकृत निवासस्थानी आगमन झाले. त्यानंतर या दौऱ्यातील सर्वांत महत्त्वाची द्विपक्षीय चर्चा सुरू होण्यापूर्वी स्वागत समारंभात दोघांनी उपस्थितांना संबोधित केले. दोन्ही देशांच्या राष्ट्रगीतांनी या कार्यक्रमाची सुरुवात झाली. सुरूवातीला मोदी यांचे स्वागत करताना बायडेन म्हणाले, की आरोग्य, वातावरण बदल आणि रशियाच्या युक्रेनवरील हल्ल्यामुळे उद्भविलेल्या जागतिक परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी दोन्ही देश एकत्रितपणे काम करीत आहेत. हिंद-प्रशांत क्षेत्रामध्ये मुक्त आणि सुरक्षित वातावरण राहावे, यासाठी भारताच्या सहकार्याने क्वाड (भारत, अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलियाचा राष्ट्रगट) अधिक मजबूत झाल्याचेही बायडेन यांनी नमूद केले.

या स्वागताचा स्वीकार करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, की बायडेन यांच्यासोबत होऊ घातलेली द्वीपक्षीय चर्चा नेहमीप्रमाणे सकारात्मक आणि उपयुक्त ठरेल. जागतिक शांतता, स्थैर्य आणि विकासासाठी एकत्रितपणे काम करण्यास भारत आणि अमेरिका कटिबद्ध आहेत. भारतीय वंशाच्या नागरिकांनी आपली बुद्धिमत्ता आणि कठोर मेहनतीच्या जोरावर अमेरिकेमध्ये भारताची मान उंचावली आहे. हे नागरिक हीच अमेरिका-भारत संबंधांची खरी ताकद आहे, असे मोदी म्हणाले. करोनानंतरच्या काळात जगाची घडी बदलली आहे. भारत-अमेरिकेची मैत्री ही सगळ्या जगाची ताकद वाढविणारी ठरेल, असा विश्वासही मोदी यांनी यावेळी व्यक्त केला.

# ‘राज्यातील ६० टक्के नद्या कोरड्या’

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** राज्यातील नद्या सध्या मरणासन्न अवस्थेत आहेत. ‘चला जाणूया नदीला’ अंतर्गत केलेल्या निरीक्षणात ६० टक्के नद्या पूर्णपणे कोरड्या पडल्या असून शिल्लक ४० टक्के नद्यांचे नाल्यात रूपांतर झाले आहे, अशी माहिती जलतज्ज्ञ आणि ‘चला जाणूया नदीला’ उपक्रमाचे प्रणेते राजेंद्र सिंग यांनी दिली.

नागपूरमध्ये पत्रकार परिषदेत राजेंद्र सिंग बोलत होते. ते म्हणाले, नद्यांना हृदयाचा आजार असताना सरकार दंतरोगतज्ज्ञांकडून उपचार करताना दिसते. कधी ‘ब्युटी पार्लर’मध्ये पाठवले जाते. त्यामुळे नद्यांची स्थिती वाईट झाली आहे. नदीपात्र परिसरातील अतिक्रमण, नदीमध्ये सोडले जाणारे रसायनमिश्रित व दूषित पाणी, वाळूचा अनियंत्रित उपसा, नदीपात्रातील तलावांमध्ये साचलेले गाळ व इतरही कारणांमुळे नद्यांची अवस्था वाईट झाली आहे. देशातील बऱ्याच राज्यांना ही माहिती दिल्यावरही प्रतिसाद नाही. परंतु, महाराष्ट्र शासनाने गैरसरकारी लोकांना सोबत घेऊन ‘चला जाणूया नदीला’ हा उपक्रम सुरू केला.

या पत्रकार परिषदेला नरेंद्र चुघ, प्रवीण महाजन, डॉ. सुमंत पांडे, रमाकांत कुळकर्णी उपस्थित होते.

### ‘भूगर्भातील पाण्याची स्थितीही वाईट’

भूगर्भातील पाण्याची स्थिती वाईट आहे. भूगर्भातील सुमारे ६० टक्के पाणी संपले असून असेच सुरू राहिल्यास शिल्लक ४० टक्के पाणीही येत्या पाच वर्षांत संपेल. त्यानंतर देशातील नागरिकांना परदेशात आश्रयाला जाण्याची वेळ येऊ शकते. पाणी नसल्यास भारतीय चलनाचीही स्थिती वाईट होईल. सोबत पाण्याअभावी इतर देशात आश्रयाला जाणाऱ्या भारतीयांना तेथे किंमत राहणार नाही, असा गंभीर इशाराही सिंग यांनी दिला.

## पुढील चार आठवडे पावसाचे!

हवामान विभागाने गुरुवारी पुढील चार आठवड्यांचा सुधारित अंदाज जाहीर केला. त्यानुसार २३ जून ते २० जुलै या काळात देशभरात चांगला पाऊस पडण्याचा अंदाज आहे. २३ जूनपासून जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मध्य भारतात चांगला पाऊस पडेल. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात मोसमी पाऊस भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर सक्रिय राहील. मोसमी पावसाच्या वाटचालीस पोषक हवामान आहे.

# ‘तेजस’च्या इंजिनांच्या संयुक्त निर्मितीचा करार

**पीटीआय, वॉशिंग्टन**

**भारत आणि** अमेरिकेदरम्यानच्या महत्त्वाच्या संरक्षण कराराची गुरुवारी घोषणा करण्यात आली. भारतीय हवाई दलाच्या तेजस या हलक्या वजनाच्या लढाऊ विमानाच्या (एलसीए - एमके टू) इंजिनाची संयुक्तरीत्या निर्मिती करण्यासाठी अमेरिकेतील जीई एअरोस्पेस आणि भारताच्या हिंदुस्तान एअरोनॉटिक्स लिमिटेड (एचएएल) यांच्यात करार झाल्याची घोषणा जीईने गुरुवारी केली.



सध्या भारत लढाऊ विमानांच्या खरेदीसाठी रशिया आणि युरोपीय देशांवर अवलंबून आहे. त्यामुळे जीईबरोबर झालेला करार महत्त्वाचा आहे. या करारानुसार जीई एअरोस्पेसच्या एफ४१४ विमानांची भारतामध्ये संयुक्त निर्मिती केली जाणार आहे, तसेच यासाठी आवश्यक असलेले निर्यात अधिकार मिळवण्यासाठी जीई एअरोस्पेस अमेरिका सरकारबरोबर काम करत राहील.

भारत आणि अमेरिकेदरम्यान संरक्षण सहकार्य बळकट करण्यासाठी एचएएलबरोबरचा हा सामंजस्य करार महत्त्वाचा असल्याचे जीईने म्हटले आहे.

जीई भारत सरकारबरोबर ॲडव्हान्स्ड कॉम्बॅट एअरक्राफ्ट (एएमसीए) एमके२ इंजिन निर्मितासाठी सहकार्य करत राहील. एलसीए-एमके-टू उपक्रमाअंतर्गत जीई एअरोस्पेसने भारतीय हवाई दलासाठी ९९ इंजिनांची निर्मिती करण्याचे यापूर्वीच मान्य केले आहे. त्याशिवाय ७५ एफ४०४ इंजिनांचा पुरवठा आधीच केला आहे.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत
टीजेएसबी शैक्षणिक कर्ज
शैक्षणिक जीवनाला द्या नवा आकार
*अटी लागू
टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
www.tjsbbank.co.in
Toll Free : 1800 223 466 / 1800 266 3466

लोकसत्ता यशस्वी भव! ८

# इयत्ता दहावी, एस.एस.सी. बोर्ड - भूगोल

**नमस्कार विद्यार्थी मित्रांनो,**

सामाजिक शास्त्र विषयातील दुसरा भाग म्हणजे भूगोल होय. सामान्य भूगोल, प्राकृतिक भूगोल, मानवी भूगोल आणि प्रात्यक्षिक भूगोल अशी भूगोलाची अभ्यासक्षेत्रे आहेत. या सर्व अभ्यासक्षेत्रांच्या दृष्टिकोनातून भूगोलाच्या पाठ्यपुस्तकाची रचना करण्यात आली आहे. या वर्षी इयत्ता तिसरी ते नववीपर्यंत तुम्ही अभ्यासलेल्या सर्व भौगोलिक संज्ञा आणि संकल्पना यांची उजळणी करायची आहे. या संकल्पनांचे उपयोजन भारत व ब्राझील या दोन देशांच्या संदर्भात करण्यात आलेले आहे. विस्तार, ऐतिहासिक पार्श्वभूमी, आर्थिक विकास या साम्यस्थळांबरोबरच गोलार्धानुसार स्थान या भेदस्थळाचा विचार करून या दोन देशांची निवड अभ्यासासाठी करण्यात आली आहे. असे असले तरी भारत आणि ब्राझील यांची तुलना न करता भूगोलातील आजवर अभ्यासल्या विविध प्राकृतिक आणि प्रादेशिक संबोधांचे उपयोजन या वर्षी पाठ्यक्रमात केलेले आहे.

भूगोलाच्या पाठ्यक्रमाचे थोडक्यात स्वरूप समजून घेतल्यानंतर आपण भूगोलाच्या मूल्यमापन आराखड्याचा विचार करू. भूगोलाच्या मूल्यमापनाचे स्वरूप पाहता यात ४० गुणांची लेखी प्रश्नपत्रिका आणि १० गुण हे अंतर्गत मूल्यमापनाद्वारे देण्यात येतील. अंतर्गत मूल्यमापनात बहुपर्यायी प्रश्न चाचणी त्याचप्रमाणे स्वाध्याय व कृती, प्रकल्प यांचा समावेश असेल. एकूण ५० गुणांचे मूल्यमापन या विषयासाठी आहे. भूगोलाच्या लेखी कृतिपत्रिकेत एकूण सात प्रश्न असून प्रत्येक प्रश्नामध्ये उपप्रश्नाचे विविध प्रकार विचारले जाऊ शकतात. या कृतिपत्रिकेची रचना पुढील प्रकारे असेल.

| प्र.क्र. | प्रश्न प्रकार | गुण | वि. गुण |
|---|---|---|---|
| १. | पुढीलपैकी कोणतेही एक किंवा दोन प्रश्न प्रकार. (चार प्रश्नांपैकी चारही सोडवणे.) • अचूक पर्याय निवडा. • दोन गटांचा विचार करून योग्य पर्याय काढा. • अचूक सहसंबंध ओळखा व साखळी बनवा. • अचूक पर्यायासमोरील चौकटीत खूण करा. • वाक्यांतील सहसंबंध योग्य पर्यायाने प्रस्थापित करा. | ४ | ४ |
| २. | पुढीलपैकी कोणतेही एक किंवा दोन प्रश्न प्रकार विचारण्यात येतील. (चार प्रश्नांपैकी चारही सोडवणे.) • योग्य जोड्या जुळवा. • चुकीची जोडी ओळखा. • विधानांचा योग्य क्रम लावा. • वेगळा घटक ओळखा. | ४ | ४ |
| ३. | पुढीलपैकी कोणताही एक प्रश्न प्रकार विचारण्यात येईल. • एका वाक्यात उत्तरे लिहा. (पाच प्रश्नांपैकी चार सोडवणे.) • विधानावरून प्रकार ओळखा. (पाच प्रश्नांपैकी चार सोडवणे.) • नावे द्या. (पाच प्रश्नांपैकी चार) • फरक स्पष्ट करा. (तीन प्रश्नांपैकी दोन) • चूक की बरोबर सांगा (पाचपैकी चार) • वर्गीकरण करा. (पाच प्रश्नांपैकी चार) | ४ | ५/६ |
| ४. | पुढीलपैकी कोणताही एक प्रश्न प्रकार विचारण्यात येईल. (अ) नकाशात माहिती भरा व सूची तयार करा. (सहापैकी कोणतीही चार घटक भरणे.) माहितीच्या आधारे नकाशा तयार करा. | ४ | ६ |
| | (आ) नकाशा वाचन करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. (सहा प्रश्नांपैकी कोणतेही चार सोडवणे.) | ४ | ६ |
| ५. | भौगोलिक कारणे लिहा. (चार प्रश्नांपैकी कोणत्याही दोन विधानांची कारणे लिहिणे.) | ६ | १२ |
| ६. | (अ) दिलेल्या सांख्यिकी माहितीच्या आधारे आलेख काढा व त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा. किंवा (आ) आलेख वाचन करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. (सहा प्रश्नांपैकी कोणतेही तीन) • दिलेल्या सांख्यिकी माहितीच्या आधारे • आलेख काढा. आकृती काढा. (दोनपैकी एक कृती) • दिलेल्या आकृतीत नावे भरा/भूरूपे ओळखा. | ६ | १२ |
| ७. | पुढीलपैकी कोणताही एक प्रश्न प्रकार विचारण्यात येईल. (तीन प्रश्नांपैकी कोणतेही दोन सोडवणे.) • सविस्तर उत्तरे लिहा. • थोडक्यात उत्तरे लिहा. • स्पष्ट करा. | ८ | १२ |
| | एकूण | ४० | ६०/६१ |

भूगोलाच्या पाठ्यक्रमाचे स्वरूप आणि कृतिप्रश्नपत्रिकेचा आराखडा यांविषयी माहिती मिळविल्यानंतर आपण भूगोलाच्या पहिल्या आणि दुसऱ्या प्रकरणांचा अभ्यास करू या. भूगोलाच्या पाठ्यपुस्तकातील दुसऱ्या प्रकरणापासून भारत आणि ब्राझील या दोन देशांतील विविध भौगोलिक घटकांचा आणि मानवी आंतरक्रियांचा आपण अभ्यास करणार आहोत.

### प्रकरण १. क्षेत्रभेट

क्षेत्रभेट ही भूगोलाच्या अध्ययनाची एक महत्त्वाची पद्धती असून क्षेत्रभेटीद्वारे पाठ्यपुस्तकातील अनेक संकल्पनांचे नीट आकलन होते. क्षेत्रभेट या पाठातून भूगोलाचा अभ्यास कसा केला जातो याचे सहलीच्या रूपाने उदाहरण देण्यात आले आहे. एखाद्या प्रदेशाला भेट देऊन त्या प्रदेशाचा अभ्यास करणे म्हणजे क्षेत्रभेट होय. क्षेत्रभेटीमुळे पाठ्यपुस्तकात अभ्यासलेली तत्त्वे निरीक्षण करता येतात. या ठिकाणी विद्यार्थी आणि शिक्षक उस्मानाबाद जिल्ह्यातील नळदुर्ग पासून रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथे क्षेत्रभेटीला निघाले आहेत. या दरम्यानच्या प्रवासातील त्यांचे अनुभव व त्यांचे निरीक्षण क्षेत्रभेट या पाठात आढळते. या प्रकरणामध्ये प्रत्यक्ष क्षेत्रभेटीला जाताना प्रदेशनिहाय होणारे बदल तसेच परिसराकडे भौगोलिक दृष्टिकोनातून पाहण्याची पद्धती इत्यादी बाबी विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या संवादातून मांडण्यात आल्या आहेत. क्षेत्रभेट हा पाठ प्रामुख्याने वस्तुनिष्ठ, विशेषकरून दीर्घोत्तरी प्रश्नाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

### प्रकरण २. स्थान -विस्तार

कोणत्याही देशाचा भूगोल अभ्यासताना या देशाचे भौगोलिक स्थान व विस्तार यांचा विचार करणं अतिशय महत्त्वाचं ठरतं. या प्रकरणात आपण भारत आणि ब्राझील या दोन्ही देशांचे भौगोलिक स्थान व विस्तार यांचा पुढील तुलनात्मक तत्त्वाच्या आधारे अभ्यास करूया.

| देश | भारत | ब्राझील |
|---|---|---|
| खंड | आशिया | दक्षिण अमेरिका |
| राजधानी | नवी दिल्ली | ब्राझीलिया |
| स्थान | गोलार्ध-उत्तर आणि पूर्व आशिया खंडाच्या दक्षिणेस. | गोलार्ध-काही भाग उत्तर व बहुतांश दक्षिण आणि पश्चिम |
| विस्तार | अक्षवृत्त– ८°४' उत्तर ते ३७°६'उत्तर रेखावृत्त– ६८°७' पूर्व ते ९७°२५' पूर्व सर्वात दक्षिणेकडील टोक- इंदिरा पॉइंट : ६°४५' उत्तर | अक्षवृत्त– ५°१५' उत्तर ते ३३°४५'दक्षिण रेखावृत्त– ३४°४५' पश्चिम ते ७३°२५'पश्चिम |

भारत व ब्राझील यांचा तुलनात्मक अभ्यास करताना पाठ्यपुस्तकातील नकाशे काळजीपूर्वक अभ्यासा. नकाशात भारत आणि ब्राझील या दोन देशांच्या शेजारील देश व जलाशय यांचा नीट अभ्यास करा त्याचप्रमाणे भारत व ब्राझील यांच्या नकाशा आराखड्यामध्ये देशातील विविध घटक राज्ये दाखवण्याचा सराव करा.

आता आपण भारत आणि ब्राझील या दोन्ही देशांच्या ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि सद्यस्थितीचा तुलनात्मक विचार करू.

| देश | भारत | ब्राझील |
|---|---|---|
| ऐतिहासिक पार्श्वभूमी | iii) सुमारे दीड शतक भारत ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली. iii)१९४७मध्ये स्वातंत्र्य मिळाले iii)स्वातंत्र्योत्तर काळात पहिल्या वीस वर्षांत तीन युद्धे, अनेक भागांतील दुष्काळी परिस्थिती इत्यादी समस्यांना सामोरे जावे लागले. | i) तीन दशकांपेक्षा अधिक काळ पोर्तुगीजांच्या आधिपत्याखाली. ii) १८२२ मध्ये स्वातंत्र्य मिळाले. iii) १९३० ते १९४५ पर्यंत अर्ध्या शतकापेक्षा जास्त काळ लोकप्रिय लष्करी राजवटीखाली. |
| सद्यःस्थिती | i)आज भारत जगातील प्रमुख विकसनशील देश. भारताला आज प्रमुख जागतिक बाजारपेठ म्हणून ओळखले जाते. ii)विविध टप्प्यांवरील आर्थिक सुधारणांमुळे भारताच्या आर्थिक विकासाला वेग. iii)भारतातील लोकसंख्येत तरुणांचे प्रमाण जास्त, हा कार्यशील वयोगट असल्याने भारताकडे एक तरुण देश म्हणून पाहिले जाते. | i) विसाव्या शतकाच्या शेवटच्या कालखंडात जागतिक वित्तीय समस्यांमधून हा देश सावरला. ii) जगाच्या आर्थिक विकासाला हातभार लावणारा देश व भविष्यातील एक प्रमुख बाजारपेठ या दृष्टीने ब्राझीलकडे पाहिले जाते. |

**भूगोलाचा अभ्यास करताना...** • पाठ्यपुस्तकांचे सखोल व काळजीपूर्वक वाचन करा. • पुस्तकातील प्रत्येक प्रकरण नीट समजून घ्या. • भूगोलाच्या प्रत्येक पाठातील आकृत्या, आलेख, नकाशा काळजीपूर्वक अभ्यासा. • भारत आणि ब्राझील या दोन देशांच्या विविध घटकांबाबतचा आशय नीट समजून घ्या. • लक्षात ठेवा की, पाठ्यपुस्तकाचे सूक्ष्म वाचन, चिंतन आणि नियमित सराव या त्रिसूत्रीने अभ्यास केल्यास या विषयात उत्तम गुण मिळतील याची खात्री बाळगा.

"So, your time starts now."

**लेखक – राहुल बळवंत प्रभू**,
सहा. शिक्षक, प्रा. जनार्दन लक्ष्मण शिर्सेकर शिक्षण संस्थेचे, महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे (पूर्व), मुंबई.
**समन्वयक – जगदीश इंदलकर**, मुख्याध्यापक
(लायन एम.पी. भूता सायन सार्वजनिक स्कूल, सायन, मुंबई)

**उद्याचा विषय : विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग १**

# पोटाचा घेर अधिक असलेल्या व्यक्तींना करोनाचा अधिक त्रास

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** लठ्ठ आणि पोटाचा घेर अधिक असलेल्या व्यक्तींना करोना संसर्गाचा अधिक त्रास होतो, असा निष्कर्ष 'टोकिओ मेडिकल अॅन्ड डेंटल युनिर्व्हसिटी'च्या संशोधकांनी काढला आहे.

करोना संसर्ग झालेल्या अनेक रुग्णांना 'सायाकेटीन स्टॉर्म' या धोकादायक घटनेचा अनुभव येतो. यानुसार रुग्णाला श्वास घेण्यास त्रास होतो. पर्यायाने मृत्यूचा धोका वाढतो. विद्यापीठाचे प्रमुख संशोधक तदाशी होसोया यांनी सांगितले की, लठ्ठ व्यक्ती आणि विशेषतः पोटावर चरबी असलेल्या करोनाचा संसर्ग हा त्रासदायक ठरला, असे आढळले.

या संशोधनासाठी उंदरांवर प्रयोग करण्यात आला. त्यानुसार उंदरांची लठ्ठ आणि सडपातळ अशा दोन गटांत विभागणी करण्यात आली होती. दोन्ही गटांतील उंदरांना करोना विषाणूचा संसर्ग करण्यात आला. त्या वेळी लठ्ठ उंदरांमध्ये फुफ्फुसामध्ये दुखापत, सूज आणि मृत्यू असे परिणाम दिसून आले.

संशोधनाचे मुख्य लेखक सिया ओबा यांनी सांगितले की, 'अधिक चरबी म्हणजे करोना संसर्गातून बरे होण्यास अधिक वेळ , असा आम्ही निष्कर्ष काढला आहे.







# पंढरपुरात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना घेराव

## आषाढी एकादशीला इंटककडून आंदोलनाची घोषणा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** एसटी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन व भत्ते आणि थकबाकी मिळायला हवी. या मागणीसाठी आषाढी एकादशीला पंढरपुरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना घेराव घालण्याची घोषणा नागपुरात महाराष्ट्र एस.टी. वर्कर्स काँग्रेस (इंटक)कडून केली आहे.

इंटकचे राज्य सरचिटणीस मुकेश तिगोटे म्हणाले, १९९६ पूर्वी एसटी कर्मचाऱ्याला शासकीय कर्मचाऱ्यांहून जास्त वेतन होते. परंतु, आता शासकीय कर्मचाऱ्याच्या तुलनेत खूप कमी वेतन मिळते. या कर्मचाऱ्यांना न्याय देण्यासाठी कामगार करार पद्धत रद्द करून शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते करण्याची गरज आहे. त्यासाठी २९ जूनला पंढरपूरला आंदोलन केले जाईल.

भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी शासनात विलीनीकरणाच्या नावावर कर्मचाऱ्यांच्या भावनांचा राजकारणासाठी वापर केला. त्यामुळे सेवाज्येष्ठ कर्मचाऱ्यांच्या वेतनात त्रुटी निर्माण झाली. तर दुसरीकडे अॅड. गुणरत्न सदावर्ते यांनीही विविध अफवांचे प्रलोभन देऊन एसटी कर्मचाऱ्यांच्या भावनेशी खेळ केल्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांची पिळवणूक झाल्याचे तिगोटे म्हणाले.




**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड आणि आयडीएफसी बँक लिमिटेडशी एकत्रीकरण झालेली)
IDFC FIRST Bank
**CIN: L65110TN2014PLC097792**
**नोंदणीकृत कार्यालयः** केआरएम टॉवर्स, आठवा मजला, हॅरिंगटन रोड, चेटपेट, चेन्नई - 600031. **टेलीः** +91 44 4564 4000 | **फॅक्सः** +91 44 4564 4022

परिशिष्ट IV [नियम 8(1)]
**ताबा सूचना** (अचल मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड आणि आयडीएफसी बँक लिमिटेडशी एकत्रीकरण झालेली)** चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 3 सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत **17-मार्च-2023** रोजी एक मागणी सूचना पाठविली ज्यात कर्जदार/सह-कर्जदार व जामीनदार **1. शिवलाल मुकुंदराव दलाल, 2. शिवलाल मुकुंदराव ट्रेडर्स, 3. रत्नमाला एस भावळकर 4. रोशन भावळकर, 5. शिवलाल मुकुंदराव अँड कंपनी, 6. शिवलाल मुकुंदराव भावळकर, 7. राकेश भावळकर, 8. रत्नमाला एस भावळकर, यांना सदर मागणी सूचनेत नमूद 17-मार्च-2023 नुसार रक्कम रु. 2,45,17,754.82/- (रुपये दोन कोटी पंचेचाळीस लक्ष सतरा हजार साशे चौपन्न आणि ब्याऐंशी पैसे फक्त) चा सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.**

कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने याद्वारे कर्जदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8 सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत **16 जून, 2023 रोजी खाली नमूद मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतलेला आहे.**

कर्जदार आणि सर्व लोकांना याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड आणि आयडीएफसी बँक लिमिटेडशी एकत्रीकरण झालेली) च्या रु. 2,45,17,754.82/- (रुपये दोन कोटी पंचेचाळीस लक्ष सतरा हजार साशे चौपन्न आणि ब्याऐंशी पैसे फक्त)** अधिक तीवरील पुढील व्याजाच्या भाराधीन असेल.

सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (8) कडे वेधण्यात येते.

**अचल मालमत्तांचे वर्णन**

**i)** प्लॉट क्र. 47, घर क्र. 604/47, क्षेत्रफळ सुमारे 2400 चौ.फू. (222.830 चौ.मी.), वॉर्ड क्र. 21, ख.क्र. 27/1-2, सी.एस.क्र. 26, मौजा पारडी, नेताजी नगर, तह. आणि जिल्हा नागपूर, महाराष्ट्र - 440008 आणि **चतुःसीमा खालील प्रमाणेः पूर्वेस- रस्ता, उत्तरेस- प्लॉट क्र. 48, दक्षिणेस- प्लॉट क्र. 46, पश्चिमेस- प्लॉट क्र. 16**

**ii)** प्लॉट क्र. एन-96, ख.क्र. 7, नामपा घर क्र. 582/96, क्षेत्रफळ सुमारे 267.55 चौ.मी., 2880.00 चौ.फू., वॉर्ड क्र. 21, सूर्या नगर, मौजा पारडी, नागपूर, महाराष्ट्र - 440008 **चतुःसीमा खालील प्रमाणेः उत्तरेस-प्लॉट क्र. एन-97, पूर्वेस- प्लॉट क्र. एन-105, दक्षिणेस- प्लॉट क्र. एन-95, पश्चिमेस-रस्ता**

**दिनांकः 16 जून 2023**
**स्थानः नागपूर**
**कर्ज खाते क्र.: 11462862, 11479626, 34445936, 34466625, 34696095 आणि 34705886.**

**स्वा/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड आणि आयडीएफसी बँक लिमिटेडशी एकत्रीकरण झालेली)**

**MAHAVITARAN** Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
**E-TENDER NOTICE**

The Executive Engineer, MSEDCL, Gandhibag Division invites e-Tender in two bid system from experienced reputed Agency having experience of similar work in MSEDCL & completing the formalities for Annual Contract for Monthly Meter Reading, Bill printing, Bill Distribution & Acknowledgement receipt of delivery to consumer of All PC 0 Consumers (IP, Commercial and Others), CT/ Whole Current meter Consumers under **Wardhaman Nagar Sub-Division** of Gandhibag Division (With CMRI for above 20kW load consumer & without CMRI for balance Consumers) having **Tender No. EE/GBDN/Tech/CT-IP Reading Wardhaman Nagar/23-24/T-02.** The Tender fees & other details are available on website etender.mahadiscom.in/eatApp//. The Tender documents can be downloaded from aforesaid website from 23.06.2023. Submit the tender duly filled in on or before 10.07.2023 before 18:30 Hrs.

**Executive Engineer**
**O&M, MSEDCL**
**Gandhibag Division, Nagpur**
**NZ/PR No.103/2023 Dt.22.06.2023**




# 'कॉटन मिल'मधील कापसाला आग

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** रामटेक तहसील तालुक्यातील अंतर्गत येणाऱ्या नगरधनजवळील सूर्यलक्ष्मी 'कॉटन मिल'मध्ये आग लागून त्यात लाखो रुपयांचा कापूस जळाला. अग्निशमन विभागाला या आगीची माहिती मिळताच रामटेक व कन्हान येथून तीन गाड्या घटनास्थळी पाठवण्यात आल्यानंतर आगीवर नियंत्रण मिळवता आले.

नगरधनजवळील सूर्यलक्ष्मी 'कॉटन मिल'मध्ये मोठ्या प्रमाणात कापसाचा साठा ठेवण्यात आला होता. दुपारच्यावेळी ज्या ठिकाणी कापूस ठेवला होता तेथून धूर निघत असल्याचे दिसले. अग्निशमन विभागाच्या गाड्या घटनास्थळी पोहचल्यावर तासाभरात आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र. यात अतिशय मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याची चर्चा होती.



# मधुलिका गोडबोले यांचे निधन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** काँग्रेसनगरमधील रहिवासी मधुलिका चंद्रशेखर गोडबोले (५८) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा व बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सकाळी ९.३० वा. अंबाझरी घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**जाहीरनामा**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी म.न.पा. न्यायालय क्र. २ नागपुर यांचे न्यायालय**
**किरकोळ अर्ज क्र. : MCA 2057/2023**
**Anil वि. NMC**
**पेशी तारीख २८.०६.२०२३**

ज्याअर्थी अर्जदार नामे **Anil Ambadas Babhale** वय ५२, रा. Plot No. 79, Vithal Nagar No. 1, Barai Lawn Hudkeshwar Nagpur यांनी या न्यायालयात त्यांच्या Brother नामे **Ajay Ambadas Babhale** यांचे मृत्यु प्रमाणपत्र मिळण्याकरीता जन्म व मृत्यु विभाग, महानगर पालिका नागपुर यांना निर्देशित करण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे.

सदर्हु **Ajay Ambadas Babhale** यांचा मृत्यु दिनांक ०१/०८/२०१६ रोजी **at home** नागपुर येथे घरीच झाला असे अर्जदाराचे म्हणने आहे. त्याच प्रमाणे सदर्हु अर्जदार यांना त्यांचे मृत्यु प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरीता आवश्यक असल्या बाबत त्यांनी अर्जात नमुद केले आहे. त्या अर्थी जर कुणास सदर मृत्यु प्रमाणपत्र निर्गमीत करण्याबाबत काही हरकत असल्यास, त्यांनी या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन **एक महिन्याच्या आत** या न्यायालयास कळवावे व आपल्या हरकती लेखी स्वरूपात दाखल कराव्या अन्यथा अर्जदाराने सादर केलेल्या पुराव्यावरून योग्य तो आदेश करण्यात येईल.

**नागपुर**
**दि. १६/०६/२०२३**

**आदेशावरून**
**(सहा. अधिक्षक)**
**प्र.श्रे.न्या.दं. कॉर्पो.**
**कोर्ट नं. २, नागपुर**
शिक्का

सेन्ट्रल बैंक ऑफ इंडिया
**Central Bank Of India**
**शुध्दीपत्रक**

**इंडियन एक्सप्रेस + लोकसत्ता 13/06/2023** रोजी प्रकाशित झालेल्या ई लिलाव सूचनेचा संदर्भ ज्यामध्ये **श्रीमती. रजनी राजेंद्र गुप्ता** यांचा **''प्रत्यक्ष ताबा दिनांक 18.03.2023''** चुकीच्या पद्धतीने प्रकाशित झाले होते. ते **प्रत्यक्ष ताबा दिनांक 23.02.2023''** असे वाचावे. सदर सूचनेच्या सर्व अटी आणि शर्ती मजकुरामध्ये कोणताही बदल नाही.

**ठिकाण : नागपूर**
**दि. 22.06.2023**
**अधिकृत अधिकारी,**
**सेन्ट्रल बैंक ऑफ इंडिया**

**मध्य रेल्वे**
**ई-निविदा सूचना**

**खुली निविदा सूचना क्र.: 21-06-2023 ची GSU-ENGG-2023-18.**
**कामाचे नावः [1] (1)** अमृत भारत स्कीम अंतर्गत घोराडोंगरी (6बे), बेतूल (4बे), आमला (4बे), जुन्नरदेव (2बे), मुल्ताई (3बे), नारखेड (6बे), काटोल (6बे) स्थानक येथे कव्हर ओव्हर शेडची तरतूद,
**(2)** अमृत भारत स्कीमअंतर्गत पांढुर्णा (4बे), हिंगणघाट (6बे), पुलगाव (6बे), धामणगाव (6बे), चंद्रपूर (1बे), बल्लारशाह (8बे) स्थानक येथे कव्हर ओव्हर शेडची तरतूद, **अंदाजे खर्चः** रु. 124043963.24/- **बयणा रक्कमः** रु. 770200.00/- **निविदा बंद होण्याचा दिनांक आणि वेळः 14.07.2023 रोजी 15.00 वाजता.** तपशील रेल्वेची वेबसाईट **www.ireps.gov.in** येथे उपलब्ध
**VAPL/09/121** **वरि. डीईएन (जीएसयू), नागपूर**
**रेल मदद हेल्पलाईनः 139**

Shri Sachhidanand Shikshan Sanstha
**TAYWADE COLLEGE OF PHARMACY**
KORADI, TAH: KAMPTEE, DIS. NAGPUR, MAHARASHTRA PIN CODE :441111
Approved by DTE, PCI Govt. of Maharashtra and Affiliated to RTMNU Nagpur, (NAAC A+Grade).
**Email :** info@tcopkoradi.com | copkoradi@redffmail.com | **Website :** www.tcop.edu.in | **Tel: +91 92620740273, +91 9404309240, +919765301600**

**REQUIREMENTS**

Application are invited form the eligible candidates for the following post

| Subject | Cadre | Total Post | Qualification | Reservation | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | SC | ST | VJ (A/B/C/D) | OBC | SBC | EWS | OPEN |
| Pharmacy | **Principal** | 1 | M. Pharm, PhD | -- | -- | -- | -- | -- | -- | 1 |
| Pharmaceutics / Pharmaceutical Chemistry / Pharmacology / Pharmacognosy | **Professor** | 1 | M. Pharm, PhD | -- | -- | -- | -- | -- | -- | 1 |
| | **Associate Professor** | 4 | M. Pharm, PhD | 1 | -- | 1 | -- | -- | -- | 2 |
| | **Assistant Professor** | 6 | M. Pharm | 2 | 1 | -- | 1 | -- | 1 | 1 |
| Pharmacy | **Librarian** | 1 | M. Lib. | -- | -- | -- | -- | -- | -- | 1 |

**Note :** 1) Qualification, Experience and Pay Scale as per PCI/UGC and Govt. norms.
2) Application along with attested copies of all certificates and biodata should be reached President, Shri Sachhidanand Shikshan Sanstha at Mahadula Koradi, Nagpur on or before 30/06/2023 either personally, email or by post.
3) For more details log in to www.tcop.edu.in.

**President**
Shri Sachhidanand Shikshan Sanstha

# जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि. अमरावती

मुख्य कार्यालय ''जिजाऊ'' प्लॉट क्र. 33 & 34 वालकट कम्पाऊंड, अमरावती. फोन नं. २५६००५७, २५७००५६, फॅक्स नं. (०७२१) २५६६१५६
**Website-** www.jijaubank.org.in **Email -** jijaubankamravati@gmail.com

**ताबा सूचना**


**सिक्यूरिटाईजेशन अँड रिकंस्ट्रकशन ऑफ फायनासियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्यूरिटी इंट्रेस्ट अॅक्ट 2002 च्या अंतर्गत कलम 13(4) अन्वये सिक्यूरिटीज ताब्यात देण्याची पूर्व सूचना**

**ज्याअर्थी जिजाऊ कमर्शियल को-ऑप बँक लि .मुख्यालय अमरावती ,प्राधिकृत अधिकारी या नात्याने वित्तीय प्रतिभूतीकरण व पुनर्रचना आणि प्रतिभूती अमलबजावणी अधिनियम 2002 (2002 ते 54)च्या अंतर्गत तसेच प्रतिभूती हिताधिकार (अमलबजावणी )नियमावली 2002 च्या नियम ८ आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३(२)अंतर्गत खालील नमूद आहे ला मागणी सूचना खालील उल्लेखित खात्यासमोर ही सूचना प्राप्तीनंतर ६० दिवसांच्या आत भरपाई करण्याच्या उद्देशाने सूचना दिली होती. कर्जदार यांनी या रकमेची परतफेड न केल्यामुळे या द्वारा कर्जदार आणि सर्व सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की खालील सही करणाऱ्यांनी उक्त नियमावली नियम ८ व ९ सह वाचल्या जाणाऱ्या आणि उक्त अधि नियमाच्या कलम १३(४) च्या अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून बँकेस गहाण असलेल्या खालील मालमत्तेचा सांकेतिक ताबा बँकेने घेतला आहे. विशेष करून आणि सर्व सामान्य जनतेला या द्वारा वरील संपत्तीच्या विषयी काहीही घेणे न करण्याकरिता जागृत केले आहे. तसेच पुढील संपत्तीच्या विषयी काहीही घेणे न करण्याकरिता जागृत केले आहे. तसेच पुढील संपत्तीचे व रकमेवरील व्याजाचे आणि अन्य खर्चाचे देणेघेणे जिजाऊ कमर्शियल को-ऑप बँक लि व्याजासह इतर प्रभारधीन राहील**

| कर्जदार /जमानतदारांचे नाव | | अचल संपत्तीचे विवरण |
|---|---|---|
| खाते क्र २६/३३५ मुख्य शाखा<br>१)श्री.प्रशांत बाबाराव नागपुरे रा. विजय कॉलनी,कठोरा रोड,ता.जि. अमरावती<br>२)सौ.अर्चना प्रशांत नागपुरे रा. विजय कॉलनी,कठोरा रोड,ता.जि. अमरावती<br>३)श्री.नारायण शंकरराव बाराहाते रा.चन्दन नगर,अकोली रोड, ता.जि. अमरावती<br>४)श्री.संजीव रमेशराव धोटे,रा. चन्दन नगर,अकोली रोड, ता.जि. अमरावती | १) | मौजे-अकोली,प्रगणे-बडनेरा,ता.व जि.अमरावती येथे असलेल्या जमिनीचा सर्व तुकडा फील्ड सर्वे क्र-२२ पैकी गाव फार्म ७/१२ उतारा फील्ड सर्वे न २२/२ नुसार रूपांतरित प्रकरण क्र-NAP-३४/अकोली-११/१९८१-८२नुसार बिगर शेती उद्देशात माननीय ए.डी.टी.पी.अमरावती महानगर पालिकेने दि.२५/०१/२०१० रोजी आदेश क्र१४९/२०१०द्वारे भूखंडाचा उपविभाग मंजूर केला,ज्यामध्ये प्लॉट क्र ८३ भाग आहे,एकूण ३१२०चौ.फुट (२९०चौ.मी)पैकी उत्तर भाग पूर्व-पश्चिम विभाग १६१९.३८चौ.फुट.(१५०.५० चौ.मी.)अमरावती महानगरपालिका अमरावतीच्या हद्दीत आणि उपनिबंधक कार्यालय अमरावती शहराच्या कार्यक्षेत्रात स्थित महानगरपालिका मालमत्ता क्र-४२६२६/३/१ प्रभाग क्र-६८दि.०७/०३/२०११च्या नोंदणीकृत विक्री करार क्र-११७३/२०११ **चतुर्सिमा**-पूर्वेस-लेआऊट, पश्चिमेस-लेआऊट मधील रोड,उत्तरेस- प्लॉट नं-८२ आणि ,दक्षिणेस-त्याच प्लॉटचा भाग. |

**दिनांक २३-०६-२०२३**

**प्राधिकृत अधिकारी**
**जिजाऊ कमर्शियल को -ऑप बँक लि. अमरावती**
**मुख्य कार्यालय "जिजाऊ " प्लॉट क्र.33,34,**
**वालकट कंपाऊंड, अमरावती.**



## कायंदेंविरोधात अपात्रतेची याचिका?

**मुंबई :** शिवसेना आमदार ॲड. मनीषा कायंदे यांनी उद्धव ठाकरे गटातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटात प्रवेश केल्याने त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई करण्यासाठी ठाकरे गट विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याकडे अपात्रतेची याचिका सादर करणार आहे. याबाबत कायदेतज्ज्ञांशी चर्चा सुरू असून दोन-तीन दिवसांत ही याचिका सादर होईल, असे ठाकरे गटातील ज्येष्ठ नेत्याने 'लोकसत्ता'ला सांगितले.

## हाफकिनच्या जागेवर वक्रदृष्टी

(पान १ वरून) आयोजित करण्यात आलेल्या कोणत्याही बैठकीला महामंडळाला बोलविण्यात आलेले नाही. आयुर्विज्ञान अनुसंधान परिषदेला देण्यात आलेल्या या जागेत हाफकिन महामंडळाच्या पोलिओ विभागाची गोदामे आहेत. यामध्ये जगभरात पाठविण्यात येणाऱ्या पोलिओ लशींचे संकलन केले जाते. जागतिक आरोग्य संघटनेच्या निर्देशानुसार गोदामाच्या आजूबाजूचा परिसर मोकळा आणि हवेशीर असणे बंधनकारक आहे. मात्र, या निर्णयामुळे जागतिक आरोग्य संघटनेच्या नियमांचे उल्लंघन होणार आहे. डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अहवालात हाफकिन महामंडळाच्या आवारात बायोटेक हबची निर्मिती करण्यात यावी, असे म्हटले आहे. त्यामुळे भविष्यात हाफकिन महामंडळास जागेची आवश्यकता भासणार आहे. तसेच हाफकिनमध्ये बीएसएल ४ ही प्रयोगशाळा उभारून महामंडळ अधिक सक्षम करण्याऐवजी राज्य सरकार महामंडळाची जागा केंद्र सरकारच्या घशात घालून महामंडळ संपविण्याचा घाट घालत असल्याचा आरोप 'हाफकिन बायो फार्मास्युटिकल कॉर्पोरेशन एम्प्लॉइज युनियन'ने केला आहे. जमीन हस्तांतरणाच्या सरकारच्या निर्णयाचा हाफकिन महामंडळातील संघटनेने निषेध केला आहे.

# ओबीसींनाही पक्षात पद मिळावे!

## छगन भुजबळ यांच्या मागणीने राष्ट्रवादीतील गुंता वाढला

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** विरोधी पक्षनेतेपदाच्या जबाबदारीतून मुक्त करून पक्ष संघटनेत पद मिळावे, अशी अपेक्षा अजित पवार यांनी व्यक्त केली असतानाच, प्रदेशाध्यक्ष किंवा विरोधी पक्षनेते यापैकी एका पदावर



इतर मागासवर्ग समाजातील (ओबीसी) नेत्याला संधी देऊन भाजप व काँग्रेसप्रमाणेच पक्षाने जातीचे समीकरण साधावे, अशी भूमिका माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी गुरुवारी मांडली. अजित पवारांपाठोपाठ भुजबळ यांच्या मागणीने राष्ट्रवादीतील गुंता अधिकच वाढला आहे.

अजित पवार यांनी विरोधी पक्षनेतपदाच्या जबाबदारीतून मुक्त करून पक्ष संघटनेत संधी द्यावी, अशी मागणी करून प्रदेशाध्यक्षपदावर इच्छूक असल्याचे सूचित केले. अजित पवार यांना पक्षाने संधी दिलीच तर आपल्याला विरोधी पक्षनेतेपद मिळावे, अशी जयंत पाटील यांनी इच्छा लपून राहिलेली नाही. भुजबळ यांनी ओबीसी नेत्याला संधी द्यावी, अशी मागणी करून राष्ट्रवादीतील पदांच्या रचनेला वेगळेच वळण दिले. काँग्रेसमध्ये बाळासाहेब थोरात व नाना पटोले असा मराठा व ओबीसी समतोल साधण्यात आला आहे. भाजपमध्ये ओबीसी समाजातील चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे प्रदेशाध्यक्षपद सोपविण्यात आले आहे. राष्ट्रवादीतही प्रदेशाध्यक्ष व विरोधी पक्षनेतेपदापदवर असा समतोल साधता येऊ शकतो. प्रदेशाध्यक्षपदावर ओबीसी किंवा अन्य दुर्बल घटकातील कोणत्या नेत्याची निवड केल्यास वेगळा संदेश जाऊ शकतो. सुनील तटकरे, जितेंद्र आव्हाड किंवा धनंजय मुंडे हे ओबीसी समाजाचे नेते आहेत. अगदी माझ्याकडे जबाबदारी सोपविली तरीही मी स्वीकारण्यास तयार असल्याचे भुजबळ यांनी सांगितले. प्रदेशाध्यक्ष मराठा समाजातील होणार असल्यास ओबीसी समाजाकडे विरोधी पक्षनेतेपद किंवा विरोधी पक्षनेता मराठा असल्यास प्रदेशाध्यक्ष ओबीसी समाजातील नेत्याकडे सोपवावे, अशी मागणी भुजबळ यांनी केली.

### 'माझ्या भावाच्या इच्छा पूर्ण होवोत!'

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** माझ्या दादाला संघटनेत काम करण्याची संधी द्यायची की नाही, याचा निर्णय संघटनात्मक पातळीवरचे नेते घेतील. पण माझ्या भावाच्या इच्छा पूर्ण होवोत,



अशीच माझीही इच्छा असल्याची प्रतिक्रिया खासदार सुप्रिया सुळे यांनी गुरुवारी दिली.

विरोधी पक्षनेतेपदाच्या जबाबदारीतून मुक्त करून मला संघटनेमध्ये काम करू द्यावे, अशी इच्छा अजित पवार यांनी व्यक्त केली. त्याचे राजकीय स्तरावर वेगवेगळे अर्थ काढले जात आहेत. या संदर्भात यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्यक्रमासाठी आलेल्या सुप्रिया सुळे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना 'माझ्या भावाच्या इच्छा पूर्ण होवोत, अशीच माझीही इच्छा आहे', असे मत व्यक्त केले.

त्या म्हणाल्या, ''दादांना संघटनेत पदावर संधी द्यायची की नाही, हा संघटनात्मक पातळीवरील निर्णय आहे. मला मनापासून आनंद आहे, की दादालाही संघटनेत काम करायची इच्छा आहे. त्यामुळे कार्यकर्ता केडरमध्ये उत्साह संचारला आहे. दादांना प्रदेशाध्यक्षपद द्यायचे की नाही हा संघटनात्मक पातळीवरचा निर्णय आहे. पण माझ्या भावाच्या सर्व इच्छा पूर्ण होवोत हीच बहीण म्हणून माझी इच्छा आहे.

■ अजित पवार यांनी पक्ष संघटनेत काम करण्याची इच्छा व्यक्त केली असली तरी पक्षाध्यक्ष शरद पवार कोणती भूमिका घेतात यावर सारे अवलंबून आहे. सुप्रिया सुळे यांची अलीकडेच कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आले. अजित पवार यांच्याकडे प्रदेशाध्यक्षपद सोपवले तर शरद पवार राष्ट्रीय अध्यक्ष, सुप्रिया सुळे कार्याध्यक्ष आणि

### बदल होणार का ?

अजित पवार प्रदेशाध्यक्ष अशी एकाच घरात तीन पदे राहतील आणि राष्ट्रवादी म्हणजे पवार प्रायव्हेट कंपनी, असा प्रचार करण्यास विरोधकांना संधी मिळेल, अशी भीती राष्ट्रवादीला आहे.

■ अजित पवार यांना विरोधी पक्षनेतेपदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्यात आल्यास विरोधी पक्षनेतेपदी कोणला संधी दिली जाईल याबाबत पक्षात चर्चा सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आव्हान देण्याकरिताच ठाण्यातीलच जितेंद्र आव्हाड यांचा विचार होऊ शकतो. भुजबळ यांनी ओबीसी कार्ड बाहेर काढल्याने एका पदावर राष्ट्रवादीला या समाजाला संधी द्यावी लागेल अशी चिन्हे आहेत.

## पंतप्रधान मोदी जुलैमध्ये मुंबई दौऱ्यावर?

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी जुलैच्या पहिल्या आठवड्यात मुंबई दौऱ्यावर येण्याची शक्यता आहे. एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या १०० व्या वर्धापन दिनानिमित्ताने आणि अन्य काही



जनसुविधा प्रकल्पांच्या उद्घाटन कार्यक्रमांसाठी पंतप्रधान मोदींच्या मुंबई दौऱ्याबाबत नियोजन सुरू असल्याचे भाजपमधील सूत्रांनी सांगितले.

आगामी लोकसभा आणि मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य सरकारच्या विविध विभागांनी अनेक प्रकल्पांची भूमिपूजने व उद्घाटन करण्याचे नियोजन केले आहे. पंतप्रधानांच्या मागील दौऱ्यात एमएमआरडीएच्या मेट्रो रेल्वेच्या काही टप्प्यांचे उद्घाटन केले होते. आताही एसएनडीटी विद्यापीठाच्या शताब्दीनिमित्ताने पंतप्रधान मुंबईत आल्यास त्या वेळी अन्य कार्यक्रमही आयोजित करण्याबाबत विचारविनिमय सुरू आहे. पंतप्रधानांचा दौरा पाच-सहा दिवस आधी अंतिम केला जातो. त्यामुळे अजून मोदींच्या दौऱ्याची अधिकृतपणे घोषणा झाली नसली तरी त्याबाबत चर्चा व तयारी सुरू आहे.

# उदयनराजे-शिवेंद्रराजेंमधील वाद मोठा संघर्ष नव्हे!







## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची प्रतिक्रिया

**लोकसत्ता वार्ताहर**

**कराड :** कराडमध्ये मुक्कामास असलेले उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची गुरुवारी सकाळी खासदार उदयनराजे भोसले व आमदार शिवेंद्रराजे भोसले यांनी सदिच्छा भेट घेतली. परंतु या भेटीला काल साताऱ्यात झालेल्या दोन राजेंमधील संघर्षाची किनार होती. याबाबत देवेंद्र फडणवीस यांनी भाष्यही केले. अशा गोष्टी कधी कधी होत असतात असे सांगत त्यांनी याबाबत अधिक बोलणे टाळले.

सातारा बाजार समितीच्या जागेतील भूमिपूजनाच्या अनुषंगाने खासदार उदयनराजे भोसले व आमदार शिवेंद्रराजे भोसले या भाजपच्या उभय नेत्यांमध्ये, तसेच त्यांच्या समर्थकांत शाब्दिक द्वंद भडकले होते. सातारा पोलिसांनी खासदार उदयनराजे व त्यांच्या समर्थकांवर गुन्हाही दाखल केला. त्यामुळे उदयनराजेंविरुद्ध शिवेंद्रराजे असा या दोन बंधूंमधील संघर्ष पुन्हा चर्चेत आला. दरम्यान, दोन राजेंमधील संघर्षाचा हा ताजा अध्याय चर्चेत असताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हे दोन्ही राजे भेटले. काही वेळ चर्चाही झाली आणि लगेचच माध्यमांच्या प्रतिनिधींनी फडणवीसांना गाठले असता, साताऱ्याच्या विकासाच्या मुद्द्यांवर आणि सामाजिक विषयांसंदर्भात दोन्ही राजेंशी चर्चा झाली. सातारमधील ती गोष्ट फार गंभीर घडलेली आहे असे नव्हे, तर अशा गोष्टी होतच असतात, असे सहजपणे बोलत फडणवीसांनी उदयनराजे व शिवेंद्रराजेंमधील जोरदार वाद फार मोठा संघर्ष नसल्याचे स्पष्ट केले.

### विठ्ठलाच्या दर्शनात राजकारण नको!

भाजप विरोधकांची मोट बांधण्यात आघाडीवर असलेले तेलंगणाचे मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव हे आपल्या मंत्रिमंडळासमवेत पंढरपूरला विठ्ठल दर्शनासाठी येत असल्याच्या पार्श्वभूमीवर फडणवीस म्हणाले, की पंढरपुरात या, विठ्ठलाचे दर्शन घ्या. भक्तिभावाने येणाऱ्यांचे इथे स्वागतच असेल. पण, अशा पद्धतीने राजकारणासाठी कोणी येऊ नये, असा टोला फडणवीस यांनी लगावला.

## लोकशाहीत भेदभावाला स्थान नाही !

*(पान १ वरून)* विकास आवश्यक असून त्यासाठी 'क्वाड' गटाच्या माध्यमातून भारत आणि अमेरिका संयुक्तरित्या प्रयत्न करीत असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले. सीमेपलीकडून होणारा दहशतवाद, जागतिक शांतता यासह दोन्ही देशांमध्ये संरक्षण, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सहकार्याबाबत यावेळी चर्चा झाली.

**बायडेन यांना निमंत्रण**

सप्टेंबरमध्ये भारतात होणाऱ्या जी-२० राष्ट्रगटाच्या परिषदेमध्ये सहभागी होण्यासाठी पंतप्रधानांनी बायडेन यांना निमंत्रण दिले. बायडेन यांच्यासह जगभरातील राष्ट्रप्रमुखांच्या स्वागतासाठी आपण आणि भारतीय जनता उत्सुक असल्याचे पंतप्रधान म्हणाले.

### अवकाश संशोधनात सहकार्य

अमेरिकेतील अंतराळ संशोधन संस्था (नासा) आणि 'इस्रो'मध्ये सहकार्याबाबत मोदी आणि बायडेन यांच्यात चर्चा झाली. २०२४मध्ये आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर दोन्ही संस्थांची संयुक्त मोहीम पाठविण्यात येणार असून नागरी अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या 'अर्मेटिस अकॉर्ड'मध्ये भारताच्या सहभागाची घोषणाही यावेळी करण्यात आली.

# कंत्राट देण्यामधील हस्तक्षेपाबाबत ईडीकडून तपास

## करोना केंद्र गैरव्यवहार प्रकरण

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** करोना केंद्र कथित गैरव्यवहार प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) केलेल्या कागदपत्रांच्या तपासणीत करोनामुळे मृत्यू झालेल्या रुग्णांचे मृतदेह ठेवण्यासाठी वापरण्यात आलेल्या पिशव्या व औषधे अधिक किमतीत खरेदी करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे.

या कंत्राटातील तत्कालीन महापौरांच्या हस्तक्षेपाबाबत ईडी तपास करत आहे. त्याशिवाय करोना केंद्रातील तैनात डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांची संख्या कागदोपत्री संख्येपेक्षा कमी असल्याचेही ईडीच्या तपासणीत समजते आहे. या प्रकरणी करोनाकाळात महापालिकेकडून कंत्राट मिळालेल्या ५ ते ७ कंत्राटदार, अधिकारी व त्यांच्या मालमत्तांची ईडी चौकशी करणार आहे. ईडीच्या पथकांनी गुरुवारी भायखळा येथील महापालिकेच्या कार्यालयासह चार ठिकाणी भेट देऊन कागदपत्रांची तपासणी केली.

ईडीच्या तपासानुसार करोनामुळे मृत्यू झालेल्या रुग्णांचे मृतदेह ठेवण्यासाठी वापरण्यात आलेल्या पिशव्या (बॉडी बॅग) पुरवण्याबाबत पालिकेने ज्या कंपनीशी करार केला होता, त्या कंपनीने ६,८०० रुपयांना बॅग पुरवली होती, असे कागदपत्रांच्या तपासणीत निष्पन्न झाले आहे. त्या वेळी इतर खासगी रुग्णालये किंवा सरकारी प्राधिकरणांना त्याच बॅगा दोन हजार रुपयांना देण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. तत्कालीन महापौर किशोरी पेडणेकर यांच्या सूचनेनुसार संबंधित कंत्राट देण्यात आल्याचा ईडीला संशय आहे. त्याबाबतची पडताळणी ईडी करत असून त्यासाठी ईडीने भायखळा येथील महापालिकेच्या कार्यालयात जाऊन गुरुवारी कागदपत्रांची छाननी केली. महापालिकेच्या आरोग्य विभागाशी संबंधित सर्व खर्च भायखळा येथील मध्यवर्ती खरेदी विभागामार्फत (सीपीडी) केला जातो. करोनाकाळात या विभागामार्फत वैद्यकीय उपकरणे खरेदी करण्यात आली होती. त्या कंत्राटाशी संबंधित काही वरिष्ठ अधिकाऱ्यांसह संबंधित व्यक्तींना या प्रकरणी चौकशीसाठी ईडी बोलावण्याची दाट शक्यता आहे.

### आदित्य ठाकरे सूरज चव्हाण यांच्या भेटीला

करोना केंद्रावरील घोटाळ्याप्रकरणी बुधवारी ईडीने शिवसेना ठाकरे गटाचे सचिव सूरज चव्हाण यांच्या चेंबूर येथील निवासस्थानीदेखील छापा घातला होता. त्यानंतर गुरुवारी शिवसेना ठाकरे गटाचे युवासेना अध्यक्ष आदित्य ठाकरे यांनी सूरज चव्हाण यांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली असून सरकारी यंत्रणांना हाताशी धरून हे सरकार नामर्दासारखे लढत असल्याचा आरोप ठाकरे यांनी केला.

महापालिकेला बाजारभावाच्या तुलनेत २५ ते ३० टक्के अधिक दराने करोनाच्या औषधांचा पुरवठा करण्यात आला. ही बाब लक्षात आणून दिल्यानंतरही महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून आहे तीच प्रक्रिया सुरू ठेवण्यात आली, असे ईडीला समजले आहे.

महापालिकेने सादर केलेल्या पावत्यांच्या तुलनेत लाइफलाइन जम्बो कोविड केंद्रात डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांची संख्या प्रत्यक्ष ६० ते ६५ टक्के कमी होती. तसेच पावत्यांमध्ये मेसर्स लाइफलाइन जम्बो कोविड केंद्रात तैनात नसलेल्या डॉक्टरांचीही नावे नमूद केली होती, असे कागदपत्रांच्या तपासणीत ईडीला समजले आहे. सुमारे २०० हून अधिक डॉक्टरांच्या नावाचा वापर करून पैसे स्वीकारण्यात आल्याचा संशय आहे. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये आझाद मैदान पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या गुन्ह्यांच्या आधारावर तपास सुरू आहे.

## शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्यांना बंदी

**मुंबई:** राज्यातील सरकारी-निमसरकारी शाळेतील शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्यांना बंदी घालण्यात आली आहे. तसेच नव्याने सरकारी सेवेत येणाऱ्या शिक्षकांना आता आंतरजिल्हा बदली हवी असेल तर थेट नोकरी सोडण्याची अट घालण्यात आली आहे. एवढेच नव्हे तर शाळेच्या आवारात तंबाखू- तंबाखूजन्य पदार्थ बाळगणाऱ्या शिक्षकांवरही निलंबनाची कारवाई करण्याचे आदेश शिक्षण विभागाने सर्व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

राज्यातील शिक्षकांचा अनुशेष दूर करण्यासाठी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेमधील रिक्त ६५ हजार १११ शिक्षकांच्या पदांपैकी ३० हजार शिक्षकांची भरती करण्यात येत आहे. त्यानुसार २०१७च्या शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणीमधील गुणवत्तेच्या आधारे ही भरती करण्यात येत आहे. मात्र या भरतीमध्ये एका जिल्ह्यात भरती झाल्यानंतर लगेच आपल्या सोयीच्या जिल्ह्यात नियुक्तीसाठी किंवा बदलीसाठी शिक्षकांकडून दबाव आणला जात आहे. त्यामुळे काही जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये अतिरिक्त तर काही जिल्ह्यात शिक्षकांची कमतरता जाणवत आहे.

# 'मविआ' म्हणजे कावळा, घुबड, सरड्याची अभद्र युती!

## चंद्रशेखर बावनकुळे यांची टीका

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**अमरावती :** महाविकास आघाडी म्हणजे कावळा, घुबड व सरड्याची अभद्र युती आहे. घुबड दिवसा काम करू शकत नाही, तो केवळ रात्रीच बाहेर पडतो, कावळा केवळ दिवसा दिसतो आणि सरडा वेळोवेळी रंग बदलतो. सरड्याने गरुडाची साथ सोडली आणि त्याचे दिवस फिरले. अशी ही महाविकास आघाडी टिकणार नाही, अशी टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी रात्री अमरावतीच्या नेहरू मैदानावर आयोजित जाहीर सभेत केली.

बावनकुळे म्हणाले, येत्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत मोठा इतिहास घडणार आहे. तिवसा विधानसभेसह राज्यातील २०० पेक्षा अधिक आमदार व अमरावती लोकसभेसहित ४५ खासदार हे भाजप-शिवसेना युतीचे विजयी होतील. उद्धव ठाकरेंच्या खिशाला कधीच पेन दिसला नाही. मुख्यमंत्री म्हणून ते केवळ दोन वेळा मंत्रालयात गेले. शरद पवारांनी तशी माहिती जगजाहीर करून ठाकरेंच्या या कामाची जाहीर पावतीच दिली. परंतु आता ठाकरे भयंकर अस्वस्थ झाले असून येत्या काही दिवसांत त्यांनी मुंबई महापालिकेत केलेली लूट बाहेर येणार असल्याचा दावाही बावनकुळे यांनी केला.

## महाआघाडीची आज पाटण्यात बैठक

(पान १ वरून) काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी, आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान, पीडीपीच्या प्रमुख मेहबुबा मुफ्ती आदी नेते गुरुवारीच पाटण्यात दाखल झाले. बिहारचे उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांच्या निवासस्थानी राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालूप्रसाद यादव यांच्याशीही ममता बॅनर्जी यांनी चर्चा केली. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे, प्रफुल पटेल तसेच, शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, संजय राऊत शुक्रवारी मुंबईहून पाटण्याला पोहोचतील. दिल्लीतून काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी, के. सी वेणुगोपाल, जयराम रमेश आदी नेतेही शुक्रवारी पाटण्याला रवाना होतील. या बैठकीत सहभागी होण्याआधी पाटण्यातील काँग्रेस कार्यालयात राहुल गांधींचे कार्यकर्त्यांना उद्देशून भाषण होणार आहे.

याखेरीज समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव, 'नॅशनल कॉन्फरन्स'चे प्रमुख फारुक अब्दुल्ला, 'माकप'चे महासचिव सीताराम येचुरी, 'भाकप'चे महासचिव डी. राजा आदी नेतेही बैठकीत सहभागी होणार आहेत. उत्तर प्रदेशातील समाजवादी पक्षाचा मित्रपक्ष राष्ट्रीय लोकदल मात्र बैठकीत सहभागी होणार नाही. पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे उपस्थित राहू शकत नसल्याचे पक्षाचे प्रमुख जयंत चौधरी यांनी जाहीर केले आहे.

# लग्नास नकार दिल्याने हत्या

(पान १ वरून) असून, दर्शनाने लग्नास नकार दिल्याने तिची हत्या केल्याची कबुली आरोपीने दिल्याची माहिती पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

दर्शनाची वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणून निवड झाली होती. एका संस्थेतर्फे आयोजित सत्काराच्या कार्यक्रमासाठी ती ९ जूनला पुण्यात आली होती. नऱ्हे परिसरात एका मैत्रिणीकडे ती राहत होती. १२ जूनला सिंहगडावर जायचे आहे, असे मैत्रिणीला सांगून ती घराबाहेर पडली. तिने कुटुंबीयांनाही तसे कळवले होते. तिचा मोबाइल बंद असल्याचे कुटुंबीयांच्या लक्षात आल्याने त्यांनी शोध सुरू केला. ठावठिकाणा न लागल्याने दर्शना बेपत्ता असल्याची तक्रार सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात देण्यात आली होती. दर्शनाचा मृतदेह आढळल्याने वेल्हे पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

### २९ जूनपर्यंत पोलीस कोठडी

राहुल याचा खून करण्याचा हेतू काय होता, या प्रकरणात त्याने कोणते हत्यार, तसेच वाहन वापरले याचा तपास करायचा असून, ते जप्त करावयाचे आहे. त्याने दर्शना हिचा मृतदेह मिळालेल्या ठिकाणी खून केला आहे, की अन्य ठिकाणी याचा तपास करावयाचा आहे. यामध्ये त्याचे आणखी कोणी साथीदार आहेत का? तसेच फरार झाल्यानंतर तो कोठे वास्तव्यास होता याचा तपास करावयाचा असल्याने सहायक सरकारी वकील योगेश कदम यांनी आरोपीच्या पोलीस कोठडीची मागणी केली. बचाव पक्षाच्या वतीने ॲड. गणेश माने यांनी काम पाहिले. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी युक्तिवाद ऐकून घेत राहुल याला २९ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

# राज्याच्या घशाला कोरड

(पान १ वरून) परिणाम राज्यात असलेल्या धरणांच्या पाणीसाठ्यावर झाला आहे. राज्यातील ६० हून अधिक धरणांमध्ये शून्य टक्के पाणीसाठा आहे. मोठी धरणे असलेल्या उजनी, कोयना, गोसी खुर्द या धरणांतील पाणीसाठा अतिशय खालच्या पातळीवर पोहोचला असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

खडकपूर्णा, बोरगाव अंजनापूर, माजलगाव, मांजरा, रोशनपुरी, सिरसमार्ग, खिराडपुरी, लिंबाला, मदनसुरी, राजेगाव, सीना कोलेगाव, बिंडगिहल, कारसा पोहरेगाव, खुलगापूर, साई, धामणी, बावनथडी, शिरपूर, नंद, धाम डॅम, भावली, चणकापूर, दरणा, काडवा, कारंजवण, पुणेगाव, तिसगाव, वैतरणा, वाघड, वाकीडॅम, दुधगंगा, राधानगरी, तिल्लरी (धामणी), तुळसी, निरा- देवघर, डिंभे, चासकमाण, पिंपळगाव जोगे, वडज, माणिकडोह, घोड, पवना, भाटघर, पानशेत, वरसगाव, गुंजवणी, टेमघर, मुळशी टाटा, लोणावळा टाटा, वारणा, धोम बलकडी, धोम, कोयना, कान्हेर, वीर, उजनी या धरणांचा पाणीसाठा ० ते २० टक्क्यांच्या घरात गेला आहे. सध्याचा राज्यातील सर्व धरणांमध्ये मिळून २३.०५ टक्के पाणीसाठा असून गेल्या वर्षी याच काळात २६.७२ टक्के पाणी होते. गतवर्षीच्या तुलतेन पाणीसाठा ३.६७ टक्क्यांनी कमी असल्यामुळे पाऊस आणखी लांबल्यास पाणीटंचाईची समस्या भीषण होण्याची भीती आहे.

# जबाबदारी सामूहिक, लक्ष्य मात्र जयस्वाल!

(पान १ वरून) जयस्वाल यांच्याकडे सोपविण्यात आली होती. यापैकी बाह्यस्त्रोतांद्वारे वैद्यकीय सेवा पुरविण्याचा ठेका 'मेसर्स लाईफलाईन हॉस्पिटल मॅनेजमेंट सर्व्हिसेस' या कंपनीला देताना अनियमितता झाल्याचा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला होता. याप्रकरणी 'ईडी'ने बुधवारी ठाकरे गटातील नेत्यांच्या निकटवर्तीयांसह मुंबई पालिकेचे तत्कालीन अतिरिक्त आयुक्त संजीव जयस्वाल यांच्यावरही छापे टाकले. अशाप्रकारे 'ईडी'ने एखाद्या सनदी अधिकाऱ्याच्या घरावर छापा टाकण्याची राज्यातील ही पहिलीच घटना आहे.

मुंबईतील करोना केंद्रांची जबाबदारी जयस्वाल यांच्याकडे असली तरी बाह्यस्त्रोतांद्वारे वैद्यकीय सेवा पुरविण्याचा ठेका अंतिम करण्याचे अधिकार एकट्या त्यांच्याकडे नव्हते, अशी माहिती आता पुढे येत आहे. यासंबंधीचा प्राथमिक प्रस्ताव मालमत्ता विभागाच्या सहाय्यक आयुक्तांमार्फत तत्कालीन अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे, मालमत्ता) सुरेश काकाणी यांच्याकडून जयस्वाल यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला. पुढे यासंबंधीच्या ठेक्यांना खुद्द आयुक्त चहल यांनी मान्यता दिली आणि त्यानंतरच संबंधित ठेकेदारांना कार्यादेश देण्यात आले. याप्रकरणी काही महिन्यांपूर्वी 'ईडी'ने चहल यांना चौकशीसाठी बोलावले होते. दिवसभर चहल यांची चौकशी करण्यात आली होती. असे असताना जयस्वाल यांच्यावर मात्र कोणतेही समन्स बजावण्यापूर्वीच थेट छाप्यांची कारवाई करण्यात आल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

**नेमका प्रकार काय?**

मुंबई महापालिकेने करोना काळात शहरातील वेगवेगळ्या उपनगरांमध्ये 'जम्बो कोव्हीड सेंटर' उभारण्याचा निर्णय घेतला होता. या केंद्रांमध्ये बाह्यस्त्रोतांद्वारे वैद्यकीय सेवा पुरविण्याचे ठरविण्यात आले. यासंबंधी मागविण्यात आलेल्या तातडीच्या निविदा प्रक्रियेनंतर निवडण्यात आलेल्या 'मेसर्स लाईफलाईन हॉस्पिटल मॅनेजमेंट सर्व्हिसेस' आणि 'मेसर्स कार्डिॲक हेल्थकेअर' या दोन कंपन्यांशी पालिकेने अंतिम दरासंबंधी वाटाघाटी सुरू केल्या. यानंतर वांद्रे बीकेसी आणि गोरेगाव येथील नेस्को येथील करोना केंद्र प्रती दिवशी प्रती खाटा सहा हजार ते ६४०० रुपये या दराने 'मेसर्स कार्डिॲक हेल्थकेअर' या ठेकेदार कंपनीला चालविण्यास देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## दिनदर्शिका

**शुक्रवार, २३ जून २०२३**
भारतीय सौर २, आषाढ शके १९४५
मिती आषाढ शुक्ल पक्ष
पंचमी १९ : ५४ पर्यंत.
नक्षत्र : मघा अहोरात्र
चंद्र : सिंह

- **मेष** : गरज पूर्ण होईल.
- **वृषभ** : बचत कराल.
- **मिथुन** : उत्कर्ष होईल.
- **कर्क** : पोषक वातावरण राहील.
- **सिंह** : वैवाहिक जीवनात आनंद.
- **कन्या** : शांतपणे मत मांडा.
- **तूळ** : शुभारंभ होईल.
- **वृश्चिक** : कामाची गती वाढेल.
- **धनू** : श्रेय मिळेल.
- **मकर** : कटू बोलणे टाळा.
- **कुंभ** : भागीदारीत यश.
- **मीन** : नियमांचे पालन करा.

**शुभ राशी : मेष, सिंह**


## नेटक्लिप्स

लो : लोकसत्ता .COM

- दर्शना पवार हत्याप्रकरण; आरोपीने कसा रचला हत्येचा कट?; जाणून घ्या घटनाक्रम
- पंतप्रधान मोदींची अमेरिका भेट : पंजाबमधलं तूप, महाराष्ट्रातून काय?; मोदींनी दिलेल्या 'त्या' १० भेटवस्तू पाहा




डाऊनलोड ॲप

व्हिडीओ बघण्यासाठी वरील क्यूआर कोड स्कॅन करा...

- दृश्यकथा
- दैनिक ब्रीफिंग
- वाचनीय लेख
- बातम्यांचा अनुभव

## सर्वाधिक वाचकपसंती

- अग्रलेख : मोठेपणासाठी महत्त्वाचे!
- '...याचा अर्थ अजितदादांची राष्ट्रवादीत जास्त घुसमट होतेय', शिंदे गटाच्या नेत्याचं थेट विधान
- 'मातोश्रीवरून जे वरळीला गेले नाहीत ते मोदींना मणिपूरला...', देवेंद्र फडणवीसांचा उद्धव ठाकरेंना टोला
- दहावी उत्तीर्णांसाठी आनंदवार्ता! सरकारकडून जेईई, निटच्या तयारीसाठी मिळवा लाखोंची मदत; जाणून घ्या सविस्तर...

# इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लि.

(पूर्वीची इक्विटास फायनान्स लि.)
**कॉर्पोरेट कार्यालयः** क्र. 769, स्पेन्सर प्लाझा, चौथा मजला, फेज-II , अण्णा सलाई , चेन्नई, तामिळनाडू-600 002.
# 044-42995000, 044-42995050

## अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8(6) सह वाचण्यात येणाऱ्या सर्फेसीअधिनियम 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना**

याद्वारे कर्जदार, सह-कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनको कडे तारण असलेल्या खाली नमूद अचल मालमत्तेचा इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लि. च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून त्यांची इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लि. यांना खालील कर्जदारांकडून खाली नमूद रकमेच्या वसुलीसाठी "जशी आहे जेथे आहे" आणि "जशी आहे ज्या स्थितीत आहे" तत्त्वावर दि.12-07-2023 रोजी विक्री करण्यात येईल.

| कर्जदार आणि जामीनदाराचे नाव आणि पत्ता एकूण थकबाकी रक्कम + पासूनचे व्याज | अनामत मत्तेचे वर्णन (अचल मालमत्ता) |
|---|---|
| 1. **श्री. विनोद शिवाजी जगताप,** वडिलांचे नाव श्री. शिवाजी, 2. **श्रीमती वैशाली विनोद जगताप,** पतीचे नाव श्री. विनोद शिवाजी जगताप, (दोघेही राहणार येथे क्र. मनिलालाल दादा नगर, इटाणा वॉर्ड, तह. पुसद, जिल्हा यवतमाळ, महाराष्ट्र - 445204)<br>**कर्ज खाते क्र.** SEPUSAD0265903,<br>02.07.2021 रोजी दावा केलेली रक्कम रु. 1302292/- यासह मासिक हप्ते, शुल्क आणि खर्च इत्या., (13.06.2023 रोजीची एकूण थकबाकी रक्कम रु. 1997548/-) | लेआऊट परिवर्तीत प्लॉट क्र. 25, जुनी मालमत्ता क्र. 121, क्षेत्रफळ सुमारे 1614 चौ.फू. (म्हणजे 150 चौ.मी.), मौजा-वारुड, शेत सर्वे क्र. 20/2-सी मधील, ग्रामपंचायत वारुड यांच्या हद्दीत, तह. पुसद, जिल्हा यवतमाळ, उत्तरेस- प्लॉट क्र. 26, दक्षिणेस - प्लॉट क्र. 24, पूर्वेस- 9 मीटर लेआऊट रस्ता, पश्चिमेस- श्री. तेतर यांची जमीन, क्षेत्रफळ सुमारे 1614 चौ.फू., उप-नोंदणी जिल्हा पुसद आणि नोंदणी जिल्हा यवतमाळ यांच्या हद्दीत, कांचीपुरम, यासह वर्तमान व भविष्यातील तेथील सर्व इमारती आणि जमिनीवरील किंवा जमीनिस जोडलेली कोणतीही संरचना किंवा वस्तु सोबत तेथील वाहिवाटीचे / मामुल अधिकार.<br>**आरक्षित किंमतः** रु. 950000/- **बयाणा रक्कमः** रु. 95000/-<br>**संपर्क व्यक्ती – सागर चंदनशिवेः 9762651010 आणि विवेक औषलः 9011460034** |

**लिलाव दिनांकः 12-07-2023**

ई-लिलाव विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया www.equitasbank.com आणि https://sarfaesi.auctiontiger.net येथे दिलेली लिंक पाहावी.

दिनांकः 23.06.2023
स्थानः यवतमाळ

प्राधिकृत अधिकारी
इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लि.



# सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया Central Bank Of Ind

## ताबा सुचना (नियम 8(1) सरफेसी नियमाअतर्गत

ज्याअर्थी खालील सही करणा-यांनी सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफ फाइनांशियल अॅसेट्स अॅन्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट 2002(54 चे 2002) च्या अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स 2002 मधील नियम 3 सह वाचल्या जाणा-या कलम 13(12) आणि 13(2) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अधिकृत अधिकारी या नात्याने सुचनेत नमुद केलेल्या रकमेची उक्त सुचना प्राप्त होणा-या तारखेपासून 60 दिवसाच्या आत परतफेड करण्याची मागणी सुचना प्रस्तुत केले होते.
कर्जदार / जमानतदार हे रकमेची परतफेड करण्यास अपयशी ठरल्याने कर्जदार / जमानतदार व सर्व सामान्य जनतेला या सुचनेव्दारे सुचित करण्यात येते की खालील सही करणा-याने सिक्युरिटी (एनफोर्समेंट) नियम 8 सह वाचण्यात येणा-या सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13 मधील उप-नियम (4) अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून खालील वर्णन केलेल्या संपत्तीचा सांकेतिक ताबा घेतलेला आहे.
विशेषतः कर्जदार व जमानतदार आणि सर्व जनतेला या सुचनेव्दारे खालील लिहिलेल्या संपत्तीबाबत कोणताही व्यवहार न करण्याची ताकीद दिली जाते आणि या संपत्ती संदर्भात कोणतेही व्यवहार हे सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया च्या प्रभाराधीन राहील.
ताब्यातील संपत्तीची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेत (Right of/Redemption) कायद्याच्या कलम 13 मधील उप-कलम (8) मधील तरतुदीसाठी कर्जदाराचे विशेष लक्ष आमंत्रित केले आहे.

| अ. क्र. | कर्जदार यांचे नाव | शाखेचे नाव | अचल संपत्तीचे विवरण | डिमांड नोटीस दिनांक कर्जाची थकीत रक्कम | ताबा घेतल्याची दिनांक आणि ताब्याचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री. महादेव बंडुजी मोहाडीकर (कर्जदार) आणि श्री. आकाश महादेव मोहाडीकर (सह-कर्जदार) | मस्का साथ शाखा | सर्व भाग आणि तुकडा समाविष्ट संपत्ती प्लॉट नं. 895 क्षेत्रफळ 55.74 चौ.मी (600 चौ.फुट) सक्करदरा रस्ता स्किम एनआयटी खा. नं. 25,27 / 2, मौजा- बिडीपेठ, वार्ड नं. 20, विभागणी- दक्षिण ता आणि जि. नागपूर आणि चतुर्सिमा:- उत्तर: प्लॉट नं. 894, पुर्व: प्लॉट नं.900, पश्चिम: रोड, दक्षिण: प्लॉट नं. 896 | 17/03/2023 रु. 2,65,149.30/- तसेच त्यावरील पुढील व्याज | **17.06.2023** सांकेतिक ताबा |

शाखा : नागपूर
दिनांक : 17/06/2023

(विवादातील स्थितीमध्ये इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राहय धरण्यात येईल)

प्राधिकृत अधिकारी,
सेंट्रल बँक ऑफ इंडिया



# SBI

एनीटाईम चॅनेल्स, कॉर्पोरेट सेंटर,
तीसरा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर आर्केड, कफ परेड, मुंबई – ४००००५

## निविदा आमंत्रित करण्याप्रती सूचना

भारतीय स्टेट बँक द्वारे XVI फेज अंतर्गत 7500 CAPEX ADWMs च्या खरेदीसाठी दिनांकित २३.०६.२०२३ आरएफपी क्र. SBI/ACV/२०२३–२४/००२ अंतर्गत पात्र बोलीदारांकडून बोली मागवत आहे. बोली सादर करण्यसाठी इच्छुक बोलीदारांनी बँकेच्या वेबसाइट **https://bank.sbi, https://gem.gov.in,** (GeM पोर्टल) आणि **www.eprocure.gov.in** (CPPP पोर्टल) वर 'प्रोक्योरमेंट न्यूज' ला भेट द्या.
आरएफपी डाउनलोड करण्याचा कालावधी: २३.०६.२०२३ दुपारी ०५:०० वाजल्यापासून
बोली लावण्याची अंतिम तिथी आणि वेळ: २१.०७.२०२३ दुपारी ०५.०० वाजेपर्यंत

स्थान: मुंबई
दिनांक: २३.०६.२०२३

स्वाक्षरी/–
उप महाव्यवस्थापक
(अंमलबजावणी व रोल आउट)



BACKWARD CLASS YOUTH RELIEF COMMITTEE'S

# BHAUSAHEB MULAK NURSING COLLEGE, NAGPUR

COLLEGE CODE:09245
Great Nag Road, Nandanvan, Nagpur - 440009
Mo.: 9834927736, 9730291681, Email : principalbmnc@gmail.com

## WANTED

Applications are invited from the eligible candidates for filling up the following posts for B. Sc. Nursing

| S.N. | Name of the Post | Required Post | Category |
|---|---|---|---|
| 02 | Associate Professor OBGY | 01 | 1 OPEN |
| 03 | Asst. Professor Lecturer (a) MHN | 01 | 1 SC |
| 05 | Clinical Instructor | 09 | 2 SC, 1 ST, 1 VJ-A, 1 NT-B, 1 NTC, 1 OBC, 1 EWS, 1 OPEN |

Post reservation as per Govt. / MUHS, Nashik.
**Requisite Qualification:**- Basic B. Sc. Nursing /Post B. Sc. Nursing / M. Sc. Nursing & Experience required as per MNC/INC/MUHs Norms.
Apply to the Secretary /Principal, Bhausaheb Mulak Nursing College, Nagpur on plain paper/Prescribed format along with attested copies of all relevant Certificates on or before **30/06/2023**

PRINCIPAL — Trustee & Chairman

ANUP



# मोतीलाल ओस्वाल होम फायनान्स लिमिटेड

MOTILAL OSWAL HOME LOANS
**नोंदणीकृत कार्यालयः** मोतीलाल ओस्वाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी मार्ग, परळ एसटी डेपोसमोर, प्रभादेवी, मुंबई-400 025.
**टेलीफोनः** (022) 47189999 **वेबसाईटः** www.motilaloswalhf.com **ईमेलः** hfquery@motilaloswal.com

## मागणी सूचना

**सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 च्या अनुच्छेद 13(2) अंतर्गत सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 (सदर नियम) मधील नियम 3(1) सह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002(सदर अधिनियम) च्या अनुच्छेद 13(2) अंतर्गत. सदर नियमांमधील नियम 3 सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13(2) अंतर्गत मागणी सूचना जारी केलेल्या आहेत ज्यांत कर्जदार/सह-कर्जदार, जामीनदारांना त्यांना निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांमध्ये नमूद कर्जाच्या रकमेची परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वरील संदर्भात सर्व पक्षांना पुन्हा एकदा सूचित करण्यात येते की त्यांनी ही सूचना प्रकाशित होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत खाली नमूद रकमांची मागणी सूचनेच्या दिनांकापासून भरण्याच्या दिनांकापर्यंतच्या व्याजासह परतफेड करावी. मागणी सूचनेच्या दिनांकास कर्जदाराकडून घेणे असलेली थकबाकी रक्कम आणि कर्जाच्या रकमेच्या परतफेडीची हमी म्हणून देऊ केलेल्या अनामतीचा तपशील खालीलप्रमाणे आहेः

| अ. क्र. | कर्ज करार क्र./कर्जदाराचे / सह-कर्जदाराचे / सह-अर्जदाराचे/ जामीनदाराचे नाव | मागणी सूचनेचा दिनांक व रक्कम | अनामत मत्तेचे वर्णन (अचल मालमत्ता) |
|---|---|---|---|
| 1 | **LXAMR00418 -190071802 / दिनेश यशवंत शहाणे** | 08-जून-23/ रु.964226/- (रुपये नऊ लक्ष चौसष्ट हजार दोनशे सव्वीस फक्त) | प्लॉट क्र. 107, स.क्र. 290/3, 291/2/ए, 291/3, शिवनगरी, मौजा-तिवासा, जिल्हा अमरावती, महाराष्ट्र 444903 |
| 2 | **LXAMR00316-170041811 / विजया सतीशराव आढाऊ/ सतीश सदाशिवराव आढाऊ** | 08-जून-23/ रु. 655231.4/- (रुपये सहा लक्ष पंचावन्न हजार दोनशे एकतीस आणि चाळीस पैसे फक्त) | मालमत्ता क्र. 152, वॉर्ड क्र. 2, ग्रामपंचायत तरोडा, तह. मोर्शी, जिल्हा अमरावती, महाराष्ट्र 444905 |
| 3 | **LXBHA00316-170041060 / मोरेश्वर मोतीराम झांझड / नोगेश मोरेश्वर झांझड / शकुंतला मोरेश्वर झांझड / रिंकू राकेश वढाई** | 06-जून-23/ रु. 1012264/- (रुपये दहा लक्ष बारा हजार दोनशे चौसष्ट फक्त) | प्लॉट क्र. 23, गट क्र. 120/03/54, नवीन साई नगर, ताज पेट्रोल पंपाजवळ, खात रेड, खोकर्ला, तह. आणि जिल्हा भंडारा 441904, महाराष्ट्र |
| 4 | **LXBUL00116-170050051 / मधुकर नारायण घोंगे / सुनीता मधुकर घोंगे** | 08-जून-23/ रु. 1051327/- (रुपये दहा लक्ष एक्कावन्न हजार तीनशे सत्तावीस फक्त) | प्लॉट क्र. 23, स.क्र. 59, मौजा देऊळगाव राजा, बुलढाणा, महाराष्ट्र 443204 |
| 5 | **LXYAV00116-170030505 / मोहन विठ्ठलराव वरझडकर / वैशाली मोहन वरझडकर / विमलाबाई विठ्ठल वरझडकर / अर्पिता मोहन वरझडकर (अल्पवयीन)** | 06-जून-23/ रु. 1151526/- (रुपये अकरा लक्ष एक्कावन्न हजार पाचशे सव्वीस फक्त) | प्लॉट क्र. 11 (भाग), स.क्र. 40/1, राणी सती नगर, तुळजा नगर जवळ, अर्णी रोड, वडगाव, तहसील आणि जिल्हा यवतमाळ, महाराष्ट्र - 445001 |
| 6 | **LXGON00317-180064464 / प्रीतपाल सिंग चंचल सिंग गोराया / छांछलसिंग ज्ञानसिंग गोराया** | 06-जून-23/ रु. 298166/- (रुपये दोन लक्ष अठ्ठ्याण्णव हजार एकशे सहासष्ट फक्त) | मालमत्तेचा पत्ता - टी.एस. क्र. 30, गट क्र. 98, ठक क्र. 92, मौजा फुलचुर, पोलिटेक्निक कॉलेजजवळ, सेल्स टॅक्स कॉलनी, तह. आणि जिल्हा गोंदिया, महाराष्ट्र - 441601, पूर्वेस- 15 फुट रस्ता, पश्चिमेस- 3 फुट गल्ली, उत्तरेस- इतरांची जमीन, दक्षिणेस- इतरांची जमीन |
| 7 | **LXMYS00217-180067450 / रवी सुब्बाण्णा / मनी चिक्कादेवनायका** | 08-जून-23/ रु. 231413/- (रुपये दोन लक्ष एकतीस हजार चारशे तेरा फक्त) | क्र. 3544, एल-5/ए, जवारती बिडी, वीरंगेरे, लष्कर मोहल्ला, हॉटेल बीएस इंटरनॅशनल जवळ, मैसूर, कर्नाटक 570001. |
| 8 | **LXNAG00315-160021283 / किशोर गुलाबरावजी राऊत / सविता किशोर राऊत** | 21-एप्रि-23/ रु. 2431791/- (रुपये चोवीस लक्ष एकतीस हजार सातशे एक्क्याण्णव फक्त) | प्लॉट क्र. 46, मौजा गोधनी, प.ह.क्र. 12, ख.क्र. 149, व्यंकटेश नगर, टी.एम. विलकेन्सन शाळेजवळ, गोधनी, नागपूर, महाराष्ट्र 440030 |
| 9 | **LXNAG00316-170037768 किशोर गुलाबरावजी राऊत / सविता किशोर राऊत** | 21-एप्रि-23/ रु. 2431791/- (रुपये चोवीस लक्ष एकतीस हजार सातशे एक्क्याण्णव फक्त) | प्लॉट क्र. 46, मौजा गोधनी, प.ह.क्र. 12, ख.क्र. 149, व्यंकटेश नगर, टी.एम. विलकेन्सन शाळेजवळ, गोधनी, नागपूर, महाराष्ट्र 440030 |
| 10 | **LXWAS00316-170042100 / सतीश अरुण घरदीनकर / अरुण मुकुंदा घरदीनकर** | 08-जून-23/ रु. 528815/- (रुपये पाच लक्ष अठ्ठावीस हजार आठशे पंधरा फक्त) | प्लॉट क्र. 17 (भाग), गांधी नगर, कारंजा, जिल्हा वाशिम, महाराष्ट्र 444105 |

सदर कर्जदार वर नमूद केल्याप्रमाणे एमओएचएफएल कडे भरणा करण्यात असमर्थ ठरल्यास एमओएचएफएल द्वारे सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13(4) अंतर्गत आणि लागू असलेल्या नियमांप्रमाणे कर्जदाराच्या खर्चाने व त्याला भोगाव्या लागणाऱ्या परिणामांनुसार वरील अनामत मत्तांविरुद्ध कारवाई करण्यात येईल. सदर कर्जदारांना सदर अधिनियमांतर्गत एमओएचएफएल च्या लेखी पूर्व-परवानगीशिवाय वरील मत्तांचे विक्री, भाडेकरार किंवा अन्य कोणत्याही मार्गाने हस्तांतरण करण्यास प्रतिबंध करण्यात येतो. कोणत्याही व्यक्तीने सदर अधिनियमातील किंवा त्यातील नियमांमध्ये अंतर्भूत तरतुदीचे उल्लंघन केल्यास किंवा तसे करण्यास चिथावल्यास सदर अधिनियमात तरतूद केल्यानुसार तुरुंगवासास आणि/किंवा दंडास पात्र ठरेल.

**स्थानः महाराष्ट्र**
**दिनांकः 23.06.2023**
**भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.**

स्वा/-
प्राधिकृत अधिकारी
(मोतीलाल ओस्वाल होम फायनान्स लिमिटेड)



# HDFC BANK

We understand your world
**रजि. ऑफिस :** एचडीएफसी बँक लि., एचडीएफसी बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (प.), मुंबई–४०००१३.
**शाखा :** रिटेल पोर्टफोलिओ मॅनेजमेंट, **एचडएफसी बँक लि.,** ३ रा मजला, लँडमार्क बिल्डिंग, गोरक्षण रोड, जुने आयटी स्क्वेअर, अकोला ४४४ ००१.

## विक्रीची जाहीर सूचना ( सरफेसी कायदा २००२ नुसार )

**सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट रूल्स २००२ प्रमाणे 'जशी आहे तशी आणि जे काही आहे ते' या तत्वानुसार स्थावर मालमत्तेची विक्री.**

| कर्जदार / जामिनदार यांची नांवे आणि कर्ज खाते क्रमांक | वसुल करावयाची थकबाकी (सुरक्षित कर्ज) | तारण स्थावर मालमत्तेचे स्थान व तपशील | राखीव किंमत व बयाणा रक्कम रु. | मालमत्ता तपासणीची तारीख | ई-ऑक्शन तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १) **कृष्णा सेल्स कॉर्पोरेशन**, शॉप क्र. ०३, विंग 'ए', इमारत क्र.०५, ड्रीमलँड बिझनेस पार्क, मोरशी रोड, मौजे बोरगाव परगणे, नंदगावपेठ, ता. व जि. अमरावती.<br>२) **प्रकाश राजकुमार चिमणानी,** १) सक्करसाठ जव्हार गेट, पेट्रोलपंपाजवळ, शनी मंदिर, अमरावती. २) लाईन क्र. ०१, मिथ्यु चक्की, रामपुरी कँप, शिवाजी नगर, अमरावती.<br>३) **सिमाराणी राजकुमार चिमणानी,** लाईन क्र. ०१, मिथ्यु चक्की, रामपुरी कँप, शिवाजी नगर, अमरावती.<br>**( कर्ज खाते क्र.: ८३३३२७३३ )** | दि. २८/०८/२०२० पर्यंतची रक्कम रु. ७२,४८,२११/- | नंदगाव, बोरगाव परगणे, मोरशी रोड, नंदगाव पेठ, ता. व जि. अमरावती – ४४४ ९०१ येथील ड्रीमलँड बिझनेस पार्कच्या 'ए' विंग मधील इमारत क्र. ०५, शॉप क्र. ०३ ही मिळकत. | राखिव किंमत : ६४,७५,४६४/-<br>बयाणा रक्कम : ६,४७,५४६/- | दि. ०७.०७.२०२३ स. ११.०० ते दु. ०२.०० दरम्यान. | १२.०७.२०२३ स. ११.०० ते दु. १२.०० ५ मिनिटाच्या अमर्याद वाढीव कालावधीसह |

*लागू असलेल्या भविष्यातील व्याज, प्रासंगिक खर्च, किंमत, देयकाच्या तारखेपर्यंत आणि / किंवा वसुली करण्यापर्यंतचे शुल्क, इ.

टिप : **एचडीएफसी बँक लि.** च्या अधिकृत अधिकारी (ए.ओ.) यांच्या उत्तम ज्ञान आणि माहितीनुसार बँकेशिवाय इतर कोणताही बोजा सदर मालमत्तेवर नाही.

वर उल्लेखीत सुरक्षित मालमत्तेसंबंधीतील माहिती खाली सही करणाऱ्या अधिकृत अधिकाऱ्याच्या माहितीप्रमाणे बँकेकडील उपलब्ध माहितीनुसार आहे. परंतु, या तपशीलात कोणत्याही त्रूटी / चुकीच्या सूचना / तपशील वगळला असल्यास त्यास बँक जबाबदार असणार नाही. निविदा सादर करण्यापूर्वी इच्छुक बोलीदार / तसेच खरेदीदारं यांना विनंती करण्यात येते की त्यांनी वरील गोष्टींबद्दल स्वतःचे समाधान करून करण्यास आणि वर नमूद केलेल्या मालमत्तासबंधीत इतर तपशीलाची सर्व माहिती घ्यावी.

**विक्रीच्या अटी व शर्ती : (१)** निविदा फॉर्ममधील व या जाहिरातीत अंतर्भूत असलेल्या अटी व शर्तींप्रमाणेच विक्री होईल. अधिकृत अधिकारी, **एचडीएफसी बँक लि., रिटेल पोर्टफोलिओ व्यवस्थापन, ३ रा मजला, लँडमार्क बिल्डिंग, गोरक्षण रोड, जुने आयटी स्क्वेअर, अकोला ४४४००१** येथून टेंडर फॉर्मस् **कोणत्याही कामकाजाच्या दिवशी** उपलब्ध होऊ शकतील किंवा या **https://hdfcbank.auctiontiger.net** वेबसाईटवरुन डाऊनलोड करून घेऊ शकता. मालमत्ता तपासणी वर उल्लेख केलेल्या तारखेवर आणि वेळेवर करू शकता. **(२) ०७.०७.२०२३, सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** सिलबंद निविदा ( केवळ विहित निविदा फॉर्ममध्ये ) बयाणा रकमेच्या १०% रक्कमेसहित **एचडीएफसी बँक लि., रिटेल पोर्टफोलिओ व्यवस्थापन, ३ रा मजला, लँडमार्क बिल्डिंग, गोरक्षण रोड, जुने आयटी स्क्वेअर, अकोला ४४४००१** येथे जमा करणेच्या आहेत. शेड्युल्ड बँकेचा डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डरने **एच.डी.एफ.सी. बँक लि.** च्या नावे **अकोला येथे देय** असणारे देयक स्वीकारले जाईल. विना पैशाची अथवा तारखेनंतर आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. वर उल्लेखित तारखेला व वेळेला ई–लिलाव संपन्न होईल. **(२) (१)** उक्त मालमत्तेसाठी बोली वाढीव मुल्य **रु. ५०,०००/–** असेल. **(३) दस्तऐवज :** निविदा दस्तऐवज/ई–बिडिंग कॅटलॉगसह निविदाकारांनी त्याच्या/तिच्या फोटो ओळख पुराव्याची प्रतदेखील जोडली पाहिजे. जसे की, पासपोर्टची प्रत/निवडूक आयोगाचे कार्ड/ड्रायव्हिंग लायसेन्स / आयकर विभागाने जारी केलेल्या पॅन कार्डची प्रत/आधार कार्ड इ. कृपया लक्षात घ्या की, निविदाकार / ऑफरकर्त्याने स्वतः/स्वतःद्वारे प्रति स्वाक्षरी केलेल्या रहिवासाचा पुरावादेखील प्रदान करणे आवश्यक आहे. **(४)** जर तो/ती/त्यांनी विक्रीच्या सर्व अटी व शर्तीचे पालन करून कर्जदार, संबंधित निविदाधारक, तारणदार / जामिनदार किंवा विक्रीच्या मालमत्तेचा मालक त्यांची इच्छा असल्यास विक्रीसाठी देऊ केलेल्या मालमत्तासाठी/तिला/त्यांच्या सर्वोत्कृष्ट संभाव्य वैद्य ऑफर (प्रायोजक)/प्रायोजक देऊ शकतात. **(५)** ऑनलाईन लिलावादरम्यान निविदाधारकांना/संभाव्य खरेदीदारांना त्यांच्या ऑफरमध्ये वाढ/सुधारणा करण्याची संधी दिली जाईल. ऑनलाईन लिलावात सहभागी होणाऱ्या निविदाधारक/संभाव्य खरेदीदारांसाठी अतिरिक्त अटी व शर्ती आहेत : **(अ)** ई–प्रोक्युरमेंट टेक्नॉलॉजी लिमिटेड ( ऑक्शन टायगर ) ऑनलाईन लिलाव आयोजित करण्यात अधिकृत अधिकाऱ्याला मदत करत आहेत. **(ब)** ऑनलाईन लिलावामध्ये सहभागी होण्यासाठी तपशीलवार अटी आणि नियम, स्वरुप, अर्ज घोषणा, इ. https://hdfcbank.auctiontiger.net वेबसाईट वरून डाऊनलोन केले जाऊ शकतात. **(क)** वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे विहित तारखेच्या आत आणि वेळेत मिळाल्यावर, https://hdfcbank.auctiontiger.net येथे ऑनलाईन लिलावात सहभागी होण्यासाठी पात्र निविदाकार/संभाव्य खरेदीदारांना मे. ई–प्रोक्युरमेंट टेक्नॉलॉजी लिमिटेड यांच्याद्वारे पासवर्ड/वापरकर्ता आयडी प्रदान केला जाईल. त्यासाठी मे. ई–प्रोक्युरमेंट टेक्नॉलॉजी लिमिटेड यांच्याद्वारे आवश्यक ते प्रशिक्षण दिले जाईल. **(६)** मालमत्ता कर/ उपकर आणि/किंवा बिल्डर/सोसायटीची देयके, इमारत दुरुस्तीच्या निधीतील योगदान, हस्तांतरण शुल्क, इतर कोणतेही कर इत्यादींसारख्या वैधानिक देयांची निविदाकार/प्रस्तावक/ संभाव्य खरेदीदाराने भरावे. स्टॅप ड्युटी, कायदेशीर शुल्क, नोंदणी शुल्क आणि जीएसटी अमलात आणल्या जाणाऱ्या विक्री प्रमाणपत्राच्या संदर्भात लागू असल्यास एकट्या खरेदीदाराने भरावे. **(७)** खरेदीदार म्हणून घोषित केलेल्या व्यक्तीने, अशा घोषणेनंतर, खरेदीच्या रकमेपैकी २५% रक्कम तात्काळ 'अधिकृत अधिकाऱ्याकडे' जमा करावी आणि उर्वरित ७५% रक्कम लिलावाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत जमा करावी. यात जर अपयश आले तर मालमत्ता त्वरीत पुन्हा विक्रीसाठी ठेवली जाईल आणि पुनर्विक्री केली जाईल.

**निविदा दस्तऐवज / ई–बिडिंग कॅटलॉग मिळविण्यात किंवा स्थावर मालमत्तेची/सुरक्षित मालमत्तेची तपासणी करण्यात काही अडचण आल्यास आणि काही शंकांसाठी कृपया एचडीएफसी बँक लिमिटेडच्या संबंधित अधिकारी – श्री. सुनील कुमठेकर – ९३७१६१९५९६, श्री. सचिन बोचरे – ९८५०५२२२३३ यांच्याशी किंवा ईमेल: sunil.kumthekar@hdfcbank.com , sachin.bochare@hdfcbank.com व ई–प्रोक्युरमेंट टेक्नॉलॉजीज् लिमिटेड ( ऑक्शन टायगर ), अहमदाबादचे अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. बिडर सपोर्ट नंबर्स: ९२६५५६२८२१, ०७९–६१२००५९४/५९८/५६८/५८७/५३८, ई–मेल: gujarat@auctiontiger.net व chintan.bhatt@auctiontiger.net** कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्वीकारण्याचा / नाकारण्याचा व संपूर्ण लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार एचडीएफसी. बँकेने स्वतःकडे राखून ठेवला आहे.

**ही सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८(६) अंतर्गत कर्जदार/गहाणदार यांना ३० दिवसांची नोटीस म्हणूनदेखील विचारात घेतली जावी.**

( इंग्रजी नोटीसीचे हे भाषांतर असून अर्थबोध होण्यासाठी इंग्रजी मसुदाच ग्राह्य धरण्यात येईल. )

दिनांक: २२/०६/२०२३ ठिकाण : अकोला.

सही/–, अधिकृत अधिकारी, एचडीएफसी बँक लि.



# इंडो रामा सिन्थेटिक्स (इंडिया) लिमिटेड

नोंदणी कार्यालय : ए–३१, एम.आय.डी.सी. इंडस्ट्रियल एरीया, बुटीबोरी, नागपूर ४४११२२, महाराष्ट्र
टेलीफोनः 07104-663000 / 01, फॅक्स : 07104-663200, सी.आय.एन.: L17124MH1986PLC166615
ई–मेलः corp@indorama-ind.com, वेब साइटः www.indoramaindia.com

## व्हिडीओ कॉन्फरंस/अन्य ऑडिओ व्हीज्युअल साधनांद्वारे ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्याबाबत सुचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी सदस्यांची ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) गुरुवार, २७ जुलै, २०२३ रोजी स.११.३० वाजता व्हिडीओ कॉन्फरसिंग (व्हीसी)/अन्य ऑडिओ व्हिज्युअल साधनाद्वारे सामान्य ठिकाणी सभासदाच्या प्रत्यक्ष उपस्थिती शिवाय, दृकश्राव्य स्वरुपाने (ओएव्हीएम) मार्फत एजीएम सूचनेत नमुद विषयावर विचारविनिमय करण्याकरिता होणार आहे. कंपनी अॅक्ट २०१३ (द अॅक्ट) च्या तरतुदींचे पालन आणि त्या अंतर्गत तयार केलेल्या नियमांचे पालन करुन कार्पोरेट व्यवहार मंत्रालय (एमसीए) च्या सामान्य परिपत्रक क्र. २०/२०२० दिनांक ०५ मे २०२० रोजी परिपत्रक क्र. १०/२०२२, दिनांक २८ डिसेंबर २०२२ रोजी या विषयावरील इतर संबंधित परिपत्रकांसह वाचल्या असता सिक्युरीटीज अॅन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) द्वारे दिनांक १३ मे २०२२ रोजी जारी केलेल्या परिपत्रक क्रमांक सेबी/एचओ/सीएफपी /सीएमडी२/सीआयआर/पी/२०२२/६२ यासंदर्भात एमसीए किंवा सेबी ने जारी केलेल्या इतर कोणत्याही लागु पत्रिकांसह, एजीएम ठरावासाठी सुचनेमध्ये नमुद केलेल्या व्यवसायाचे व्यवहार करण्यासाठी सुचना देण्यात येत आहे.

नमुद केलेल्या एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रकांच्या अनुपालनानुसार ३७ व्या एजीएम नोटीसच्या आणि वित्तीय वर्ष २०२२–२३ करीता वार्षिक अहवालाच्या ईलेक्ट्रानिक प्रति ज्या सभासदांचे ई–मेल पत्ता कंपनी /डिपॉझिटरीकडे नोंदणीकृत आहेत अशा सर्व सदस्यांना सहभागी होण्यासाठी कंपनी कायदा २०१३ आणि सेबी (एलओडीआर) रेग्युलेशन्स २०१५ च्या तरतुदीनुसार पाठविले जातील.

तुमचा ई–मेल आयडी कंपनी /डिपॉझिटरी पार्टीसिपेंटकडे अगोदरच नोंदणीकृत असल्यास रिमोट ई–व्होटिंग/ई–व्होटिंग साठी लॉगिन तपशिल तुमच्या नोंदणीकृत ई–मेल पत्त्यावर पाठविले जात आहे.

जर कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपेंटकडे तुमचा ई–मेल पत्ता नोंदवलेला नसेल तर, ई–व्होटींगसाठी लॉगीन डिटेल्स आणि वार्षिक अहवाल मिळवण्याकरीता कृपया तुमचा ई–मेल आयडी नोंदविण्यासाठी खालील प्रक्रियेचा अवलंब करा :

| | |
|---|---|
| प्रत्यक्ष धारणा | भागधारकांचे नाव, फोलिओ क्र., शेअर प्रमाणपत्राची स्कॅन्ड प्रत (पुढची व मागची) आणि ई–मेल अॅड्रेस नोंदणीसाठी पॅन कार्डची स्व–साक्षांकित स्कॅन्ड प्रत सादर करुन helpdeskdelhi@mcsregistrars.com एमसीएस शेअर ट्रान्सफर एजेंट लिमिटेड, कंपनीचे रजिस्ट्रार अॅन्ड शेअर ट्रान्सफर एजेंट यांना एक विनंती पाठवावी. |
| डिमॅट धारणा | कृपया तुमच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट (डीपी) शी संपर्क साधा आणि तुमच्या डीपी ने दिलेल्या सल्ल्यानुसार प्रक्रियेचा अवलंब करुन तुमचा ई–मेल अॅड्रेस नोंदवा. |

वित्तीय वर्ष २०२२–२३ च्या ३७ व्या एजीएम आणि वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाईट https://www.indoramaindia.com वर आणि स्टॉक एक्सचेंज ची वेबसाईट म्हणजेच बीएसई लिमिटेड www.bseindia.com नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड www.nseindia.com वर उपलब्ध करुन दिली आहे.

एजीएम च्या सुचनेत ठरविलेल्या सर्व ठरावांवर मतदान करण्यासाठी कंपनी आपल्या सर्व सदस्यांना नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडची रिमोट ई–मतदान सुविधा (रिमोट–ई वोटींग) प्रदान करीत आहे. याव्यतिरीक्त, कंपनी एजीएम दरम्यान (ई–वोटिंग) ई–मतदान प्रणालीद्वारे मतदानाची सुविधा प्रदान करीत आहे. रिमोट ई–वोटिंग आणि ई–वोटिंग मध्ये सहभागी होण्याची विस्तृत प्रक्रिया एजीएमच्या सुचनेत दिलेली आहे. कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०३ नुसार कोरम गणना अंतर्गत व्हीसी/ओएव्हीएम द्वारे एजीएममध्ये उपस्थित सदस्यांची गणना केली जाईल.

संचालक मंडळाच्या आदेशान्वये
**तर्फे इंन्डो रामा सिंथेटिक्स (इंडिया) लिमिटेड**
**पवन कुमार ठाकुर**
कंपनी सेक्रेटरी आणि अनुपालन अधिकारी

**ठिकाण : गुरुग्राम**
**दिनांक : २२ जुन २०२३**



# नगर परिषद बुलडाणा कार्यालय, बुलडाणा.

## ई-निविदा सुचना

जा.क्र./पापुवि/नपबु/1496 / 2023 — दिनांक 22/06/2023

सन 2023-24 या आर्थिक वर्षा करीता नगर परिषदेला पाणी पुरवठा विभागाअंतर्गत खालील नमुद केलेल्या कामे करणे करीता अधिकृत कंत्राटदार नेमणुक करावयाची आहे. तरी नोंदणीकृत/ ईच्छुक पुरवठा धारक / कंत्राटदारा कडुन ऑनलाईन निविदा कार्यालयीन वेळेत मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे तपशील | अंदाजपत्रकीय रक्कम | कामाचा कालावधी | निविदा फार्म किंमत | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **बुलढाणा शहर व 4 गांवे पाणी पुरवठा योजना.** खडकपुर्णा हेडवर्क्ससाठी घ्यावयाच्या कायमस्वरुपी उच्चदाब एक्सप्रेस फिडरच्या विज जोडणीसाठी आवश्यक 5 MV ट्रान्सफार्मर व अनुषंगीक साहित्याचे कामे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योजनेतील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बुलढाणा यांचेकडुन प्राप्त होणा-या बचती मधील निधी मधुन शासन मान्यतेच्या अधिन राहुन कामे करणे बाबत. | रु.9826033/- (GST व Supervision Charges वगळुन) | 2 महिने | रु.17,000/- | रु.98,300/- |

ई निविदेचा कोरा नमुना **"http://www.mahatenders.gov.in"** या संकेतस्थळा वर **दिनांक 23/06/2023** पासून **दिनांक 07/07/2023 रोजी दुपारी 15.00 वाजेपर्यंत** उपलब्ध राहील. परिपूर्ण रित्या भरलेल्या ई-निविदा **दिनांक 07/07/2023 रोजी सकाळी 15:00 वाजेपर्यंत** व त्यापुर्वी स्विकारण्यांत येतील. तसेच **दिनांक 10/07/2023 रोजी सकाळी 11:00 वाजे नंतर** उघडण्यात येईल. निविदा बाबतच्या सविस्तर अटी, शर्ती व नियम उपरोक्त संकेतस्थळा वर पाहवयास उपलब्ध आहेत. तरी इच्छूक संस्थेनी/कंत्राटदारानी नोंद घ्यावी व निविदा प्रक्रिया करावी. कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

स्वा/-
अभियंता
पाणी पुरवठा विभाग
नगर परिषद बुलडाणा

लेखापाल
नगर परिषद बुलडाणा

स्वा/-
मुख्याधिकारी
नगर परिषद बुलडाणा



# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

Email: rch.chandrapur@yahoo.com — Ph. No. 07172-250220, 273856

क्रमांक : चंशमनपा/ आरोग्य विभाग / 310/2023 — दिनांक 22/06/2023

## राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मनपा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी महानगरपालिका, चंद्रपूर मार्फत राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम या उपक्रमा अंतर्गत डासोत्पत्तीस्थाने तपासणीस (ब्रिडींग चेकर्स) पदे भरण्याबाबतची जाहीरात

चंद्रपुर शहर महानगरपालिका अधिनस्त आरोग्य विभागातील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत एकूण 25 डासोत्पत्तीस्थाने तपासणीस (फक्त पुरुष) (ब्रिडींग चेकर्स) नेमण्यासाठी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी व करारपध्दतीने 5 महिन्यांच्या कालावधी करीता मानधन तत्वावर खालील पदांकरीता विहीत अर्हता पात्र उमेदवारांची गुणांकन पध्दतीने पदभरती घेण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | आवश्यक पदे | मानधन प्रति दिवस रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | डासोत्पत्तीस्थाने तपासणीस (पुरुष) (ब्रिडींग चेकर्स) | किमान 10 वी पास | 18 से 45 वर्षे | 25 | 450/- |

पात्र उमेदवारांनी भरावयाचा अर्ज, शैक्षणिक अर्हता, अनुभव, अर्जाचा विहित नमूना व अर्ज करण्याची पध्यती इ. बाबतची सविस्तर माहिती **https://www.cmcchandrapur.com** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

पात्र उमेदवारांनी त्यांनी त्यांचे स्वतःचे अर्ज **दि. 28/06/2023 रोजी सकाळी 10.00 से सायं. 5.00 वाजेपर्यंत** चंद्रपुर शहर महानगरपालिका, चंद्रपूर कार्यालयातील आरोग्य विभागात प्रमाणित दाखल्यांसह (अटेस्टेड करून) स्वतः जमा करणे अनिवार्य राहील. तसेच, अर्ज सादर करतेवेळी सर्व मुळ प्रमाणपत्रे / दाखले सुध्दा पडताळणी करण्याकरीता सोबत ठेवणे अनिवार्य राहील. उमेदवारांनी Hard copy मध्ये सादर केलेले अर्जच विचारात घेतले जातील. ई-मेल किंवा तत्सम व्दारे सादर केलेले Soft Copy मधील अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

**पत्ता :** आरोग्य विभाग, 3 रा माळा, गांधी चौक, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

स्वा/-
आयुक्त
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

## लोकमानस

loksatta@expressindia.com

## गुंतवणूकदारांसाठी विश्वास महत्त्वाचा !

**‘मोठेपणासाठी महत्त्वाचे!’** हा अग्रलेख (२२ जून) वाचला. जागतिक पातळीवरील गुंतवणूकदारांना सुविधा, सवलती आणि स्वस्त जागा हा पर्याय नेहमीच महत्त्वाचा वाटतो. त्याचबरोबर विश्वास हा सर्वांत महत्त्वाचा निकष आहे. भारतात सत्ताधाऱ्यांच्या हस्तक्षेपामुळे काही कंपन्यांना व्यवसाय गुंडाळावे लागले होते.

१९९५-९६ च्या काळात एन्रॉन हे एक महत्त्वाचे उदाहरण होते. त्यानंतर जागतिक बाजारपेठेतील भारताची पत ढासळली. आता जैतापूर, बारसूतही गुंतवणूक करण्याविषयी कंपन्या साशंक असतील. त्यामुळे भारताने गुंतवणूकदारांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यास महत्त्व द्यायला हवे. जागतिक गुंतवणूकदार न आल्यास भारतातील बेरोजगारी कमी होणार नाही, हे सत्य आहे. त्या दृष्टीने केंद्र व राज्यातील सत्ताधाऱ्यांनी गुंतवणूकदारांबरोबर संवाद साधण्याची गरज आहे.

■ **राजलक्ष्मी प्रसाद,** मुलुंड (मुंबई)

## भारत परिपक्व लोकशाहीपासून बराच दूर

**‘मोठेपणासाठी महत्त्वाचे!’** हा अग्रलेख (२२ जून) वाचला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्याबाबत भारतीय प्रचार यंत्रणेत मोठा उत्साह आहे. येत्या काही दिवसांत विश्वगुरूंचा हा फुगा मोठा होणार, हे निश्चित. ‘अबकी बार ट्रम्प सरकार’ची घोषणा देणाऱ्या मोदींना, जो बायडेन यांनी दिलेल्या निमंत्रणामागे अमेरिकेचे व्यापारी आणि सामरिक हितसंबंध आहेत. चीनची वाढती ताकद, रशिया आणि चीनची जवळीक, अनेक युरोपीय देशांची डळमळीत आर्थिक स्थिती अशा परिस्थितीत अमेरिकेला त्यांच्या शस्त्रास्त्रांच्या निर्यातीसाठी आणि संरक्षण सौद्यांसाठी मोठी बाजारपेठ हवी आहे. भारत ही गरज पूर्ण करतो.

प्रचारयंत्रणेने मोदींचे गुणगान सुरू ठेवण्यास हरकत नाही, पण भारतातील लोकशाही, मानवाधिकार आणि घटनात्मक मूल्यांच्या ऱ्हासामुळे त्यांची प्रतिमा डागाळण्याचा धोका आहे, या वस्तुस्थितीपासून दूर जाऊ नये. पंतप्रधानांच्या आगमनावर ७५ खासदार मानवाधिकाराचा प्रश्न उपस्थित करत असतील तर हे चांगले लक्षण नाही. पंतप्रधान मोदींची भेट घेतल्यानंतर इलॉन मस्क यांना ट्विटरचे माजी



सीईओ जॅक डोर्सी यांच्या वक्तव्याबाबत प्रश्न विचारला असता, त्यांनी ‘ट्विटरला स्थानिक नियमांचे पालन करण्याशिवाय पर्याय नाही,’ असे उत्तर दिले. याचा अर्थ मस्क यांनी जॅक डोर्सी यांच्या आरोपांना पुष्टी दिली आहे, असा होतो. तेव्हा भाजप नेते आणि त्यांचे पाठीराखे आता इलॉन मस्क यांच्याकडे विरोधक म्हणून पाहणार, की भारतात त्यांच्याकडून गुंतवणूक होण्याची वाट पाहणार?

सरकारच्या पलीकडे असलेल्या लोकशाही संस्थांनी याचा विचार करावा की, सरकारी दबावाची वृत्ते समाजमाध्यमांवर आली, तर आपल्या लोकशाही व्यवस्थेत त्यांचे काय करायचे? अशा प्रकारचा दबाव मोदी सरकारने प्रथमच वापरला आहे, असेही नाही. हेदेखील खरे की अधिकारांचा असा गैरवापर करणारे हे एकमेव सरकार नाही. सर्व प्रकारच्या अभिव्यक्तींवर दबाव आणण्याचा मोह क्वचितच कोणी सोडू शकेल. अशी परिस्थिती केवळ त्या सुसंस्कृत, विकसित, परिपक्व आणि प्रतिष्ठित लोकशाहीमध्येच नियंत्रणात राहू शकते, जिथे लोकशाही स्वातंत्र्याचा आदर केला जातो. भारत अशा स्थितीपासून बराच दूर आहे. तेव्हा इथल्या लोकशाही संस्थांनी स्वतःचे घर कसे दुरुस्त करायचे याचा विचार करायला हवा.

■ **तुषार अशोक रहाटगावकर,** डोंबिवली

## सोयीप्रमाणे नियम बदलून चालणार नाही

**‘मोठेपणासाठी महत्त्वाचे!’** हा संपादकीय लेख वाचला. जागतिक पातळीवर महत्त्वाच्या भूमिकेसाठी आपण दावेदारी करत आहोत, मात्र स्वदेशात सारे काही आलबेल आहे का?

७० पेक्षा अधिक अमेरिकी लोकप्रतिनिधींनी जो बायडेन यांना पत्र लिहून भारतातील मानवाधिकारांची पायमल्ली, धार्मिक असहिष्णुता आणि माध्यमांची गळचेपी हे मुद्दे नरेंद्र मोदींसमोर मांडण्याच्या सूचना केल्या आहेत. काहींनी मोदी यांच्या भाषणावर बहिष्कार टाकला आहे. आपण आपल्या (विशेष करून राजकीय) सोयीप्रमाणे नियम बदलत असू तर जागतिक पातळीवरच्या नियमकांमध्ये आपण कसे बसू? जिथे देणाऱ्यांपेक्षा घेणारे अधिक तिथे नेहमी व्यापारी दृष्टिकोन बाळगणाऱ्या देशासमोर जी गोष्ट स्वतःहून मिळायला हवी ती मागावी लागते हीच खरी शोकांतिका.

■ **परेश प्रमोद बंग,** मूर्तिजापूर (अकोला)

## ‘इव्हेंट मॅनेजमेंट’ मोठेपणा मिळवून देत नाही

**‘मोठेपणासाठी महत्त्वाचे’** हा संपादकीय लेख वाचला. जागतिक स्तरावर मोठेपण मिळते ते देशाची आर्थिक स्थिती, सामरिक बळ, जागतिक घडामोडींमध्ये हस्तक्षेप करण्याची कुवत आणि मुत्सद्दीपणा यांमुळे. भारताने स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि सहिष्णुता यांची कदर करणारा देश अशी ओळख निर्माण केली. गेल्या काही वर्षांत या सर्व निकषांवर अधोगती दिसते. चीनची (हुकूमशाही) पद्धत स्वीकारता येत नाही आणि भांडवलशाही व्यवस्थेतील सरकारी हस्तक्षेप कमी करण्याची इच्छा नाही. मुक्त आणि पारदर्शक व्यस्थेत नियामक, प्रशासक, घटनात्मक संस्था आणि न्यायपालिका यांच्यावरील सरकारचा अंकुश कमी करण्याची अपेक्षा योग्य असली तरी असे घडण्याची शक्यता नाही. मोठेपण सिद्ध करावे लागते, ते कदापि मागून अथवा इव्हेंट मॅनेजमेंट करून मिळत नाही.

■ **ॲड. वसंत नलावडे,** सातारा

## सर्व काही मुख्यमंत्रीपदासाठी !

**‘अजित पवारांना** पक्षकार्याचे वेध’ ही बातमी (२२ जून) वाचली. जेव्हा शरद पवारांनी दिल्लीत पक्षाच्या रौप्यमहोत्सवी कार्यक्रमात ‘भाकरी फिरवली’ तेव्हा अजित पवार यांनी खाली मान घालून, बाटली आपटून आपटून व्यक्त केलेली खदखद चाणाक्षांच्या नजरेतून सुटलेली नाही. शरद पवार यांनी या दुसऱ्या स्थानाविषयी कायमच अनिश्चितता ठेवली आणि अखेर स्वतःच्या मुलीला, ते स्थान दिले.



जवळपास प्रत्येक प्रादेशिक पक्ष हा कौटुंबिक पक्षच आहे. तो कुटुंबाच्या बाहेर जाऊ शकला नाही. महाराष्ट्राचा इतिहास आहे, काकाने कधी पुतण्याला साथ दिलेली नाही. २००४ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीला ७१ आणि काँग्रेसला ६९ जागा मिळाल्या, मात्र शरद पवार यांनी मुख्यमंत्रीपद काँग्रेसला दिले आणि दिल्लीत आपले महत्त्व वाढवले. ज्यांनी मुख्यमंत्रीपदासाठी १९७८ साली काँग्रेस फोडली आणि स्वतः मुख्यमंत्री झाले, त्यांना आपल्या पक्षाकडे मुख्यमंत्रीपद असावे, असे वाटत नसेल? पण मुख्यमंत्रीपद राष्ट्रवादीकडे ठेवले असते, तर अजित पवार यांना मुख्यमंत्री करावे लागले असते. आणि मग हळूहळू ते पक्षातील दुसऱ्या क्रमांकाच्या स्थानाचे दावेदार ठरले असते.

बंडाचा प्रयत्न अजित पवार यांनी अनेकदा केला, पण पवारांनी तो उधळून लावला. आता इतकी वर्षे राजकारणात विविध खात्यांची मंत्रीपदे, उपमुख्यामंत्रीपद भूषविल्यावर कोणालाही सहजच वाटेल की मुख्यमंत्री व्हावे, पण राष्ट्रवादीत राहून ते शक्य नसल्याचे किंवा भाजपशी युती केल्याशिवाय ते शक्य नसल्याचे अजित पवार यांचे ठाम मत झाले असावे, म्हणून ते नेहमी अस्वस्थ दिसतात आणि राष्ट्रवादीलाही अस्वस्थ करत राहतात.

■ **प्रकाश सणस,** डोंबिवली

## आकाशवाणीवरील मराठी कार्यक्रमांना कात्री

**आकाशवाणी मुंबई** ‘ब’ अर्थात ‘अस्मिता’वर गेले वर्षभर रात्री मराठी गीते आणि सोमवार ते शुक्रवार रात्री मराठी श्रुतिका ऐकता येत. आता मात्र या कार्यक्रमांऐवजी ‘मन की बात’ किंवा तत्सम ‘राष्ट्रीय महत्त्वाच्या’ विषयांवरील चर्चा तावातावाने हिंदी आणि इंग्रजीतून झडतात. मराठी श्रुतिका फक्त मंगळवारी आणि गुरुवारी रात्री प्रसारित केल्या जातात. मुंबईच्या एफएम रेनबो वाहिनीवर दुपारी अडीच ते ५ पर्यंतच आणि एफएम गोल्ड वाहिनीवर सकाळी १० वाजल्यानंतरच मराठी गीते ऐकता येतात. त्यातही अधूनमधून हिंदीचा मारा होतच असतो. मराठी जनता मात्र ‘विश्वगुरूं’चे हे धोरण मुकाट सहन करत आहे.

■ **उत्तम विचारे,** दादर (मुंबई)

## कर्जबुडव्यांवरील कारवाईवर परिणाम नाही !


**‘कर्जबुडव्यांना दिलासा** की फसवणुकीला अभय?’ हे विश्लेषण (२० जून) वाचले. हेतुपुरस्सर कर्जबुडवे आणि फसवणुकीचा प्रकार असलेली कर्जे यांबाबत लेखामध्ये असा उल्लेख आहे, की ‘अशा कर्जदारांविरुद्ध फौजदारी कारवाईचा पूर्वग्रह न ठेवता हे घडून यावे, असेही रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे. म्हणजेच जर कोणता फौजदारी खटला सुरू असेल तर तो गुंडाळावा लागेल.’ रिझर्व्ह बँकेचे ते परिपत्रक (क्र. आरबीआय/ २०२३-२४/ ४० दि. ८ जून २०२३ मुळातून वाचल्यास असे लक्षात येते की, ‘कर्जांची सामंजस्याद्वारे तडजोड आणि कर्ज खात्यांचे तांत्रिक निर्लेखन’ यासाठी नवीन नियमावली देण्यात आली आहे. त्याच्या संलग्नकातील परिच्छेद १३ चा मथितार्थ असा की, ‘नियमन केल्या जाणाऱ्या संस्था- बँका, सहकारी बँका वगैरे- हेतुपुरस्सर कर्जबुडवे आणि फसवणुकीचे प्रकार असलेली कर्ज खाती, यांच्या बाबतही सामंजस्यपूर्ण तडजोड आणि तांत्रिक निर्लेखनाची प्रक्रिया अमलात आणू शकतात, मात्र त्यामुळे अशा कर्जदारांवर आधीच सुरू केलेल्या फौजदारी कारवाईवर कोणताही परिणाम होणार नाही.’ त्याऐवजी जर अशी कारवाई सुरू केलेली असेल, तर ‘ती गुंडाळावी लागेल’, असे म्हणणे म्हणजे परिपत्रकाचा विपर्यास करणे होय.

अर्थात, या नव्या नियमावलीमुळे आता अगदी निरव मोदी, विजय मल्ल्या, मेहुल चोक्सी यांचीही फौजदारी कारवाईपासून मुक्तता होईल, हे म्हणणे योग्य नाही. मात्र एक आहे, यामध्ये ‘आधीच सुरू केली गेलेली फौजदारी कारवाई’ असा उल्लेख असल्याने, ज्या हेतुपुरस्सर कर्जबुडवे किंवा फसवणुकीचे प्रकार असलेले कर्जदारांवर अद्याप फौजदारी कारवाई सुरूच झालेली नाही, त्यांच्याबाबत सावधगिरी बाळगावी लागेल. तशी कारवाई विनाविलंब सुरू करण्यासाठी, तसेच ही कारवाई करण्यात विलंब करणाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने याच परिपत्रकात सूचना द्यायला हव्या होत्या. आपल्याकडे एकूण जबाबदारी निश्चित करण्याबाबत बोटचेपेपणा ही मोठी समस्या आहे.

■ **श्रीकांत पटवर्धन,** कांदिवली (मुंबई)

## योगसाधना इव्हेंट होऊ नये !

**आंतरराष्ट्रीय योग** दिन आणि संगीत दिन २१ जून रोजी साजरे करण्यात आले. हे दोन्ही ऊर्जा देणारे प्रकार एकाच दिवशी साजरे करणे हा आनंददायी योगायोग आहे. योगा, व्यायाम, आहार यांबाबत दिवसेंदिवस व्यापक जागृती होत चालली आहे. हे खरोखरीच स्वागतार्ह आहे, पण योग दिन साजरा करताना त्याचा मूळ उद्देश हरवणार नाही, याची खबरदारी सर्वांनी घेणे आवश्यक आहे. त्याचा इव्हेंट होऊ न देता, त्यामागचा विचार आणि पारंपरिक ठेवा जपणे, हा हेतू लक्षात ठेवला पाहिजे. आपण सर्वांनी ही काळजी घेणे आवश्यक आहे.



■ **पुरुषोत्तम कृ. आठलेकर,** डोंबिवली

## अभियंत्याला मारहाण करणे आक्षेपार्ह

**‘अभियंत्याला भर** रस्त्यात आमदाराची मारहाण’ हे आमदार गीता जैन यांच्याविषयीचे वृत्त (लोकसत्ता- २१ जून) वाचले. मीरा-भाईंदर पालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे. तिच्या कारभारात हस्तक्षेप करण्याचा त्यांचा अधिकार नाही. या घटनेत आमदारांनी कायदा हातात घेऊन पालिकेच्या कर्मचाऱ्यांना मारहाण केली आहे, याचे समर्थन कसे करता येईल? आमदार म्हणून सरकारच्या योजनांची अंमलबजावणी मतदारसंघात करणे, लोकहित साधण्यावर लक्ष केंद्रित करणे, हे त्यांचे कर्तव्य आहे. सरकारी निधीचा वापर योग्य प्रकारे होत आहे की नाही, याची खातरजमा करून घेणे ही त्यांची जबाबदारी आहे. अतिउत्साह, उन्माद आणि आमदार म्हणून अपेक्षित कामांविषयीच्या अज्ञानामुळे त्यांनी सरकारी कर्मचाऱ्यावर हल्ला केला असावा. कर्तव्यावर असलेल्या सरकारी कर्मचाऱ्याला करण्यात आलेल्या मारहाणीची कोणीही पाठराखण करणार नाही.

■ **प्रशांत कुळकर्णी,** कांदिवली (मुंबई)

## कुरघोडीचे मखर चीनचेच असणार !

**‘अमेरिकी आरास!’** हा अग्रलेख (२१ जून) वाचला. दुसऱ्या महायुद्धात जपान हा अमेरिकेप्रमाणेच चीनचाही शत्रू होता. मात्र तैवान, कोरिया प्रकरणानंतर अमेरिकेचे चीनशी संबंध बिघडले असतानादेखील, अमेरिकेची पिंग पोंग डिप्लोमसी, किसिंजर आणि अध्यक्ष निक्सन यांच्या चीन भेटीत बरीच रहस्ये दडलेली आहेत. चीनला जगाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अमेरिकेने प्रयत्न केले. १९८०च्या दशकात चीन जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, एशियन डेव्हलपमेंट बँक अशा आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये सहभागी झाला. २००१ साली चीनचा जागतिक व्यापार संघटनेत प्रवेश झाला. २००८ पर्यंत चीन अमेरिकेतली कर्जे विकत घेणारा सर्वांत मोठा देश झाला. याच वर्षी अमेरिकेतली ‘लेहमन ब्रदर्स बँक’ बुडाली आणि जागतिक मंदी आली. चीन अमेरिकेचा स्पर्धक झाला.

अमेरिका-चीन व्यापारात अमेरिकेच्या बाजूने मोठी तूट होती. फायदा चीनला अधिक होत होता. त्याच काळात भारताने रशियाशी २० वर्षांचा मैत्री करार केला, सोबत युरोपीय, आखाती देश, इराण, यांच्याशी आयात-निर्यातीचे धोरण अवलंबून, अमेरिका, चीन यांच्यानंतर पर्याय उभा केला. भविष्यात महासत्ता होण्याचे चीनचे मनसुबे जगजाहीर आहेत. म्हणून अमेरिकेला पुन्हा जपान, ऑस्ट्रेलिया, भारत, फिलिपीन्सची गरज भासू लागली. त्यातून ‘क्वाड’ या संकल्पनेचा उदय झाला. चीन तवांग, डोकलाम, गलवान, सीमांवर घुसखोरी करून भारताशी वैर वाढवत आहे. तरीही भारताने गेल्या तीन वर्षांत चीनकडून सात ते आठ अब्ज डॉलर्सच्या वर विक्रमी आयात केली आहे. निर्यात नगण्यच आहे. अमेरिकेत मनुष्यबळ कमी असले, तरीही अर्थव्यवस्था मजबूत आहे. भारताकडे प्रचंड मनुष्यबळ पण अर्थव्यवस्थेच्या मानाने उत्पादन क्षमता कमी. चीनकडे मनुष्यबळ आणि मजबूत अर्थव्यवस्था आहे, त्या जोरावर, चीनने दैनंदिन जीवनातील गरजेच्या वस्तू निर्माण करून जगातील सर्वच बाजारपेठा काबीज केल्या आहेत. एकमेकांच्या गरजांवरच देशांचे परस्परसंबंध टिकून आहेत. पण चीनची गेल्या तीन दशकांतील उत्पादन क्षमतेतील एकाधिकारशाही मोडणे सर्वांनाच मुश्कील आहे. म्हणूनच आरास कुणाचीही असो, कुरघोडीचे मखर चीनचेच असणार हे निर्विवाद सत्य नाकारून चालणार नाही.

■ **विजयकुमार वाणी,** पनवेल

## जलाशयांच्या परिसरात पक्षीसंवर्धन गरजेचे

**‘सारस पक्ष्यांचे** अस्तित्व अद्यापही धोक्यात’ हे वृत्त (लोकसत्ता - १८ जून) वाचले. पक्षीजीवनाकडे शासनासहित सर्वांचेच दुर्लक्ष होत असल्याने त्यांची संख्या कमी होत आहे. सारसच काय, हरोल, भारद्वाज यांच्यासारखे देखणे पक्षीही वेगाने कमी होत आहेत. वनसंपदा जपली पाहिजे कारण पक्ष्यांचे ते निवासस्थान आहेच पण त्यांचे अन्न मिळण्याचीही ती जागा आहे. उजनी जलाशयात दरवर्षी असंख्य सारस पक्षी येतात, पण त्यांचीही शिकार होत असल्याचे वृत्त मध्यंतरी आले होते. यासाठी कायदे कडक केले पाहिजेत. अवैध वृक्षतोड किंवा पक्षी-प्राणी यांची शिकार हा गंभीर गुन्हा समजून संबंधितांवर कठोर कारवाई केली जाणे आवश्यक आहे. मोठ्या जलाशयांच्या सान्निध्यात पक्षीसंवर्धन केंद्रे सुरू करावीत आणि तिथे दुर्मीळ होत चाललेल्या पक्ष्यांचे संवर्धन करावे. याच धर्तीवर भंडारा जिल्ह्यातही सारस पक्ष्यांच्या संरक्षण संवर्धनासाठी विशेष प्रयत्न करणे शक्य आहे.

■ **अशोक आफळे,** कोल्हापूर

## सत्तांधतेमुळेच शाश्वत शेतीचा बट्ट्याबोळ

**‘बोलाचीच शाश्वत** शेती?’ हा लेख (२२ जुलै) वाचला. आर्थिकदृष्ट्या शेती उद्योग कधीच फायद्यात नसतो. कधी नैसर्गिक आपत्तींमुळे तर कधी राज्यकर्त्यांच्या धरसोडीच्या धोरणाचा फटका बसतो. आयात-निर्यातीच्या नितीसुसंगत नियोजनाचा अभाव आहे. कांद्याचे अमाप पीक येताच, निर्यातबंदी लागू होते. यंदा तर लाल सडा (टोमॅटोचा) पडलेला जागोजागी दिसला. कांदाही फेकून देण्याचा प्रसंग ओढवला. नेते सत्तेत मग्न राहिल्याने शेतीचा बट्ट्याबोळ झाला.


शेतमाल बाजारपेठेत नेण्यासाठी पक्का रस्ता नसतो. मातीत जित्राबाचे पाय रुतून बसतात तर बैलगाडीदेखील चालविणे अशक्य होऊन जाते. खर्च दुप्पट आणि उत्पन्न निम्मे यात अडकलेला शेतकरी आत्महत्येचे पाऊल उचलतो. आर्थिक मदतीचा पेटारा उघडला की सर्व काही आलबेल होऊन जाते, अशा गोड गैरसमजातच नेते असतात. पण, शेतकऱ्याला मदत नको आहे. त्याला उद्योगांसाठी दिल्या जातात, तशा सुविधा देऊन पाहा, हाच शेतकरी देशाच्या आर्थिक सुबत्तेचा खरा धनी ठरेल. पण, नियोजनकर्त्यांची मानसिकता सकारात्मक हवी... !

स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशीकडे दुर्लक्ष करण्यात सरकार तरबेज आहे. वीज आहे तर पाणी नाही आणि पाणी असले तर वीज नाही. त्यातच लहरी निसर्ग. त्यासाठी उत्पादन खर्चाच्या दुप्पट हमी भाव ठेवण्यासाठी प्रशासनाने कधीही धोरण आखलेले नाही. गोदामे नाहीत. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या निर्देशानुसार भूकबळी कमी करण्यात अडथळे येत आहेत. सरकार वेतन आयोग नेमून, लाखो रुपयांच्या पगाराचे नियोजन करते, मग शेतमालासाठी योग्य भाव देण्याचे नियोजन का करू शकत नाही? शेतकरीविरोधी कायदे संपुष्टात आणण्यासाठी धोरणात्मक नियोजन करण्याची नितांत गरज आहे.

जलव्यवस्थापन, उत्कृष्ट बियाणे, अत्याधुनिक तंत्रज्ञान, शेततळी, रस्ते, वीज आणि बाजारपेठ, आयात-निर्यात धोरण, गटशेती, ठिबक सिंचन आणि अनुदान, बदलत्या हवामानानुसार पीक नियोजन, शेतीपूरक उद्योग अशा विविधांगी नियोजनाशिवाय शेतकरी सुखी होणार नाही.

■ **डॉ. नूतनकुमार सी. पाटणी,** चिकलठाणा (छत्रपती संभाजीनगर)

## व्यक्तिवेध



### नवरोझ कॉन्ट्रॅक्टर

**‘त्यांनी आत्मचरित्र** लिहिले असते, तर ते तीन खंडांत असते : जाझ संगीत, दृश्यकला आणि फोटोग्राफी हा पहिला, सिनेमॅटोग्राफी (छायालेखन) हा दुसरा आणि वाहनांच्या त्यांनी शालीनपणे जोपासलेल्या छंदाचा तिसरा खंड’ असे ज्यांच्या निधनानंतर विख्यात समीक्षक शांता गोखले यांनी लिहिले, ते नवरोझ कॉन्ट्रॅक्टर!

‘२२ जून १८९७’, ‘लिमिटेड माणुसकी’, सदाशिव अमरापूरकर- शबाना आज़मी यांच्या भूमिका असलेला २००२ सालचा ‘देवी अहिल्याबाई’ या नचिकेत व जयू पटवर्धन दिग्दर्शित चित्रपटांचे छायालेखक म्हणून मराठीजनांना नवरोझ कॉन्ट्रॅक्टर यांचे नाव माहीत हवे होते. तसे ते माहीत नाही, हे उघडच आहे. छायालेखकांना स्वतंत्र ओळख देण्याइतकी प्रगल्भता भारतीय प्रेक्षकांत येण्याच्या आतच डिजिटल जमाना सुरू झाला हेही खरे. पण ‘मणि कौल यांच्या ‘दुविधा’चे छायालेखक’ ही ख्याती मात्र त्यांना १९७३ मध्येच मिळाली होती. त्यानंतर अगदी कमी चित्रपट त्यांनी स्वीकारले, त्यापैकी ‘पर्सी’ आणि कन्नड भाषेतील ‘देवर कडु’ हे भारतातील मोठ्या पडद्यांपर्यंत गेले. बाकी ‘ल बलाद दे पाबूजी’ हा राजस्थानातील ‘पड’ लोककलेवर चित्रित झालेला लघुपट फ्रेंच होता किंवा पिएर हॉफमन यांच्यासाठी नवरोझ यांनी १९८४ सालच्या चीनमध्ये एक लघुपट चित्रित केला होता. पुढे या चिनी दौऱ्यावर आधारित, ‘ड्रीम्स ऑफ द ड्रॅगन्स चिल्ड्रन’ नावाचे छायाचित्र-पुस्तकही निघाले.

नवरोझ हे बडोदे येथील महाराजा सयाजीराव विद्यापीठाच्या दृश्यकला विभागाचे विद्यार्थी. छायाचित्रणात विशेष प्रावीण्य मिळवून चित्रकलेचा अभ्यासक्रम त्यांनी साठच्या दशकाच्या पूर्वार्धात पूर्ण केला. मणि कौल यांच्याशी त्यांची भेट १९६९ मध्ये झाली. ‘उसकी रोटी’साठी त्यांनी स्थिर-छायाचित्रण केले. पण कौल यांच्यामुळे ते छायालेखनाच्या क्षेत्रात आले. चित्रकलेतले समकालीन गुलाम मोहम्मद शेख, भूपेन खक्कर वगैरे... यापैकी भूपेन यांची नवरोझ यांनी टिपलेली छायाचित्रे लंडनच्या ‘टेट गॅलरी’च्या संग्रहात आहेत. ‘भारत परिक्रमा’ त्यांनी ‘घडवलेला’ लघुपट. त्यासाठी ते स्वतः मोटरसायकलवरून भारत फिरले, स्वतःसह साथीदारांचे अनुभव त्यांनी टिपले. त्यांचा दुसरा चित्रपट ‘झाडू कथा’ ... केरसुणी आणि आपल्या देशात दिसणारी तिची अनेक रूपे, तिचे सांस्कृतिक महत्त्व यांना वाहिलेल्या या लघुपटानंतर बऱ्याच वर्षांनी आयेषा धारकर यांनी ‘बीबीसी’साठी त्याच विषयावरला श्रवणपट तयार केला.

‘कार इंडिया/ बाइक इंडिया’, ‘झिगव्हील्स’, ‘ओव्हरड्राइव्ह’ आदी नियतकालिकांसाठी त्यांनी लेखन आणि छायाचित्रण केले. वेग तर हवा, पण सुरक्षेला सर्वाधिक महत्त्व हवे, जबाबदारीनेच वाहन चालवले पाहिजे, हा आग्रह अगदी ‘पारशीपणे’ ते मांडत. त्यामुळे या रगेल छंदातसुद्धा त्यांना फक्त सुसंस्कृतांचीच साथ मिळे... बाकीचे त्यांच्या वाटेला जात नसत. पण १५ जून रोजी बेंगळूरुत मोटरसायकल चालवत असतानाच दुसऱ्या वाहनाने ठोकरल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. आत्मचरित्र त्यांनी कधीच लिहिले नाही; पण त्यांच्याइतक्याच रगेल- अभ्यासू- आणि आधुनिकतेची ‘संस्कृती’ जाणणाऱ्या सिनेमॅटोग्राफरला त्यांच्यावर लघुपट करावासा वाटेल, इतका चरित्र-ऐवज ते मागे सोडून गेले.

## चिंतनधारा

### धार्मिक क्षेत्रातील दुर्दशा व उपाय

**भारताच्या धार्मिक** क्षेत्रातील दुर्दशेला दुरुस्त करण्याचे दोन उपाय सुचवताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात, ‘‘पहिला उपाय निष्काम जीवन-प्रचारकांनी तयार होऊन खेड्यातून जाऊन लोकांना संघटित केले पाहिजे व दुसरा उपाय हजारोंनी घरावर तुळशीदल ठेवून बाहेर निघून समाजात ही लाट निर्माण केली पाहिजे. सेवक जीवनाची आहुती देऊन जनतेस माणुसकी शिकविण्यासाठी झटणारा असावा. आपण म्हणाल परिस्थिती वाईट आहे. कीर्तनात व व्याख्यानात हीच गोष्ट ऐकावयास मिळते! पण आपण यावर इलाज कोणता सुचविता? माझ्या मते एकेका गावातून निदान पाच-पाच जीवनप्रचारक तयार करावेत, जे आयुष्यभर सेवामंडळाची योजना निष्ठेने पार पाडतील. त्यांच्यावर संपूर्ण गावाचा विश्वास असेल.’’

‘‘एका गावात असे पाच प्रचारक असतील तर हिंदुस्थानच काय पण जगाला आदर्श दाखविण्याची आपली तयारी राहील. पगारी सेवक नकोत असे सूचित करून महराज म्हणतात, या कार्याला सर्वांत मोठी अडचण आर्थिक येते. योजनेसाठी पैसा कोणी देत नाही. संस्थेसाठी माणसे मिळवण्यासाठी फिरलात तर इतर संस्थांवर आघात करण्यासाठी फिरता असा आक्षेप घेतला जातो. यातून बाहेर पडल्यास एकच मार्ग आहे. आज असलेल्या जीवनप्रचारकांनी निष्काम सेवेस स्वतः तयार व्हावे व इतर विश्वासू सेवकांना सेवेस तयार आहात का असे विचारून तयारी दिसल्यास त्यांना प्रतिज्ञा घ्यावयास लावावी. त्यांची वाटेल तेथे जाण्याची तयारी असावी. असे प्रचारक तयार झाले तर काही मिनिटांत काम होईल. पगारी नोकरावरच प्रचाराची संपूर्ण जबाबदारी असलेल्या संस्था हे कार्य करू शकत नाहीत. कारण पैसा अत्यंत विषारी वस्तू आहे. यामुळे माणसे कार्य सोडून पैशाच्या मागे लागतात. तेव्हा पैशाचा प्रश्न स्वतः सोडवून केवळ मार्गदर्शनासाठी नेत्याकडे पाहाणारी सेवक मंडळी हवीत.’’

‘‘भारतीय ऋषींची संस्कृती अमर आहे. ते अमर तत्त्वज्ञान जनतेस देणारे आम्ही दूत आहोत असे निर्भयतेने म्हणण्यास व जिवंत असेपर्यंत प्रचार करण्यास तयार व्हा. गुरू गोविंदसिंहांच्या वेळचा प्रसंग आठवा. त्यांनी स्वधर्माचे रक्षण करण्याची तयारी केली. त्या वेळेस मुघलांनी आघात केले हे पाहून लोकांनी गोविंदसिंहांस विनंती केली की तुमच्यासारखे वीर स्वस्थ बसले तर आमचे संरक्षण कोणी करावे? गोविंदसिंहांनाही असे वाटले की प्रजेवर अन्याय झाला तर राजा बेचैन होतो व व्हावयास पाहिजे आणि धर्मावर आघात झाल्यास महात्मा बेचैन होतो नि व्हावयास पाहिजे. त्यांनी एका सभेत लोकांकडे मागणी केली- मला या कार्यासाठी पाच लोक हवे आहेत की ज्यांचा बळी मी देवीसमोर देऊ शकेन. हे भाषण ऐकल्यावर फक्त एक मनुष्यच निर्भयतेने समोर गेला. गोविंदसिंहांनी त्याला पाठीमागील एका डेऱ्यात लपवून ठेवले व बकऱ्याच्या रक्ताने भिजलेली तलवार घेऊन जनतेसमोर घेऊन फिरून चार माणसांची मागणी केली. त्या सभेत एकामागून एक अशी चार माणसे उठली. व पुढे त्याच पाच माणसांच्या साहाय्याने त्यांनी शीख धर्माचा प्रचार केला.’’

– **राजेश बोबडे**

rajesh772@gmail.com

## कुतूहल

### संवर्धनात्मक जीवशास्त्र संशोधक

**साधारण ७२०** किलोमीटरचा विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभलेल्या महाराष्ट्रात समुद्राबद्दल प्रेम आणि कुतूहल असणारे संशोधक निर्माण झाले, त्यांच्यापैकी एक डॉ. वर्धन पाटणकर. मुंबईकर असणारे वर्धन हे सागरी जलतरण, स्कूबा डायव्हिंग यांसारखे छंद जोपासत सागरी संशोधनात रमले. मुंबई विद्यापीठाची प्राणिशास्त्र या विषयातील पदवी घेतल्यानंतर याच समुद्रप्रेमामुळे त्यांनी २००३ ला गोवा विद्यापीठातील ‘नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफी’ या संस्थेमध्ये सागरी जीवशास्त्र या विषयातील पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतला. इथे शिक्षण घेत असताना अर्थातच अनेक उत्तम संशोधक आणि सागरी जीव अभ्यासकांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. यादरम्यान ‘त्सुनामीपासून किनाऱ्यांचे संरक्षण करण्यात कांदळवने आणि प्रवाळभित्तिकांची भूमिका’ या विषयावरील अंदमान आणि निकोबारच्या अभ्यासगटामध्ये विद्यार्थी म्हणून सहभागी होण्याची संधी त्यांना मिळाली. पदव्युत्तर प्रबंधासाठी गोवा किनारपट्टीवरील खेकड्यांचा अभ्यास केल्यानंतर २००८ ते २०१५ पर्यंत त्यांनी मदुराई कामराज विद्यापीठातून संवर्धनात्मक जीवशास्त्र व प्रवाळभित्तिकांचे परिस्थितिकीशास्त्र हा विषय घेऊन पीएच.डी. पूर्ण केली. यासाठी त्यांना भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागातर्फे ‘इन्सपायर’ शिष्यवृत्ती प्राप्त झाली होती.



डॉ. वर्धन पाटणकर

मुख्यत्वे अंदमान निकोबारमधील जैवविविधतेवर काम करत असतानाच त्यांनी इतर संशोधन क्षेत्रांत मोलाची भर टाकली. वातावरण बदलांचा प्रवाळांवर होणारा परिणाम व त्यावरच्या संवर्धनात्मक उपाययोजना, वातावरण बदलाचा सागरी परिसंस्थांवर होणारा दुष्परिणाम, भारतीय समुद्रातील समुद्रगायींचा अभ्यास व त्यांचे वर्गीकरण, भारतीय डॉल्फिनचे वर्गीकरण, अंदमान निकोबार द्वीपसमूहात आढळणारे पोपट मासे, ऑलिव्ह रीडले कासव, समुद्र काकडीसारखे कंटकीचर्मी या व अशा अनेक विषयांवर त्यांचे लेख विविध संशोधन पत्रिकांमध्ये प्रसिद्ध झाले आहेत.

डॉ. वर्धन सध्या एक आंतरराष्ट्रीय संस्थेत संवर्धन संचालक म्हणून कार्यरत आहेत. याचबरोबर अमेरिका, टांझानियासारख्या अनेक देशांतील पर्यावरण संरक्षण संस्थांमध्ये ते सल्लागार आहेत. भारतीय किनारपट्टीवर ‘जागतिक वन्यप्राणी निधी’बरोबर सागरी जैवसंरक्षक उपक्रमांमध्ये व अनेक विद्यापीठांतील अभ्यासक्रम ठरवणाऱ्या अभ्यासगटांमध्ये त्यांचा सहभाग आहे. समुद्राच्या अंतरंगात लपलेल्या जीवसृष्टीचे जग पाण्याखाली काढलेल्या छायाचित्रांच्या मदतीने ते सामान्यांसमोर आणतात. विद्यार्थ्यांना, संशोधकांना मार्गदर्शन करणाऱ्या, प्रेरणा देणाऱ्या, जैवविविधता संरक्षण याविषयी जागरूकता निर्माण करणाऱ्या, सागरी विश्वात रमलेल्या या मराठी युवा संशोधकास सलाम!

– **रेणू भालेराव**

**मराठी विज्ञान परिषद**

**ईमेल :** office@mavipa.org

**संकेतस्थळ :** www.mavipa.org

# श्रीमंत सम्राटांची दरिद्री प्रजा!

## सत्ताधारी सम्राट आणि शिक्षणसम्राट यांच्या कात्रीत अडकलेली आपली शिक्षणव्यवस्था पाहिली की आयआयटी, आयआयएम, एनएसडी वगैरे संस्थांचे मोठेपण अधोरेखित होते...

**उद्योगपती आनंद** महिंद्रा यांच्याकडून अमेरिकेतील हॉर्वर्ड विद्यापीठास एक कोटी डॉलर्स, इंद्रा नुयी यांच्याकडून येल बिझनेस स्कूलला प्रचंड देणगी, विख्यात हेजफंड प्रमुख केनेथ ग्रिफीन यांच्याकडून हॉर्वर्डला ३० कोटी डॉलर्स, कोलकातास्थित इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटला माजी विद्यार्थ्याकडून सव्वातीन कोटी रु., अहमदाबाद येथील आयआयएमला १० माजी विद्यार्थ्यांकडून १०० कोटी रु., अमेरिकास्थित पाच माजी विद्यार्थ्यांकडून मुंबईच्या आयआयटीस पाच कोटी डॉलर्स, इंडिगो एअरलाइन्सचे संस्थापक राकेश गंगवाल यांच्याकडून खरगपूरच्या आयआयटीस १०० कोटी रु., मद्रासच्या आयआयटीस तीन कोटी रु. अशा अनेक बातम्या सांगता येतील. इन्फोसिसच्या संस्थापकांतील एक नंदन निलेकणी यांनी मुंबईच्या आयआयटीस तब्बल ३१५ कोटी रुपयांची देणगी दिली आणि अलीकडच्या काळातील अशा अन्य काही देणग्यांचे तपशील स्मरले. ''ही केवळ देणगी नाही. आयआयटीने मला जे काही दिले त्याची कृतज्ञता म्हणून ही छोटी परतफेड,'' असे मनोज्ञ विधान नंदन निलेकणी यांनी या देणगीबाबत विचारता केले. त्यातून या संस्थेविषयी त्यांच्या मनात किती ममत्व, आदर आणि स्नेहभाव आहे हे दिसून येते. आपण ज्या विद्यार्थ्यांस घडवले त्यांच्याकडून अशी कृतज्ञतापूर्वक परतभेट मिळणे यासारखी धन्य करणारी भावना शैक्षणिक संस्थांसाठी अन्य कोणतीही नसेल. तथापि ज्यांच्याविषयी कृतज्ञता बाळगावी अशा किती शैक्षणिक संस्था आपल्याकडे आहेत आणि किती विद्यार्थ्यांच्या मनांत त्यांच्या त्यांच्या शैक्षणिक संस्थांविषयी काही बऱ्या भावना असतात हा यानिमित्ताने पडणारा प्रश्न. त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न निलेकणी यांच्या या हृद्य कृतीच्या निमित्ताने करताना आपल्या एकंदरच शैक्षणिक संस्थांतील पर्यावरण आणि शैक्षणिक संस्था-विद्यार्थी यांचे नातेसंबंध यांचा धांडोळा घेणे समयोचित ठरेल.

याचे कारण अशा कृतज्ञतापूर्वक मिळणाऱ्या देणग्यांत आयआयटी आणि आयआयएम या संस्था प्राधान्याने दिसून येतात. जागतिक पातळीवर सर्वात परिचित भारतीय मुद्रा कोणती या प्रश्नाच्या उत्तरात या दोन संस्थांचेच नाव वारंवार येते. मग ते मॅकेंझी कंपनीचे एके काळचे प्रमुख रजत गुप्ता असोत वा नंदन निलेकणी वा अन्य कोणी. हे सारे प्रतिभावंत आयआयटी, आयआयएम या दोन संस्थांतून घडले. या दोन संस्थांची स्थापना साठच्या दशकातील. पहिले भारतीय पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या कल्पनेतून या दोन संस्था जन्मास आल्या. तथापि, आज ६०-७० वर्षांनंतरही या दोन्ही संस्थांचा बहर कायम आहे. आता यात आनंद मानायचा की त्यानंतर आपल्याकडे अशी काही शैक्षणिक संस्थात्मक उभारणी झाली नाही, याचा खेद मानायचा हा प्रश्न वेगळा. या आयआयटी, आयआयएम, स्वामी विवेकानंदांशी जपान-अमेरिका प्रवासात बोटीवर जमशेटजी टाटा यांच्या झालेल्या गप्पांतून आकारास आलेली बंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भारतात अडकून पडलेल्या आणि इंग्लंडला परत जाऊ न शकणाऱ्या आपल्या नातेवाईकाच्या साहाय्याने जेआरडी टाटा यांनी जन्मास घातलेली मुंबईची टाटा मूलभूत विज्ञान संस्था असे काही आदरणीय अपवाद सोडले तर आपले शैक्षणिक विश्व हे बौद्धिक दारिद्र्याची खाण ठरते. अन्य संस्थांत त्यातल्या त्यात उल्लेख करावा अशी बिर्ला समूहाची बिट्स पिलानी. पण तिची स्थापनाही आयआयटीच्याच आगेमागे, म्हणजे साठच्या दशकात झालेली. अनेक आरेखनकारांना घडवणाऱ्या अहमदाबाद येथील 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन' या संस्थेचेही तसेच. इंदिरा गांधी यांच्या स्नेही पुपुल जयकर आदींच्या पुढाकारातून आणि अमेरिकेतील फोर्ड फाऊंडेशनच्या सहकार्याने ही संस्था जन्माला आली. तिचे जन्मवर्ष १९६१. म्हणजे पुन्हा तोच काळ. या संस्था वगळता मुंबईचे सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, व्हीजेटीआय, पुण्याचे सरकारी अभियांत्रिकी महाविद्यालय हे एके काळचे अन्य काही अपवाद. पण सद्यःस्थितीत या सगळ्यांचीच रया गेलेली. हे सर्व काय दर्शवते? आपल्या उल्लेखनीय शैक्षणिक संस्था साठच्या दशकात जन्मलेल्या आहेत आणि त्याच संस्थांतील विद्यार्थ्यांनी मानवी प्रतिभेची नवनवी शिखरे पादाक्रांत केलेली आहेत, हे नाकारता न येणारे सत्य. आज याच संस्थांचे माजी विद्यार्थी आपापल्या शैक्षणिक संस्थांस कृतज्ञतेपोटी घसघशीत देणग्या देताना दिसतात. याचा अर्थ आजच्या भारतास आणि काही प्रमाणात जगासही आकार देणाऱ्या संस्था या १९६० च्या दशकातील आहेत. हे इतकेच नाही. ज्यांना या संस्थांत शिक्षणाची संधी मिळाली नाही; पण पुढे अमेरिकेत वा इंग्लंडात हॉर्वर्ड वा ऑक्सफर्ड-केंब्रिजात शिकता आले ते नंतर त्या त्या संस्थांना देणग्या देऊन आपली कृतज्ञता व्यक्त करतात. आनंद महिंद्रा वा इंद्रा नुयी यांनी हॉर्वर्ड वा येल या संस्थांना दिलेल्या देणग्यांचा उल्लेख केला तो याचसाठी. यातून दोन मुद्दे ठसठशीतपणे समोर येतात.

**...आणि नंदन निलेकणींसारखे या संस्थांचे पांग फेडणारे विद्यार्थी पाहिले की आपल्या शैक्षणिक सम्राटांचे दरिद्री साम्राज्य उठून दिसते.**

एक म्हणजे अन्य अनेक संस्थांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या शैक्षणिक संस्थांविषयी तितके काही ममत्व असतेच असे नाही. आणि टाटा, बिर्ला अलीकडच्या काळातील 'विप्रो'चे अझीम प्रेमजी, 'एचसीएल'चे शिव नाडर हे उद्योगसमूह वा उद्योगपती वगळता आपल्या धनवंतांसही समाज वा त्यांच्या त्यांच्या शैक्षणिक संस्थांविषयी कृतज्ञता असतेच असे नाही. असली तरी ती दिसून येतेच असे नाही. अलीकडे आपल्या सरकारने उद्योगांस त्यांच्या उत्पन्नातील २.५ टक्के वाटा सामाजिक जबाबदारीपोटी खर्च करणे बंधनकारक केले. खरे पाहू गेल्यास हा एका अर्थी करच. पण सामाजिक कारणांसाठी असल्याने त्याविषयी उघड बोलण्याचे धाडस कोणी करीत नाही. परंतु त्यानंतर अनेकांनी आपापल्या समूहातच समाजकार्य करणाऱ्या संस्था 'दाखवल्या' आणि त्यांच्याकडेच हा निधी वळवला. म्हणजे तो पैसाही घरच्या घरीच राहिला. या तुलनेत पाश्चात्त्य उद्योगपती! अमेरिका वा युरोपातील अनेक उत्तम विद्यापीठांना त्यांच्या त्यांच्या प्रांतातील उद्योगपतींकडून घसघशीत देणग्या वारंवार दिल्या जातात. तेही कोणतेही सरकारी नियम बंधन नसताना. आनंद महिंद्रा वा इंद्रा नुयी यांसारख्या अनेकांस या परदेशी विद्यापीठास देणगी द्यावी असे वाटते यातच काय ते आले. अमेरिकी वा युरोपी संस्कृतीत दातृत्वाचे गोडवे गायले जातात की नाही, ते माहीत नाही. पण तरीही त्या देशातले उद्योगपती शैक्षणिक संस्थांस भरघोस देणग्या देतात.

आपल्याकडे परिस्थिती याच्या बरोबर उलट. शैक्षणिक संस्थांना ना सरकार घसघशीतपणे काही देते, ना खासगी व्यक्ती त्यांच्यासाठी हात सैल सोडतात. त्यात आपली शोकांतिका ही की शिक्षण, त्याचा दर्जा इत्यादीची भले आपल्याकडे बोंब असेल; पण शिक्षणसम्राटांचे पीक मात्र अमाप! काही मोजके सन्माननीय अपवाद सोडल्यास आपल्या अध्यापकांस कारकुनाच्या पातळीवर येण्यात काही वाटत नाही आणि आपल्या कुलगुरूंस शिक्षणसम्राटांचे हुजरे होण्यात काही कमीपणा वाटत नाही. गेली कित्येक वर्षे आपली ही शिक्षणसम्राटांची आडपैदास अव्याहत सुरू आहे. पण या एकाही सम्राटास आयआयटीच्या जवळपासही जाईल अशी संस्था उभारता आलेली नाही. एका बाजूने सत्ताधारी सम्राट आणि दुसरीकडे हे शिक्षणसम्राट यांच्या कात्रीत अडकलेली आपली शिक्षणव्यवस्था पाहिली की आयआयटी, आयआयएम, एनएसडी वगैरे संस्थांचे मोठेपण अधोरेखित होते. आणि नंदन निलेकणींसारखे या संस्थांचे पांग फेडणारे विद्यार्थी पाहिले की आपल्या शैक्षणिक सम्राटांचे दरिद्री साम्राज्य तेवढे उठून दिसते. अशा बौद्धिक पोकळ साम्राज्यावर महासत्तेचा इमला, कितीही इच्छा असली तरी, उभारला जाऊ शकत नाही हे शिक्षणाचे महत्त्व जाणणाऱ्या मध्यमवर्गालाच लक्षात येत नसेल तर आपले आपणच धन्य!

# समान नागरी कायद्याला चुकीचा विरोध!



देशकाल

योगेंद्र यादव

## तिहेरी तलाकप्रमाणेच विरोधक भाजपच्या नव्या जाळ्यात फसत आहेत...

**समान नागरी** कायद्यावरील वाद पेटवण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या सरकारने केलेल्या खटाटोपांना अपेक्षित प्रतिसाद मिळतो आहे. हे सगळे घडवून आणण्याची गरजच काय होती, असा प्रश्न उपस्थित करत अनेक विरोधी नेत्यांनी समान नागरी कायद्याच्या विरोधात भूमिका मांडली आहे. मुस्लीम संघटनांनी आणखी एक पाऊल पुढे टाकत अल्पसंख्याक तसेच आणि राज्यघटनेच्या विरोधातील भयंकर पाऊल असे म्हणत निषेध केला आहे. एकीकडे समान नागरी कायदा आणण्यासाठी भाजपने जोर लावलेला दिसतो आहे तर दुसरीकडे धर्मनिरपेक्षतावादी पक्ष या कायद्याच्या विरोधात आहेत. या वैचारिक लढाईसाठी होत असलेली वातावरणनिर्मिती क्लेशदायक आणि परस्पर विसंगत आहे.

भाजपला हवी आहे, तशीच या मुद्द्याची चर्चा होते आहे. हिंदू धर्म, परंपरा, राष्ट्रवाद आणि आता समान नागरी कायदा या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपने ताब्यात घेतलेल्या मुद्द्यांपासून धर्मनिरपेक्ष राजकारणाला माघार घ्यावी लागत आहे. ती रोखण्यासाठी धर्मनिरपेक्ष राजकारणाने समान नागरी कायद्याच्या संदर्भातील तात्त्विक आणि प्रागतिक मुद्द्यांवर भर दिला पाहिजे. कोणत्याही एका धर्माच्या चालीरीती आणि प्रथांशी समान नागरी कायद्याचा काहीही संबंध नाही हे त्यांनी ठासून सांगणे आवश्यक आहे; हा कायदा वेगवेगळ्या धार्मिक समुदायांमध्ये समानता या घटनात्मक तत्त्वाला प्राधान्य देतो आणि लैंगिक न्यायाची हमी देतो. समान नागरी कायद्याला विरोध करणे हे चुकीचे राजकारण आहे, हे त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. कारण २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भूमिका म्हणूनदेखील हा विरोध चुकीचाच ठरेल.

### कारणमीमांसा

समान नागरी कायद्याच्या कल्पनेत एक साधा आणि महत्त्वाचा तार्किक मुद्दा आहे, तो म्हणजे कायद्यासमोर सगळे समान असणे. सर्व नागरिकांना समान दंड संहितेद्वारे शिक्षा करता येते, तर नागरी संहितेलाही समान तत्त्व का लागू करू नये? वेगवेगळे समुदाय त्यांच्या स्वतंत्र प्रथा आणि विधींचा अवलंब करू शकतात, परंतु कोणत्याही समुदायातील व्यक्तींच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करण्याची परवानगी कशी दिली जाऊ शकते? एखाद्या समुदायाचा धर्म किंवा संस्कृतीचा अधिकार त्या समाजातील स्त्रियांच्या समानतेच्या अधिकाराला झुगारू शकतो का?

अर्थात हे भाजपचे नाही, तर समान नागरी कायद्याची सर्वप्रथम मागणी करणाऱ्या महिला संघटनांचे मुद्दे होते. हे संविधान सभेतील एकमत होते. फाळणीच्या संदर्भात रखडलेल्या मूलभूत हक्कांमध्ये ही तरतूद ठेवण्याचा प्रस्ताव होता. जवाहरलाल नेहरू, बाबासाहेब आंबेडकर आणि राम मनोहर लोहिया यांनी समान नागरी कायद्याचा आग्रह धरताना हेच मुद्दे मांडले होते.

राज्यघटनेच्या अनुच्छेद ४४ मध्ये हे मार्गदर्शक तत्त्व आहे की : ''संपूर्ण देशभर समान नागरी कायदा असावा यासाठी प्रयत्न केले जातील.'' राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले पाहिजे, अशी मागणी करणारे या मुख्य तत्त्वाकडे अचानक पाठ फिरवू शकत नाहीत. राज्यघटना स्वीकारून ७३ वर्षे झाली तरी देश या विचारासाठी तयार नाही असे आता आपण म्हणू शकत नाही.

### मुद्द्यावर बोला

समान नागरी कायद्याला विरोध हे देखील वाईट राजकारण आहे. सरकारच्या विधि आयोगाची त्यावर सखोल चर्चा करून झाल्यावर पाच वर्षांनी आणि लोकसभा निवडणुकीच्या दहा महिने आधी समान नागरी कायद्याची चर्चा घडवून आणणे हे अल्पसंख्याकांना लक्ष्य करण्यासाठी आणखी एक निमित्त शोधणे आहे. काँग्रेससारखे पक्ष या कायद्यातील सुधारणा हिंदूंच्या गळी उतरवतील, परंतु मुस्लीम आणि ख्रिश्चनांच्या बाबतीत तसे करण्याची हिंमत दाखवू शकत नाहीत, हे दाखवून देणे हा त्यामागचा उद्देश आहे. विरोधकही मुस्लीम आणि ख्रिश्चन समुदायांच्या कर्मठ नेत्यांसारखेच आहेत, हे दाखवणे हा यामागचा हेतू आहे. तिहेरी तलाकविषयीच्या जाळ्यात अडकलेले विरोधक या जाळ्यातही फसत आहेत.

समान नागरी कायद्याला विरोध करण्याऐवजी, विरोधकांनी भाजपने त्याचा कसा चुकीचा अर्थ लावला आहे, हे सांगितले पाहिजे. या प्रस्तावित कायद्यावर चर्चा घडवून आणली पाहिजे. यात, समान नागरी कायद्याचा आपला आग्रह कसा योग्य आहे, ठसवण्यासाठीचे भाजपचे प्रयत्न आणि परंपरावादी धार्मिक सनातनी वृत्तीच्या विरोधात ठामपणे उभी असलेली स्त्रीवादी चळवळ यातून विरोधकांनी योग्य तो धडा घेतला पाहिजे.

भाजप समान नागरी कायद्याबाबत शाब्दिक खेळ करतो आहे. हा कायदा एकजिनसीपणा, एकलता आणि समानता सूचित करतो, असे गृहीत धरले जाते. वास्तवात, देशात अस्तित्वात असलेल्या विविध कौटुंबिक कायद्यांची जागा घेणारा एकच कायदा असावा, असा त्याचा अर्थ आहे. आणि त्या कायद्यामध्ये सर्व धार्मिक समुदायांच्या सदस्यांसाठी विवाह, घटस्फोट, दत्तक आणि वारसा हक्कासाठी समान तरतुदी असणे आवश्यक आहे. हाच मुद्दा भाजपला पुढे रेटायचा आहे. आणि भाजपच्या टीकाकारांनाही याच मुद्द्याला विरोध करायचा आहे. पण हा राज्यघटनेचा लावलेला चुकीचा अर्थ आहे.

### 'एकरूपते'चे मुद्दे

समान नागरी कायद्यात काही सामान्य तत्त्वे पण भिन्न नियम आहेत. येथे, एकसमानतेचा अर्थ असा होईल की सर्व धार्मिक आणि सामाजिक समुदाय राज्यघटनेची तत्त्वे पाळतील. कोणत्याही समुदायाच्या कौटुंबिक कायद्याला समानता, भेदभावाला विरोध आणि लैंगिक न्याय यांचे उल्लंघन करता येणार नाही.

त्याच वेळी, ही तत्त्वे भिन्न समुदायांसाठी त्यांच्या विद्यमान पद्धतींनुसार वेगवेगळी असू शकतात. मुस्लीम विवाह हा निकाहनाम्यावर आधारित एक करार असतो. 'एकसमान' नागरी कायद्यासाठी मुस्लिमांना ती पद्धत सोडून देण्याची गरज नाही किंवा हिंदूंनाही ती स्वीकारण्याची गरज नाही. वेगवेगळे समुदाय घटनात्मक तत्त्वांच्या एकसमान संचाचे उल्लंघन करत नाहीत तोपर्यंत विवाह, घटस्फोट, दत्तक आणि वारसा यांच्याशी संबंधित मूलतः भिन्न, अगदी विरुद्ध प्रथा आणि पद्धतींचे पालन करणे सुरू ठेवू शकतात.

एक कायदेबदल केला आणि आधीचे पुसले जाऊन सगळे काही बदलले असे समान नागरी कायद्याच्या बाबतही होणार नाही, हे तर स्पष्टच आहे. त्यासाठी तीन कायदेविषयक बदल आवश्यक आहेत. एक म्हणजे २१ व्या कायदा आयोगाने सुचविल्याप्रमाणे विद्यमान वैयक्तिक कायद्यांमध्ये व्यापक सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यात महिलांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी तरतुदी करताना मुस्लिमांमधील कायदेशीर मान्यता असलेल्या पण वास्तवात फार अवलंब होत नसलेल्या बहुपत्नीत्वाच्या प्रथेवर नियंत्रण आणणे आणि तसे करण्यापासून संबंधितांना परावृत्त करणे समाविष्ट असावे. दुसरीकडे हिंदू आणि इतर समुदायांमध्ये कायदेशीर परवानगी नसतानाही अस्तित्वात असलेल्या बहुपत्नीत्वाच्या प्रथेपासून स्त्रियांच्या हितांचे रक्षण करणे, ख्रिश्चनांमध्ये घटस्फोट आणि दत्तक विधानाचे सुलभीकरण आणि विशेष विवाह कायद्यांतर्गत नोटीस कालावधी काढून टाकणे अपेक्षित आहे. विधि आयोगाने हिंदू कायद्यांतर्गत हिंदू अविभक्त कुटुंबाचे करांसंबधीचे विशेषाधिकार काढून टाकण्याची शिफारस केली आहे. या सर्व बदलांना बहुसंख्य तसेच अल्पसंख्याक समुदायातील धार्मिक सनातनी वृत्तींकडून विरोध केला जाऊ शकतो. पण धर्मनिरपेक्ष राजकारणाने त्या दबावापुढे ठामपणे उभे राहिले पाहिजे.

दुसऱ्या कायदेशीर बदलामध्ये विविध समुदायांच्या रीतिरिवाज आणि पद्धतींच्या संहितीकरणाचा समावेश असेल. अद्याप त्यांचा कोणत्याही कायद्यात समावेश नाही. उदाहरणार्थ, ताबा किंवा पालकत्वाशी संबंधित कोणत्याही वादात मुलाचे हित सर्वोपरी असले पाहिजे हे तत्त्व कायद्यात समाविष्ट करणे आवश्यक आहे.

तिसऱ्या कायदेशीर बदलामध्ये ज्यांना सध्याचा समुदाय-विशिष्ट कौटुंबिक कायदा मान्य नाही, अशा नागरिकांसाठी विद्यमान विशेष विवाह कायद्याची व्याप्ती आणखी विस्तारली पाहिजे. असा कायदा गोव्यात आधीपासूनच अस्तित्वात आहे आणि तो धर्माचा विचार न करता गोव्यातील सर्व नागरिकांना लागू आहे. आंबेडकरांनी या धर्तीवर स्वयंसेवी नागरी संहिता सुचवली होती.

भाजपने जे मुद्दे सातत्याने हातात घेतले, त्यांच्यापासून धर्मनिरपेक्ष राजकारणाने बऱ्याच काळापासून काढता पाय घेतलेला आहे. स्वतःचाच पराभव करणाऱ्या त्यांच्या या राजकारणाचे समान नागरी कायदा हे आणखी एक उदाहरण ठरू नये. भाजपला अपेक्षित खेळीनुसार खेळणे आणि अल्पसंख्याक समुदायांच्या पुराणमतवादी नेतृत्वाशी हातमिळवणी करणे याऐवजी, धर्मनिरपेक्ष राजकारणाने भाजपचा खोटारडेपणा उघड केला पाहिजे आणि त्यांना प्रस्तावित समान नागरी कायद्याचा ठोस मसुदा सादर करण्यास सांगितले पाहिजे.

लेखक 'जय किसान आंदोलन' आणि 'स्वराज इंडिया'चे संस्थापक आहेत. yyopinion@gmail.com

अन्वयार्थ

# ध्रुवीकरणासाठी वाट्टेल ते...

**मंदिर महासंघाने** राज्यातील मंदिर व परिसरात घोषित केलेली वस्त्रसंहिता वादाच्या भोवऱ्यात अडकलेली असतानाच आता या संघाची मंदिर परिसरातील मद्य व मांसमुक्तीसाठीची मोहीम या वादात आणखी भर घालणारी ठरेल यात शंका नाही. धार्मिक पावित्र्याच्या दृष्टिकोनातून मंदिर परिसरात मद्य व मांसभक्षण नको हा वरकरणी कुणालाही पटेल असाच मुद्दा आहे, यात शंका नाही. पण मग हजारो वर्षांपासून अनेक मंदिरांमध्ये चालत आलेल्या त्यासंदर्भातील प्रथा, परंपरांचे काय करायचे? केवळ राज्यातच नाही तर देशात अनेक ठिकाणी अशी अनेक मंदिरे आहेत जिथे कोंबडी वा बकरीचे मांस नैवेद्य म्हणून दाखवले जाते. मध्य प्रदेशातील उज्जैनच्या एका मंदिरात तर प्रसाद म्हणून मद्य चढवण्याची प्रथा सर्वश्रुत आहे. अनेक आदिम जमातींमध्ये त्यांच्या त्यांच्या देवासमोर मांसभक्षण करून नवस फेडण्याची प्रथा आहे. आजही असंख्य लोकांकडून या प्रथेचे पालन अगदी श्रद्धेने केले जाते. या सगळ्याच प्रथा हजारो वर्षे चालत आलेल्या संस्कृतीचा भाग आहेत आणि त्या त्या लोकजीवनाचा त्या भाग आहेत. वेगवेगळे धर्म, पंथ आणि त्यांच्या वेगवेगळ्या चालीरीती, प्रथा यांचा अवलंब करणाऱ्या भारतात या संदर्भातील वैविध्य खरे तर डोळ्यांत भरणारे आहे. त्यासंदर्भात या नव्याने स्थापन झालेल्या महासंघाची भूमिका काय आहे? राज्यातील किंवा देशातील काही मंदिरांच्या परिसरात असलेली पशुबळीची प्रथा बंद करणारा कायदा करण्यासाठी आग्रह धरणे एक वेळ समजण्यासारखे होते. त्यावर वाद, चर्चा, न्यायालयीन लढाई असे कायदेशीर मार्ग चोखाळता आले असते. मात्र केवळ एका धर्माची पालखी वाहणाऱ्या या संघटनेला मोहिमेच्या गोंडस नावाखाली अशा प्रकारची कोणतीही बंदी घालण्याचा अधिकार कुणी दिला?

मुळात आपल्या घटनेने प्रत्येकाला त्याच्या पद्धतीनुसार पूजा अथवा उपासना करण्याचा अधिकार दिला आहे. त्यात सुधारणा करण्याचे धाडस हा महासंघ कशाच्या बळावर दाखवतो? वास्तवात ही मागणीच घटनाबाह्य प्रक्रियेला चालना देणारी आहे. आम्ही म्हणू तीच श्रद्धा, आम्ही सांगू तीच परंपरा असा वर्चस्ववादी दृष्टिकोन सर्वत्र बळावत चालला आहे. त्यामागे एकमेव हेतू आहे तो म्हणजे ध्रुवीकरण! कधी धर्म तर कधी संस्कृतीच्या पातळीवरून होणारे हे प्रकार केवळ उपासनाच नाही तर व्यक्तिस्वातंत्र्यावरसुद्धा घाला घालणारे आहेत. आधुनिकतेची कास सोडून मागासपणाकडे नेणारे आहेत. समाज जसजसा प्रगल्भ होत जाईल तशा या बळी देण्यासारख्या अनिष्ट गोष्टी मागे पडत जातील. त्यासाठी गरज आहे प्रबोधनाची. केवळ बंदी लादून ते होऊ शकत नाही. याची कल्पना या संघटनेलासुद्धा असावी. तरीही हा मुद्दा पुढे रेटण्यामागचे एकमेव कारण राजकीय दृष्टिकोनात दडले आहे. समाजाला भेडसावणाऱ्या समस्यांविषयी चर्चा टाळायची असेल तर असे मुद्दे प्रभावी ठरत असतात. नेमका तोच धागा पकडून ही संघटना मैदानात उतरली असावी अशी शंका घेण्यास बराच वाव आहे. सर्वात आधी या महासंघाने वस्त्रसंहितेचा मुद्दा पुढे आणून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. खरे तर अशा संहितेची काहीही गरज नाही. जे श्रद्धेने मंदिरात जातात ते आपसूकच या संहितेचे पालन करतात. मात्र मंदिरात येताना कुणी कोणते कपडे घालावेत व कोणते घालू नयेत हे ठरवण्याचा अधिकार एखाद्या व्यक्ती व संघटनेने हाती घेतला की व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने लादण्याचा जणू परवानाच मिळाला अशा थाटात त्याची अंमलबजावणी केली जाते. नेमका इथेच वाद सुरू होतो व तो थेट ध्रुवीकरणाच्या दारापर्यंत पोहोचतो. मंदिर व्यवस्थापनांची एकजूट घडवून आणण्याच्या प्रयत्नात असलेल्या या संघटनेला नेमके हेच हवे आहे. मध्यंतरी तुळजापूरच्या मंदिरात असा संहिता फलक लागला व भाविकांच्या विरोधानंतर तो काढून घ्यावा लागला. त्याकडे दुर्लक्ष करून मंदिर प्रवेशासाठी नवनवे नियम तयार करण्यात आघाडीवर असलेल्या या संघटनेचा हेतू वेगळा आहे. अनेकांना तो वरकरणी समाजाच्या भल्यासाठी वाटत असला तरी त्यामागे दडलेला राजकीय स्वार्थ लपून राहिलेला नाही.

काही दशकांपूर्वी राज्यातील अनेक मंदिरांत उघडपणे पशुबळी दिले जायचे. सामाजिक प्रगतीचा रेटा वाढला तशा या वाईट प्रथा मागे पडत गेल्या. शिवाय अनेक प्राणी व पशुप्रेमी संघटनांनीही या मुद्द्यावर भाविकांचे प्रबोधन करण्यासाठी पुढाकार घेतला. त्याचा चांगला परिणाम दिसून आला. कुठलीही बंदी न लादता हे घडून आले कारण या प्रयत्नांमागे राजकीय स्वार्थ नव्हता. आता असा स्वार्थ ठेवूनच अतिशय संघटितपणे अशा मोहिमा हाती घेतल्या जात आहेत. धार्मिक सुधारणा असे गोंडस नाव त्याला दिले जात असले तरी त्यामागचा हेतू पूर्णपणे राजकीय आहे. सुधारणांच्या नावाखाली एखाद्या झुंडीच्या हातात आपले अधिकार जायला लागले, प्रथा-परंपरांवर नियंत्रण यायला लागले तर बाकी काही नाही, पण काळ सोकावत जाईल, हे लक्षात घ्यायला हवे.

विश्लेषण

# व्याघ्र संवर्धनावरच भर का?

राखी चव्हाण

**राज्यच नाही** तर केंद्र सरकारचाही इतर वन्यप्राण्यांच्या तुलनेत वाघांच्या संरक्षण आणि संवर्धनावर अधिक भर आहे. व्याघ्रकेंद्रित पर्यटनामुळे सरकारच्या तिजोरीत पडणारी भर हे त्यामागचे एक कारण आहे. खरे तर जैवविविधतेतील प्रत्येक घटक तेवढेच महत्त्वाचे असतात. पण वाघांपुढे ते दुर्लक्षित ठरत आहेत. परिणामी अनेक प्राणी आणि पक्षी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. सरकारची हीच भूमिका कायम राहिली तर हवामानाप्रमाणेच जैवविविधतेचे चक्र बिघडण्यास वेळ लागणार नाही.

### इतरही प्राण्यांच्या संवर्धनाची गरज का?

जैवविविधतेतील प्रत्येक घटक म्हणजेच वनस्पतीपासून ते सर्व प्रकारचे प्राणी आणि पक्षी एकमेकांवर अवलंबून असतात. यातला एकही घटक कमीजास्त झाला तर जैवविविधतेचे चक्र बिघडू शकते. या वन्यप्राण्यांच्या अधिवासात गवतापासून ते इतर अनेक प्रकारच्या वनस्पती नसतील तर त्यावर अवलंबून असणारे तृणभक्ष्यी प्राणी तिथे राहू शकणार नाहीत. तृणभक्ष्यी प्राणी नसतील तर वाघांना भक्ष्य मिळणार नाही आणि वाघही तिथे राहू शकणार नाहीत. नागझिरा अभयारण्य हे त्याचे उत्तम उदाहरण असून अलीकडच्या काही वर्षांत तिथे अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे वाघ सांभाळायचा असेल तर फक्त त्याच्यावरच लक्ष केंद्रित करून चालणार नाही तर या इतरही घटकांचे तेवढेच संवर्धन करणे आवश्यक आहे.

### व्याघ्र संवर्धनावरच भर का?

व्याघ्रकेंद्रित पर्यटनातून सरकारच्या तिजोरीत कोट्यवधींचा महसूल जमा होतो, ही बाब नाकारता येणार नाही. व्याघ्रकेंद्रित पर्यटनामुळे देशात वाघांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्याला पाहण्यासाठी पर्यटक हजारो रुपये मोजायला तयार असतात. मध्य प्रदेश, महाराष्ट्र ही दोन राज्ये व्याघ्रकेंद्रित पर्यटनात आघाडीवर आहेत. या दोन्ही राज्यांत वाघांची संख्याही वाढत आहे. या पर्यटनातून हजारो लोकांना रोजगार उपलब्ध होत आहे. त्यामुळे इतर वन्यप्राणी आणि पक्ष्यांवर भर देण्यापेक्षा सरकार आणि वन खातेही व्याघ्रकेंद्रित संवर्धनावर अधिक भर देत आहे.

### व्याघ्रकुळातील बिबट्याही दुर्लक्षितच का?

वाघांप्रमाणेच बिबट्याही अनुसूची एकमधील आणि मार्जार कुळातील वन्यप्राणी आहे. तरीही वाघांच्या तुलनेत तो दुर्लक्षितच आहे. वाघांच्या तुलनेत बिबट्यांच्या मृत्यूची संख्या अधिक आहे. १९९८ मध्ये भारतात सुमारे ४५ हजार बिबटे होते.



२०१५ मध्ये ते केवळ सात हजार ९१० इतकेच राहिले. गेल्या १७ वर्षांत बिबट्यांच्या संख्येत ८२ टक्क्यांनी घट झाली आहे. व्याघ्रसंवर्धनासाठी प्रयत्न केले जात असताना बिबट्यांच्या संवर्धन आणि संरक्षणासाठी कोणतेही प्रयत्न करण्यात आलेले नाहीत. त्यासाठी कुठलीही विशेष यंत्रणा नाही. त्यामुळेच बिबट्यांची संख्या झपाट्याने कमी झाली आहे. संवर्धनाच्या बाबतीत वाघाच्या तुलनेत बिबट्यांना दिलेले दुय्यम स्थान हेदेखील त्यामागचे एक कारण आहे.

### निसर्गाचा स्वच्छतादूत असूनही दुर्लक्ष का?

गिधाडांना निसर्गाचा स्वच्छतादूत अशी उपमा दिली आहे. मेलेली जनावरे फस्त करणे हे त्याचे काम आणि म्हणूनच त्यांना ही उपमा देण्यात आली. मात्र, गुरांच्या उपचारासाठी उपयोगात आणले जाणारे डायक्लोफेनॅक नावाचे वेदनाशामक औषध गिधाडांसाठी विष ठरले आहे. उपचारादरम्यान जनावरांना हे औषध दिले जाते आणि ही जनावरे मेल्यानंतर त्यांच्या मृतदेहाचा फडशा पाडणाऱ्या गिधाडांच्या शरीरात ते पोहोचते. त्यासाठी या औषधांवर बंदी आणली गेली, पण तोपर्यंत देशातील सुमारे ९९ टक्के गिधाडे संपून केली. कधीकाळी कुणी लक्षसुद्धा देणार नाहीत इतक्या मोठ्या संख्येत आढळणारी गिधाडे आज दुर्मीळ होऊन बसली आहेत. त्यांच्या संवर्धनासाठी काही स्वयंसेवी संस्था प्रयत्न करत आहेत, पण शासनदरबारी हा स्वच्छतादूत अजूनही उपेक्षितच आहे.

### आणखी कोणते प्राणी-पक्षी दुर्लक्षित?

बिबट्या, कोल्हा, लांडगा, काळवीट, रानकुत्रे, माळढोक, सारस यांसारखे वन्यप्राणी आणि पक्षी दुर्लक्षित आहेत. यातील काही प्राणी आणि पक्षी वाघांप्रमाणेच अनुसूची एकमध्ये आहेत. तरीही सर्व प्रयत्न आणि निधी व्याघ्रसंवर्धनासाठी वापरला जातो आणि इतर प्राणी आणि पक्ष्यांसाठी कोणत्याही योजना गांभीर्याने राबवल्या जात नाहीत. माळढोकसारखा राजबिंडा पक्षी केवळ भारत आणि पाकिस्तानात स्वतःचे अस्तित्व टिकवून आहे. भारतात त्यांची संख्या १०० तरी असेल की नाही, शंका आहे. ही संख्या परत वाढण्याची आशा मावळत चालली आहे. शेतकऱ्यांसाठी ते अडसर ठरत असल्याने आणि शेतकरी मतदार असल्याने त्यांच्या मतांच्या जोगव्यासाठी राज्यकर्तेही लोकांच्याच बाजूने आहेत. माळढोक अभयारण्य केवळ नावापुरते उरले आहेत. हीच गत सारस या पक्ष्यांच्या बाबतदेखील आहे. महाराष्ट्रात केवळ भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांतच त्याचे अस्तित्व उरले आहे. या पक्ष्यालादेखील स्वतःचे अस्तित्व कायम राखण्यासाठी न्यायालयात धाव घ्यावी लागली आहे, अशी परिस्थिती आहे.

rakhi.chavhan@expressindia.com

तुमच्या प्रतिक्रिया, मते, सूचना आम्हाला कळवा viva@expressindia.com

# परदेशातही योगप्रचार

**२१ जून हा 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' म्हणून जगभर साजरा केला गेला. जगभरात योग प्रचार आणि प्रसारात भारतातील तरुण मंडळी पुढे आहेत. महाराष्ट्रातील तरुणाईचे योग प्रचारासाठी परदेशामध्ये सुरू असलेले प्रयत्न आणि त्यांचे अनुभव याविषयी जाणून घेण्याचा हा प्रयत्न...**

**मितेश रतिश जोशी**





**जगभरात २१** जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करायला सुरुवात झाली ती २०१५ पासून... २१ जून हा उत्तर गोलार्धात वर्षातील सर्वात मोठा दिवस असल्यामुळे आणि जगाच्या अनेक भागांमध्ये या दिवसाला विशेष महत्त्व असल्यामुळे जागतिक योग दिनासाठी ही तारीख निवडण्यात आली. अलीकडे योगशास्त्राचा मोठ्या प्रमाणावर अभ्यास सुरू आहे. केवळ भारतातच नाही तर भारताबाहेरसुद्धा अनेक देशांमध्ये योगाचा प्रसार झाला आहे आणि दिवसेंदिवस त्याची व्याप्ती वाढत चालली आहे. महाराष्ट्रातील तरुण मंडळी सातासमुद्रापार जाऊन थेट त्या देशाच्या रहिवाशांनाच योग शिक्षणाचे धडे देताना दिसत आहेत.

पुण्यातील भालचंद्र ढेकाने हा युवक रोमानिया देशातील बुखारेस्ट शहरांमध्ये योग वर्गातून तिथल्या रहिवाशांना मार्गदर्शन करतो आहे. भारत सरकारच्या 'भारतीय संस्कृती संबंध परिषदे'मार्फत भारतीय संस्कृती व योग विद्येचा अध्यापक म्हणून त्याची त्या देशात निवड झाली. भालचंद्र त्याच्या अनुभवांबद्दल सांगतो, 'प्राचीन काळापासूनच भारतीय संस्कृती व योग विद्या याबद्दल युरोपीय देशांना आकर्षण आहे हे आपण समाजमाध्यमांमुळे जाणतोच; पण हे मी स्वतः रोज अनुभवतोय. माझ्या वर्गात मारिया नावाची एक विद्यार्थिनी आहे. तिला योगसाधनेमुळे फार फायदा झाला. आश्चर्य म्हणजे तिचे आजोबा भारतातून योगा शिकून गेले होते आणि त्यांनी तिला योगा शिकण्यासाठी सक्ती केली. मारियाने मला गप्पांच्या ओघात सांगितले, तिचे आजोबा ९४ वर्षं जगले व ते रोज योगसाधना-प्राणायाम करायचे. ते नेहमी इतरांना छातीठोकपणे योग करा आणि योग शिका, असा सल्ला द्यायचे.' एकीकडे योगाचे महत्त्व तेथील लोकांपर्यंत पोहोचले असले तरी तिथे योग शिकवताना आव्हानंही तितकीच आहेत. याविषयी भालचंद्र सांगतो, 'नवीन व आवडीची गोष्ट शिकताना ज्याप्रमाणे एक आतुरता असते तीच मानसिकता मला इथल्या विद्यार्थ्यांमध्ये जाणवते. पूर्वकल्पना काहीच नसल्यामुळे खूप बेसिक गोष्टी त्यांना समजावून सांगाव्या लागतात. माझ्या सांगण्यात व त्यांच्या समजण्यात फरक असतो. त्यामुळे लेक्चर देताना विशेष अडचणी निर्माण होतात. अष्टांगयोगमधील आठवं व अंतिम अंग म्हणजे समाधी होय. या समाधीचा अर्थ समजावताना माझ्या नाकीनऊ आले होते; पण हळूहळू ध्यानाच्या कृतीतून ते त्यांना उलगडत गेले.'




बबिता वाघ ही युवती नाशिकमध्ये योग विद्या गुरुकुलमध्ये दहा वर्षं योगशिक्षण देऊन आता हंगेरी या देशामध्ये योगशिक्षणाची ओळख करून देत आहे. 'अमृता शेरगीलकर कल्चरल सेंटर'मध्ये गेली दोन वर्षं बबिता योगशिक्षक म्हणून काम करते आहे. 'परदेशी लोकांना योगाबद्दल खूप आकर्षण आहे. भारताबाहेर योगाचे अनेक पर्याय उपलब्ध झाल्याने हे आकर्षण दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. विक्रम योगा, हॉट योगा, पॉवर योगा, वॉटर योगा, हठ योगा असे अनेक पर्याय परदेशी बांधवांजवळ त्यांच्या देशामध्ये उपलब्ध आहेत. वजन वाढविण्यासाठी, सुंदर दिसण्यासाठी व वजन कमी करण्यासाठी या तीन मूलभूत समस्यांवर उत्तर म्हणून परदेशात योगाची चलती आहे,' असं सांगणाऱ्या बबिताने तिथेही पारंपरिक पातंजल योगसूत्रांच्या आधारावरच योगाचे शिक्षण देत असल्याचे सांगितले. शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक व भावनिक तंदुरुस्तीलाही विशेष प्राधान्य देत असल्याने तिच्याकडे विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्याची माहिती तिने दिली. 'हंगेरीमध्ये भारतातील अनेक अग्रगण्य योग इन्स्टिट्यूटच्या शाखा आहेत, त्यामुळे इथे योगाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होतो आहे. भाषेचे बंधन असल्याने केवळ तरुण मुलांचीच संख्या जास्त आहे,' हे सांगताना हंगेरीतही बाहेरच्या देशातून शिक्षणासाठी वा कामाच्या निमित्ताने येणारे तरुण-तरुणीही फिट राहण्यासाठी योगशिक्षणाला प्राधान्य देऊ लागले आहेत, हेही तिने नमूद केले. केनियातील एक तरुणी हंगेरीमध्ये पीएचडी करण्यासाठी आली. कालांतराने तिला माझ्या योग क्लासची माहिती मिळाली. माझ्याकडून योगचा अर्थ जाणून घेऊन तिने फिट राहण्यासाठी योग शिक्षणाची निवड केली. ज्या देशांमध्ये पारंपरिक योगशिक्षण उपलब्ध नाही, अशा देशांमध्ये भारतातून पारंपरिक योगशिक्षण घेऊन, योगशास्त्राचा सखोल अभ्यास केलेल्या योगशिक्षकांना चांगली संधी आहे, असेही तिने सांगितले.

दर्शना राजपूत ही युवती इस्रायलमध्ये योगशास्त्राचा प्रसार करते आहे. दर्शनाला ही संधी 'इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन'तर्फे मिळाली. 'इथल्या मंडळींना योगाबद्दल अत्यंत आकर्षण आहे. माझे काही विद्यार्थी सकाळी सेशन अटेंड केल्यानंतर संध्याकाळीही सेशनला वेळेआधी हजर असतात. ओंकारचा उच्चार करताना मिळणारा आनंद अनुभवायला, एकाग्र व्हायला, ध्यानस्थ बसायला आणि त्यातून मिळणाऱ्या आनंदाचा अनुभव घेण्यासाठी ते उत्सुक असतात,' असं दर्शना सांगते. परदेशातील जीवनशैली अत्यंत बिझी व फास्ट असल्याने त्यातून सायको-सोमॅटिक म्हणजेच शारीरिक- मानसिक आजार होण्याचे प्रमाण अधिक आहे. या आजारांमुळे मानसिक ताणतणावांना मोठ्या प्रमाणात सामोरे जावे लागते. योगामुळे हा ताण कमी होतो, हा विश्वास त्यांच्यात निर्माण झाला आहे, असेही तिने सांगितले.

योगशास्त्रामुळे केवळ परदेशात अर्थार्जनाची संधीच नव्हे तर स्वतःतही आमूलाग्र बदल अनुभवणारेही अनेक तरुण-तरुणी आहेत. उपलब्ध तंत्रज्ञानाचा वापर करत त्यांनी योगशिक्षणाच्याही अनेक नवीन वाटा शोधून काढल्या आहेत. पुण्याचा रिशी नागोरी हा तरुण त्यापैकीच एक! अमेरिकेतून पदव्युत्तर शिक्षण घेऊन वडिलोपार्जित व्यवसाय सांभाळण्यासाठी भारतात परतलेल्या रिशीने पुण्यात योग शिबीर केले. त्यात रस वाढला म्हणून म्हैसूरला जाऊन पारंपरिक अष्टांगयोग साधना केली. योगाचा त्याच्यावर इतका प्रभाव पडला, की सहा महिने कामातून सुट्टी घेत तो हिमालयात साधनेसाठी गेला. त्यानंतर कॅलिफोर्नियामध्ये योगशास्त्राचा प्रसार करण्यासाठी गेला असताना त्याच्या लक्षात आलं की, योग शिबिरांचे वेळापत्रक विद्यार्थ्यांना कळावे, फीची देवाणघेवाण नीट व्हावी, योगशास्त्राची अधिक माहिती मिळावी म्हणून अमेरिकेत 'माइंड बॉडी' या सॉफ्टवेअरचा वापर केला जातो. भारतात असं योगविषयक कोणतंच सॉफ्टवेअर उपलब्ध नव्हतं. त्यानंतर रिशीने भारतात येऊन 'योग मित्र' नावाचं भारतीय बनावटीचं सॉफ्टवेअर डेव्हलप केलं. या ॲपच्या माध्यमातून भारतीय योगशिक्षिकांना भारतात राहून परदेशी विद्यार्थ्यांशी संवाद साधता येतो. परदेशी विद्यार्थ्यांना भारतातील शिक्षकांनी आयोजित केलेल्या वेगवेगळ्या कोर्सेसमध्ये भाग घेता येतो. रिशी उन्हाळ्यात कॅलिफोर्नियामध्ये, तर थंडीत राजस्थानमधील पुष्कर येथे वर्ग घेतो. रिशी सांगतो, 'अमेरिकेत मेडिटेशनची चलती आहे. माझे विद्यार्थी कितीही बिझी असले तरी वेळात वेळ काढून सकाळी लवकर किंवा रात्री उशिरा क्लासमध्ये हजर असतात. सुरुवातीला गार्डनमध्ये किंवा घराच्या गॅरेजमध्ये माझे योगवर्ग व्हायचे. भारतात योगशिक्षणाच्या बाबतीत एवढा आग्रह दिसत नाही जेवढा अमेरिकेत प्रचंड प्रमाणात जाणवतो. इथे अनेक योगा स्टुडिओ आहेत जिथे दररोज योगासाधनेसाठी अमेरिकन एकत्र येतात. इथे माझ्या योग वर्गाच्या बॅच हाऊसफुल्ल असतात,' असंही त्याने सांगितलं.

योग ही जीवनशैली आहे. भारतात उगम पावलेली योग विज्ञानाची सरिता आता विश्वाच्या कानाकोपऱ्यात सर्वदूर पसरली आहे. आपल्याकडे उपलब्ध असलेलं योगशिक्षण, त्याचा सखोल अभ्यास, परदेशातील लोकांना त्याची असलेली ओढ लक्षात घेत उपलब्ध तंत्रज्ञान आणि संधी यांचा अचूक मेळ घालत तरुणाईने सातासमुद्रापार योगप्रचाराचा झेंडा डौलात फडकवत ठेवला आहे.

viva@expressindia.com



## ऐकू आनंदे



**शब्दांकनः श्रुती कदम**

**'एपिक ऑन'** या चॅनलवर प्रसारित होणारा ह्यकहाणीवालाह्ण या प्रसिद्ध पॉडकास्टमध्ये आर. जे. रिषभ आपल्या आयुष्यातील प्रत्येक परिस्थितीवर आधारित कथा, कविता आणि शायरी सांगतो. या कथा आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देतात. तसेच सध्या बदलत चालेल्या जगाची आणि आपण यामध्ये कुठे आहोत याची जाणीव करून देतात.

'कहाणीवाला' या पॉडकास्टच्या 'पुराने लोग' या भागात आर. जे. रिषभ खानसाहाब यांची एक गोष्ट सांगतो. दिल्लीला शिकताना भेट झालेल्या एका गृहस्थाला भेटण्यासाठी खानसाहाब बिकानेरला जातात, पण पत्ता व्यवस्थित माहिती नसल्यामुळे टांगेवाल्याला घेऊन खानसाहाब संपूर्ण बिकानेर शोधून काढतात. शोधता शोधता दिवस सरून रात्र होते म्हणून तो टांगेवाला त्यांना आपल्या घरी रात्री थांबण्याची विनंती करतो. पण शेवटी त्यांना त्या गृहस्थाचं घर सापडतं. आपल्यासोबत दिवसभर फिरल्यामुळे खानसाहाब जेव्हा त्या टांगेवाल्याला काही पैसे देतात तेव्हा तो बोलतो तुम्ही भावासारखे आहात म्हणून मी मदत केली. मला पैसे नको आणि तो निघून जातो. या आठवणीत रमलेले खानसाहाब आपल्या अपार्टमेंटच्या १३ व्या मजल्याच्या खिडकीत उभे राहून 'सुहानी यादों में जो जी रहा हो उसे आज की, मायूसी भरी जिंदगी कैसे रास आएगी' असे हसून म्हणतात.




मी असे अनेक पॉडकास्ट ऐकले आहेत, पण 'कहाणीवाला' या पॉडकास्टचा खास उल्लेख करावासा वाटतो. कारण त्यातला 'पुराने लोग' हा भाग मला खूप आवडला. पूर्वी लोक निःस्वार्थीपणे एकमेकांना मदत करायचे, पण आता मदत करणे ही वृत्तीच कुठे तरी हरवत चालली आहे. मी जेव्हा बारावीला होतो तेव्हा परीक्षेला जाताना माझी सायकल पंक्चर झाली आणि परीक्षेला खूप उशीर होत होता. पाकिटात पैसे पण नव्हते. तेव्हा मला एका गृहस्थाने मदत केली. तो मला परीक्षा केंद्रापर्यंत घेऊन गेला, त्याने नाश्ता दिला आणि परत माझ्या दाराजवळ सोडून गेला. त्याला पैसे तर मला देता आले नाहीत, पण त्याने मला यशस्वी हो हा आशीर्वाद मात्र दिला. हा पॉडकास्ट ऐकताना मला त्या गृहस्थाची आठवण झाली. असेदेखील दिलदार लोक होते या जगात जे माणुसकी जपायचे एवढी आठवणही पुरेशी आहे.

**– गौतम पोखरकर** ( आर्मी )

## अवकाशाशी जडले नाते




**विनय जोशी**

# लघुग्रहांचे गुरुत्व !

**३० जून १९०८.** सैबेरियातल्या अगदी दुर्गम भागात नेहमीप्रमाणे सकाळ उजाडली. तुंगुस्का नदीजवळच्या जंगलावर अचानक आभाळ फाडत एक स्फोट झाला. हिरोशिमावर पडलेल्या अणुबॉम्बपेक्षा १८५ पट ऊर्जा या स्फोटात होती. मनुष्यवस्ती नसल्याने जीवित हानी झाली नाही, पण जंगलातील अंदाजे ८ कोटी झाडे नष्ट झाली. याचे कारण होता पाच मजली उंच इमारतीएवढा एक लघुग्रह पृथ्वीच्या वातावरणात आला होता. जमिनीपासून १० किमी उंचीवर वातावरणातच त्याचा स्फोट झाला... या घटनेच्या स्मरणार्थ आणि अशा धोकादायक लघुग्रहां विषयी जागरूकता वाढविण्यासाठी ३० जून हा दिवस आंतरराष्ट्रीय लघुग्रह दिन म्हणून घोषित केला गेला आहे.

आपल्या सौरमालेत ग्रहांप्रमाणे पण अनियमित आकाराच्या आणि कमी वस्तुमानाच्या अनेक छोट्या खगोलीय वस्तू सूर्याभोवती फिरत आहेत. यांना लघुग्रह (Asteroid) असे म्हटले जाते. बहुतेक लघुग्रह हे खडकाळ असून त्यांच्या कक्षा मंगळ व गुरू ग्रहांच्या कक्षांच्या दरम्यान आहेत. लघुग्रह आकाराने लहान असल्याने डोळ्यांना दिसत नाहीत.अगदी दुर्बिणीचा शोध लागून २०० वर्ष उलटून गेल्यावर सुद्धा आपल्याला त्यांची माहिती नव्हती. टिटियस-बोडे यांच्या समीकरणानुसार मंगळ आणि गुरू यांच्यामध्ये २.८ खगोलीय एकक अंतरावर एखादा ग्रह असायला हवा होता. याचा शोध घेताना १ जानेवारी १८०१ मध्ये ग्युसेप्पी पियाझ्झी यांना सेरेस या लघुग्रहाचा शोध लागला ( याला पुढे बटुग्रह मानले जाऊ लागले ). आणि मग पुढे पल्लास, जुनो, व्हेस्टा असे लघुग्रह सापडले. ग्रहांच्या मानाने यांचा आकार फारच चिमुकला असल्याने यांना लघुग्रह असे नाव विल्यम हर्षल यांनी दिले. १८९० पर्यंत ३०० लघुग्रह शोधले गेले. १८९१ मध्ये जर्मन खगोल निरीक्षक माक्स वोल्फने फोटोग्राफीचा वापर करून २४८ लघुग्रह शोधले. २०व्या शतकात पृथ्वीवरील वेधशाळा आणि अंतराळातील दुर्बिणींमुळे लाखो लघुग्रह शोधले गेले. सध्या १२,९७,७०५ हून अधिक ज्ञात लघुग्रह आहेत.



लघुग्रहांची संख्या लाखोंच्या घरात असली तरी सगळ्या लघुग्रहांचे एकत्रित वस्तुमान चंद्रापेक्षाही कमी भरेल. सर्वात मोठा लघुग्रह व्हेस्टा ५३० किमी व्यासाचा आहे तर काही लघुग्रह १० मीटर व्यासाचे आहेत. बहुतेक लघुग्रह हे ओबडधोबड आणि अनियमित आकाराचे आहेत. अगदी थोडे गोलाकार आहेत. १५० हून अधिक लघुग्रहांना तर चंद्रासारखा लघु-उपग्रहसुद्धा आहे. काही लघुग्रहांचे गुणधर्म, कक्षा काही प्रमाणात सारख्या आहेत. अशा गटांना लघुग्रहाचे कुटुंब म्हटले जाते. निसा ,व्हेस्टा, फ्लोरा, इओस, कोरोनीस, युनोमिया, थेमीस, हायजिया, हंगेरीया ही प्रमुख कुटुंबे आहेत. बहुतेक लघुग्रह मंगळ आणि गुरूदरम्यान लघुग्रहांच्या पट्ट्यात आढळतात. काही लघुग्रह गुरूच्या कक्षेत गुरूच्या मागेपुढे राहून सूर्यप्रदक्षिणा करतात. हे गुरूचे ट्रोजन लघुग्रह. नेपच्यूनहून लांब असणारे लघुग्रह नेपच्यून कक्षेतर ( Trans- Neptunian Object) गटात मोडतात. काही लघुग्रहांची कक्षा पृथ्वीच्या कक्षेजवळ आहे. असे पृथ्वीसमीप लघुग्रह ( Near- Earth Asteroid) आपल्यासाठी महत्त्वाचे ठरतात.



तुंगुस्का घटनेनंतर असे पृथ्वीसमीप लघुग्रह चर्चेत आले. अल्वारेझ सिद्धांतानुसार साडेसहा कोटी वर्षांपूर्वी असाच एखादा मोठा लघुग्रह पृथ्वीवर आदळून डायनॉसॉर्स नष्ट झाले होते. १९९४ला शुमेकर लेव्ही धूमकेतू गुरूवर आदळला आणि लघुग्रहांपासून असणाऱ्या धोक्याची जाणीव अधिक तीव्र झाली. यातून लघुग्रहांच्या अभ्यासासाठी मोहिमांना गती मिळाली. शास्त्रज्ञांच्या मते लघुग्रह हे ४.६ अब्ज वर्षांपूर्वी आपली सौरमाला तयार होताना उरलेले अवशेष असावेत. त्यामुळे त्यांच्या अभ्यासातून सौरमालेच्या उत्पत्तीची काही रहस्ये उलगडू शकतात. बहुतांश लघुग्रह खनिजांनी समृद्ध आहेत. 'ॲस्टेरॉइड मायनिंग'द्वारे अशी खनिजे पृथ्वीवर आणता आली तर आपली खनिजांची गरज भागू शकेल.

इतर उद्देशाने आखलेल्या काही मोहिमांनी जाता जाता त्यांच्या मार्गात असणाऱ्या काही लघुग्रहांचे चित्रण केले. १९८९ मध्ये प्रक्षेपित केलेल्या गॅलिलिओ प्रोबने गुरूकडे जाताना ९५१ गास्प्रा, आणि २४३ आयडा या लघुग्रहांचे जवळून फोटो काढून पाठवले.

खास लघुग्रहांसाठी आखलेली पहिली मोहीम म्हणजे नासाची निअर शूमेकर होय. ४३३ इरॉस या पृथ्वीसमीप लघुग्रहाच्या अभ्यासासाठी १९९६ ला निअर यान झेपावले. याने १९९७ मध्ये मॅथिल्डे या लघुग्रहांजवळून जात असंख्य निरीक्षणे केली. २००० मध्ये निअर इरॉसच्या कक्षेत दाखल झाले आणि त्याने इरॉसच्या पृष्ठभागाचे सविस्तर चित्रण केले. त्याला पृष्ठभागावर अनेक विवरे आणि घळ्या आढळल्या. त्याच्याभोवती वातावरण नसून क्षीण चुंबकीय क्षेत्र असल्याचे आढळले.आणि अखेर १४ फेब्रुवारी २००१ मध्ये हे यान इरॉसवर सुखरूपपणे उतरले. ग्रीकपुराणातील प्रेमाची देवता इरॉसचे नाव दिलेल्या लघुग्रहावर व्हॅलेंण्टाइन डेच्या दिवशी पहिल्या मानवी यानाचे उतरणे हा एक सुखद योगायोग !

'४ व्हेस्टा' आणि '१ सेरेस' या लघुग्रह पट्ट्यातील प्रमुख दोन लघुग्रहांच्या निरीक्षणासाठी नासाने 'डॉन' ही मोहीम हाती घेतली. २००७ मध्ये प्रक्षेपित केलेले यान ४ वर्षांच्या प्रवासानंतर १६ जुलै २०११ ला व्हेस्टाजवळ पोहोचले.१४ महिने निरीक्षणे करून या यानाने व्हेस्टाचा पृष्ठभाग, संरचना, भौगोलिक वैशिष्ट्ये यांच्याबाबत सविस्तर माहिती दिली. या मोहिमेने व्हेस्टाचा गाभा लोह-निकेल यांनी बनलेला तर वरचे आवरण पृथ्वीच्या ज्वालामुखीच्या प्रदेशांसारखे बेसल्टिक खडकांनी बनल्याचे दाखवले. यावरून व्हेस्टा इतर लघुग्रहांप्रमाणे फक्त एक महाकाय खडक नसून सौरमालेच्या निर्मितीदरम्यान खडकाळ ग्रह निर्माण होतानाची प्राथमिक अवस्था आदिग्रह ( प्रोटोप्लॅनेट ) प्रमाणे आहे असे म्हणता येईल. सौरमालेच्या निर्मितीविषयी अभ्यासासाठी ही माहिती मोलाची आहे.

लघुग्रह मोहिमेतील प्रगत टप्पा म्हणे जपान स्पेस एजन्सीची हयाबुसा ही मोहीम. २००५ मध्ये हयाबुसा या यानाने २५१४३ इटोकावा या छोट्या लघुग्रहाची माती गोळा करून आणली. १६२१७३ र्‍युगू हा पृथ्वीसमीप गटातील संभाव्य धोकादायक लघुग्रह आहे. तिथले नमुने आणण्यासाठी हयाबुसा-२ आखली गेली. २०१४ साली सोडलेले हयाबुसा-२ यान २०१८ मध्ये लघुग्रहाजवळ पोहचले. यानातून रोव्हर लघुग्रहावर उतरवले गेले. एप्रिल २०१९ मध्ये लघुग्रहावर इम्पॅक्टर आपटून त्याने सुमारे १० मीटर व्यासाचे एक विवर तयार केले. यामुळे त्या उघड्या झालेल्या भागामधून नमुने गोळा करून ते २०२० मध्ये पृथ्वीवर सुखरूप आणले गेले.

२००० डीपी १०७ या लघुग्रहाच्या निरीक्षणासाठी हयाबुसा-२ सोबत प्रोसियॉन हे यान देखील होते, पण तांत्रिक बिघाडाने ही मोहीम अयशस्वी ठरली.

२०१६ला ओसिरिस-रेक्स हे यान १०१९५५ बेन्नू या पृथ्वीसमीप लघुग्रहाच्या दिशेने झेपावले. ऑक्टोबर २०२० मध्ये लघुग्रहावर उतरून तिथले नमुने गोळा करून ते पृथ्वीच्या दिशेने परतले आहे. यावर्षी सप्टेंबरमध्ये ते पृथ्वीवर पोहोचेल. आणि या मोहिमेच्या पुढील टप्प्यात ९९९३४ अपोफीस या लघुग्रहावर २०२९ मध्ये यान उतरवण्यात येईल.

पृथ्वी समीप लघुग्रहांपैकी १४० मीटरपेक्षा अधिक आकार असणारे लघुग्रह आपल्यासाठी धोकादायक मानले जातात. अशा संभाव्य धोकादायक लघुग्रहांची (potentially hazardous asteroid ( PHA)) संख्या तब्ब्ल २३०० हून अधिक आहे. यातील बहुतांश लघुग्रहांपासून येत्या शंभर वर्षांत पृथ्वीला धोका नसला तरी असा लघुग्रह पृथ्वी जवळ आला तर होणाऱ्या धोक्याचे गांभीर्य वैज्ञानिकांनी ओळखले आहे. एखादा लघुग्रह आपल्या जवळ येत असेल तर पृथ्वीच्या रक्षणासाठी त्यावर एखादे क्षेपणास्त्र सोडून तो अंतराळातच नष्ट करता येईल किंवा त्याची दिशा बदलता येईल. या प्रयोगाची रंगीत तालीम म्हणजे नासाची 'डार्ट' ( डबल ॲस्टेरॉइड रिडायरेक्शन टेस्ट ) मोहीम. या परीक्षणासाठी डीडीमॉस आणि दिमोर्फोस हे जुळे लघुग्रह निवडले गेले. या जोडीतील डीडीमॉस मोठा असून दिमोर्फोस त्याच्याभोवती फिरतो. २६ सप्टेंबर २०२२ ला डार्ट यान ६.६ किमी प्रति सेकंद वेगाने दिमोर्फोसवर धडकले. आणि त्याची कक्षा बदलण्यात यश मिळाले.

एकाच प्रवासात विविध लघुग्रहांना भेट देण्याच्या उद्देशाने ऑक्टोबर २०२१ ला ल्यूसी हे यान प्रक्षेपित झाले. १२ वर्षांच्या प्रवासात ल्यूसी लघुग्रह पट्ट्यातील २ आणि ६ गुरूच्या ट्रोजन लघुग्रहांजवळून जात त्यांची निरीक्षणे नोंदवेल. यावर्षी ऑक्टोबरमध्ये सायके हे यान १६ सायके या लघुग्रहाच्या दिशेने रवाना होईल. पुढील वर्षी प्रक्षेपित होणारे युरोपियन स्पेस एजन्सीचे हेरा यान २०२६ मध्ये डीडीमॉस लघुग्रहाजवळ पोहोचेल आणि 'डार्ट' मोहिमेमुळे घडलेल्या बदलांचा अधिक सविस्तर अभ्यास करेल. मिथुन राशीतील उल्कावर्षावासाठी कारणीभूत असणाऱ्या ३२०० फेथन या लघुग्रहाच्या अभ्यासासाठी डेस्टिनी ही मोहीम आखली गेली आहे.

सुमारे ५२००० वर्षांपूर्वी असाच एखादा मोठा लघुग्रह पृथ्वीच्या दिशेने झेपावला. वातावरणाचे कवच भेदून महाराष्टात लोणार इथे आदळला. या आघाताची खूण असणारे लोणार सरोवर म्हणजे जणू दख्खनच्या दगडी छातीवरचे श्रीवत्सलांछन ! आंतरराष्ट्रीय लघुग्रह दिनाच्या निमित्ताने लोणार सरोवराला भेट देण्याचा निश्चय करायला हरकत नाही. आंतरराष्ट्रीय लघुग्रह दिनाच्या शुभेच्छा !!

viva@expressindia.com

# शाळांमध्ये अग्निशमन यंत्रणाच नाही

## महापालिका, जि. प.च्या चारशेहून अधिक शाळांमधील चित्र; विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ



नागपूर प्रतिनिधी

**नागपूर :** प्रत्येक शाळांमध्ये अग्निशमन यंत्रणा असणे आवश्यक असूनही शहर व जिल्हा मिळून ४०० पेक्षा अधिक जिल्हा परिषद व महापालिका शाळांमध्ये अग्निशमन यंत्रणा नसल्याचे वास्तव समोर आले आहे. काही शाळांमध्ये यंत्रणा असली तरी तेथे 'गॅस रिफिलिंग' केलेलीच नाही. शिवाय शिक्षकांना यंत्र हाताळणीचे प्रशिक्षणही दिलेले नाही. त्यामुळे शिक्षण विभाग विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळत असल्याचे चित्र आहे.

शाळेत आगीची घटना घडल्यास तत्काळ उपाययोजना करता यावी म्हणून तेथे अग्निशमन यंत्रणा लावणे बंधनकारक आहे. त्यानुसार शहरातील अनेक शाळांनी याची सोय केली. पण, ग्रामीण भागात त्याची वानवा आहे. ज्या शाळांमध्ये ही यंत्रणा आहे, तेथे शाळा सुरू होण्यापूर्वी आणि त्यानंतरही दर तीन महिन्यांनी पाहणी करून यंत्रणा अद्ययावत करावी, असे प्रशासनाचे निर्देश आहेत. मात्र, गेल्या काही वर्षांपासून याचे पालन केले जात नाही. अग्निशमन विभागाने नुकतेच याबाबत सर्वेक्षण केले. त्यात शहरातील ११० व जिल्ह्यातील ३००च्यावर शाळांमध्ये यंत्रणा नसल्याचे समोर आले आहे. ५० खासगी शाळांमध्ये यंत्रणा होती. ज्या शाळांमधील यंत्रणा निकामी झाली त्यांना अग्निशमन विभागाकडून नोटीस देण्यात आली. अनेक शाळांनी अनुदानाचे कारण पुढे करून यंत्रणाच बसवलेली नाही. विद्यार्थ्यांच्या जीविताशी संबंधित असलेला हा खेळ बिनबोभाट सुरू असून याकडे प्रशासनाचे मात्र लक्ष नाही.

### आग नियंत्रणाचे सिलिंडर शोभेचेच

नियमानुसार आगीवर नियंत्रण मिळवणाऱ्या सिलिंडरमधील गॅस अकरा महिन्यांनी कालबाह्य होतो. त्यानंतर नव्याने भरावा लागतो. पण, बहुतांश शाळांनी यंत्रणा कार्यान्वित केल्यापासून सिलिंडरमध्ये नवीन गॅस भरून घेतलाच नाही. त्यामुळे हे गॅस सिलिंडर 'शो-पीस' म्हणून भिंतीवर टांगलेले दिसतात. शिवाय आग लागल्यानंतर यंत्र कसे हाताळावे याबाबत कर्मचाऱ्यांना कुठलेच प्रशिक्षण दिले गेले नाही. अनेक खासगी शाळा, महाविद्यालयांमध्ये हीच स्थिती आहे. या यंत्रांवर गॅसची मुदत स्पष्टपणे लिहिलेली असते. या मुदतीची तपासणी शाळा व्यवस्थापनासह अग्निशमन दलाकडून होणे अपेक्षित आहे. पण, जिल्ह्यात कुठेही अशाप्रकारची तपासणी होत नाही.

### शिकवणी वर्गातही समस्या

शहरात प्रत्येक वस्तीत खासगी शिकवणी वर्ग उघडले आहेत. तेथे मोठ्या प्रमाणात विद्यार्थी जातात. मागील काही वर्षात सहा शिकवणी वर्गाला आगी लागल्याच्या घटना घडल्या. मात्र, बहुतांश वर्गात अग्निशमन यंत्रणाच नाही. ज्या ठिकाणी आहे ती निकामी आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत शिक्षकांच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

> शहरातील विविध शाळांना अग्निशमन यंत्रणा लावण्याबाबत पत्र देण्यात आले. ज्यांनी लावली नाही त्यांना दंड ठोठावण्यात आला. काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांना आगीसंदर्भातील प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. सर्व शाळांनी यासाठी पुढाकार घ्यावा.
>
> **- भीमराव चंदनखेडे,** अग्निशमन अधिकारी, महापालिका.

> जिल्ह्यातील शाळांमध्ये अग्निशमन संच आहेत की नाही याची तपासणी केली जात आहे. याबाबत लवकरच मुख्याध्यापकांची बैठक घेऊन त्यात शाळांमध्ये अग्निशमन यंत्रणा लावण्याच्या सूचना दिल्या जातील. शाळा अनुदानातून हा खर्च भागवण्यात येतो.
>
> **- रवींद्र काटोलकर,** शिक्षणाधिकारी (प्राथ), जिल्हा परिषद.

# रस्त्यांवरील नादुरुस्त वाहनांवर धडक कारवाई

### 'लोकसत्ता'च्या बातमीनंतर पोलीस सक्रिय

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** शहरातील रस्त्यावर ठेवलेल्या नादुरुस्त आणि बेवारस वाहनांवर पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरू केला आहे. रस्त्यावरील बेवारस वाहने जप्त करण्यात येत असून वाहनमालकाला दंडही ठोठावण्यात येत आहे. या मोहिमेला पाचपावली परिसरातून सुरुवात झाली. जवळपास १२ वाहनांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. रस्त्यावरील नादुरुस्त व बेवारस वाहनासंदर्भात 'लोकसत्ता'ने वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्ताची गांभीर्याने दखल घेऊन ही मोहीम सुरू करण्यात आली.

तीन दिवसांपूर्वी पाचपावली पोलीस ठाण्याच्या हद्दीत तीन चिमुकल्यांचा एका नादुरुस्त कारमध्ये गुदमरून मृत्यू झाला होता. त्यानंतर शहरात शेकडो बेवारस आणि नादुरुस्त वाहने रस्त्याच्या कडेला उभी असल्याचे वृत्त 'लोकसत्ता'ने प्रकाशित केले होते. ते वाचून पोलिसांना जाग आली. आज गुरुवारी पाचपावली परिसरातून ठाणेदार वैभव जाधव यांनी कारवाई सुरू केली. पाचपावली पोलिसांचा मोठा ताफा रस्त्यावरील बेवारस वाहनांच्या मालकाचा शोध घेत होता.


शेकडो नादुरुस्त वाहने रस्त्यालगत उभी

> रस्त्याच्या कडेला कुणीही नादुरुस्त वाहन उभे करू नये. योग्य ठिकाणी वाहन उभे केल्यानंतर 'लॉक' केल्याची खात्री करावी.
>
> **- गोरख भामरे,** पोलीस उपायुक्त.

## खेळताना 'बॅटरी'चा स्फोट, मुलगा अत्यवस्थ

**नागपूर :** सावनेर येथे नऊ वर्षीय मुलगा एका 'बॅटरी'सोबत खेळत होता. 'बॅटरी'मधील वायर दुसऱ्या एका वस्तूला जोडताच ती गरम होऊन तिचा स्फोट झाला. त्यात मुलाच्या उजव्या गालाचे मांस फाटले. मुलाला अत्यवस्थ अवस्थेत मेडिकलमध्ये दाखल केले असून तज्ज्ञ डॉक्टर त्यावर लक्ष ठेवून आहेत.

सोहम (बदललेले नाव) असे मुलाचे नाव आहे. गुरुवारी सकाळी त्याला एक 'बॅटरी' सापडली. या 'बॅटरी'सोबत खेळताना त्याने काही 'इलेक्ट्रॉनिक' खेळण्याला त्याचे वायर लावले. काही वेळात ती 'बॅटरी' गरम झाली. 'बॅटरी' गालाजवळ आणताच त्याचा स्फोट झाला. त्यात मुलाच्या उजव्या गालाचे मांस फाटून रक्तस्त्राव सुरू झाला. मुलाला तातडीने नागपुरातील मेडिकल रुग्णालयात हलवले. डॉक्टरांनी उपचार सुरू केले. सध्या मुलाची प्रकृती स्थिर असून वैद्यकीय अहवालानंतर उपचाराची दिशा निश्चित केली जाणार आहे.

# क्रूरकर्मा सूरज शाहूला जन्मठेप

### राज पांडे हत्याकांड

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**नागपूर :** राज पांडे या बालकाची हत्या करणारा आरोपी क्रूरकर्मा सूरज शाहूला सत्र न्यायाधीश एम.एस. आझमी यांनी गुरुवारी मरेपर्यंत जन्मठेप ५० हजार रुपये दंड, अशी शिक्षा ठोठावली आहे. न्यायालयाने आरोपीला ही रक्कम राजच्या आईला देण्यास सांगितले आहे.

समाजमन सुन्न करणारी ही घटना १० जून २०२१ रोजी घडली होती. राज व सूरज एमआयडीसी पोलिसांच्या हद्दीतील इंदिरा मातानगर वस्तीत राहात होते. दोघांचीही एकमेकांसोबत चांगली ओळख होती. घटनेच्या काही दिवसांपूर्वी राजचे काका मनोज पांडे यांनी सूरजच्या आईचा अपमान केला होता. त्यामुळे सूरज चिडला होता. त्याने राजच्या अपहरणाचा कट रचला. घटनेच्या दिवशी सायंकाळी राजला क्रिकेट खेळण्याच्या बहाण्याने निर्जन ठिकाणी नेले व सायंकाळी राजची आई गीता यांना फोन करून मनोज पांडे यांची मान कापून तसे छायाचित्र व्हॉट्सॲपवर पाठवण्याची मागणी केली. तसेच मागणी पूर्ण न केल्यास राजला ठार मारण्याची धमकी दिली. परिणामी, राजचे वडील राजकुमार यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. पोलिसांनी वर्धा जिल्ह्यातील बोरखेडी येथून सूरजला ताब्यात घेतले. सखोल विचारपूस केल्यानंतर सूरजने राजचा खून केल्याची माहिती दिली.

### फाशीसाठी उच्च न्यायालयात जाणार

सत्र न्यायालयाने कलम ३६४ (अ) व ३०२ मध्ये आरोपीला जन्मठेप ठोठावली असली तरी या शिक्षेविरुद्ध विशेष सरकारी वकील विजय कोल्हे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात अपील दाखल करणार आहेत. या अपिलात आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी विनंती करणार असल्याचे ॲड. कोल्हे यांनी सांगितले.

# 'जनता'चे खंड प्रकाशित करताना कराराचे पालन नाही

### विद्यापीठाच्या कुलसचिवांचे राज्य सरकारला पत्र

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या 'जनता' या नियतकालिकांना खंड स्वरूपात प्रकाशित करण्यात आले आहे. मात्र, ते प्रकाशित करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ व महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये झालेल्या कराराचे पालन झालेले नाही. करारानुसार हे खंड डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाच्या सौजन्याने प्रकाशित होत असल्याचे नमूद करायला हवे होते. याकडे विद्यापीठाने पत्र पाठवून राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण खात्याच्या प्रधान सचिवांचे लक्ष वेधले आहे.

जनता हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेले एक नियतकालिक होते. या वृत्तपत्राचा पहिला अंक २४ नोव्हेंबर १९३० रोजी प्रकाशित झाला.

जनता प्रारंभी पाक्षिक होते. ३१ ऑक्टोबर १९३० रोजी ते साप्ताहिक झाले. या नियतकालिकाची बिरुदावली म्हणून 'गुलामाला तू गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करून उठेल' हे वाक्य होते. या नियतकालिकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व महत्त्वाचे प्रश्न चर्चिले होते. तसेच त्यांनी परदेशातून पाठवलेली पत्रे यात प्रकाशित झाली होती.

डॉ. आबंडेकर यांचे विचारधन जगभरात पोहचावे या अनुंषगाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाने कुठलेही मानधन न घेता २४ खंडांची सीडी प्रकाशित करण्यासाठी 'जनता' वृत्तपत्राचे समग्र खंड 'स्कॅन' करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने समितीला पाठवले. त्यामुळे करारानुसार स्वतंत्रपणे वसंत मून, डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर असा उल्लेख झाला तर विद्यापीठाच्या कार्याचा गौरवच होईल, असे विद्यापीठाचे कुलसचिव राजू हिवसे यांनी उच्च व तंत्र शिक्षण खात्याच्या प्रधान सचिवांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

### दिवंगत वसंत मून यांचा उल्लेख का हवा?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रकाशित व अप्रकाशित लेखन साहित्य हे दिवंगत वसंत मून यांच्याकडे मोठ्या प्रमाणात संग्रही होते. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी संग्रही असलेले संपूर्ण साहित्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाला सुपूर्द केले होते. म्हणून दिवंगत वसंत मून यांचा उल्लेख हवा, अशी मागणी करण्यात आली आहे.

### करार काय?

साहित्य प्रकाशनासाठी महाराष्ट्र शासन आणि नागपूर विद्यापीठ यांच्यात १५ डिसेंबर २०१६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. या कराराप्रमाणे 'समता' (२९ जून १९२८ ते १५ मार्च १९२९) एक खंड आणि 'जनता' (२४ नोव्हेंबर १९३० ते २८ जानेवारी १९५६) २३ खंड या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली प्रकाशित झालेल्या ऐतिहासिक नियतकालिकाला प्रकाशित करण्याचा हेतू या सामंजस्य करारामागे होता. या करारानुसार वसंत मून, डॉ. आंबेडकर विचाराधारा विभाग आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या सौजन्याने खंड प्रकाशित, असे नमूद करणे आवश्यक आहे. परंतु, प्रकाशन समितीने प्रकाशित केलेल्या जनताच्या ३-१, ३-२ या दोन्ही खंडात तसा उल्लेख वगळण्यात आला आहे. ही बाब भारतीय दलित पँथरचे अध्यक्ष प्रकाश बनसोड यांनी नागपूर विद्यापीठ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र प्रकाशन समितीच्या लक्षात आणून दिली होती.

# स्थगिती विरोधात 'एमटीडीसी'कडे दाद मागणार

### नरेंद्र जिचकार यांची माहिती

लोकसत्ता प्रतिनिधी



**नागपूर :** अंबाझरी उद्यान विकास प्रकल्पाला दिलेली स्थगिती उठवावी म्हणून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे (एमटीडीसी) दाद मागणार, अशी माहिती गरुडा ॲम्युझमेंट पार्क प्रा.लि.चे संचालक नरेंद्र जिचकार यांनी 'लोकसत्ता'ला दिली.

अंबाझरी उद्यान विकास प्रकल्पाला बुधवारी शासनाने स्थगिती दिली होती. विभागीय आयुक्तांनी दिलेल्या अहवालाचा आधार घेत हा निर्णय घेतल्याचे एमटीडीसीने स्पष्ट केले होते. यासंदर्भात बोलताना जिचकार म्हणाले, कंपनीचे सर्व काम नियमानुसारच आहे. काम सुरू करण्यात आले असून त्याच्या भूमिपूजनाला एमटीडीसीचे वरिष्ठ विभागीय व्यवस्थापक दिनेश कांबळे उपस्थित होते. आम्ही काही चुका केल्या असत्या तर ते या कार्यक्रमाला आले नसते. प्रकल्प एक वर्षात म्हणजे मुदतीपूर्वी हस्तांतरित करण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यादिशेने कामाची वाटचाल सुरू असतानाच अचानक या कामाला स्थगिती देण्यात आल्याने आश्चर्य वाटले. विशेष म्हणजे, ज्या विभागीय आयुक्तांच्या अहवालाचा आधार स्थगिती देण्यासाठी घेण्यात आला तो अहवाल आम्हाला दाखवण्यातही आला नाही. त्यामुळे या कामावरील स्थगिती उठवण्यात यावी म्हणून एमटीडीसीकडे दाद मागू, असे जिचकार यांनी सांगितले.

# 'एमकेसीएल'ला काळ्या यादीत टाका, अन्यथा आंदोलन

### 'भाजयुमो'चा विद्यापीठाला इशारा

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**नागपूर :** भारतीय जनता युवा मोर्चा नागपूर महानगरच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांना 'एमकेसीएल' कंपनीला तात्काळ काळ्या यादीत (ब्लॅक लिस्टेड) टाकण्याच्या संदर्भात निवेदन देण्यात आले.

विद्यापीठाने 'एमकेसीएल' कंपनीची परीक्षेसाठी निवड केल्याने मोठे नुकसान झाले आहे. अनेक विद्यार्थ्यांचे निकाल वेळेत लागत नाही. तर अनेकांच्या गुणपत्रिकांवर चुका आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागतो. विद्यापीठाने 'एमकेसीएल'ची नेमणूक केल्यामुळे अनेक परीक्षांचे निकालही विलंबाने लागले आहे. याविरोधात तक्रार झाल्यावर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी 'एमकेसीएल'कडून सर्व काम काढून घेण्याचे आदेश दिले होते. विद्यापीठाने हे काम काढून घेतले असले तरी परीक्षेमध्ये आणि विद्यार्थ्यांचे इतके नुकसान करणाऱ्या 'एमकेसीएल'वर कुठलीही ठोस कारवाई केलेली नाही. त्यामुळे या कंपनीला काळ्या यादीत टाकावे अन्यथा आंदोलन केले जाईल असा इशारा दिला. निवेदन देताना 'भाजयुमो' प्रदेश सरचिटणीस शिवानी दाणी वखरे, विद्यार्थी आघाडी नागपूर शहर संयोजक संकेत कुकडे, सह-संयोजक गौरव हरडे, मंडळ संयोजक आशीष मोहिते, सुभाष खेमानी, सांदीपन शुक्ला, प्रणीत पोचमपल्लीवार, प्रज्वल राऊत उपस्थित होते.



# शुल्क घोटाळा प्रकरणात सात जणांवर गुन्हे

### मेडिकलमधील प्रकरणात कायदेशीर कारवाई होणार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नागपूर :** मेडिकलमध्ये शुल्क घोटाळा करणाऱ्या एक स्थायी आणि सहा कंत्राटी अशा एकूण सात कर्मचाऱ्यांवर गुरुवारी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. मेडिकल प्रशासनाच्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली. या कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाईचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

अभिजित विश्वकर्मा, अश्विन खापर्डे, दत्तात्रय निंबाळकर, कल्याणी शिंदे, सुनीता वाहणे, राकेश अलघरे, आशीष सहारे, सनी कांबळे अशी आरोपींची नावे आहेत.

पोलिसांच्या माहितीनुसार, मेडिकलमध्ये एचआयएमएस ही ऑनलाईन रुग्ण नोंदणी प्रक्रिया बंद झाल्यानंतर २७ डिसेंबरला नवीन सॉफ्टवेअर लावण्यात आले. ही संगणक प्रणाली मेडिकलच्या खिडकी क्रमांक ६६ मध्ये आहे. मेडिकलच्या या खिडकीवर विविध शुल्क गोळा केले जातात. येथे कार्यरत सात कर्मचाऱ्यांनी हा घोटाळा केला. गुरुवारी पोलिसांनी सातही आरोपींवर गुन्हा दाखल केला.

### घोटाळ्याची व्याप्ती वाढण्याची शक्यता?

मेडिकल प्रशासनाच्या चौकशीत १ लाख १८ हजार रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे उघड झाले. मात्र दाखवण्यात आलेल्या रकमेच्या पाच पटीने जास्त मोठा घोटाळा झाल्याची चर्चा मेडिकलमध्ये आहे. मेडिकलमधील स्थायी कर्मचारी अभिजित विश्वकर्मा वगळता इतर सर्व कंत्राटी कर्मचारी १ जानेवारी २०२३ पासून शुल्क वसुलीचे काम करीत होते.

## 'फेसबुक फ्रेंड'चा विद्यार्थिनीवर बलात्कार

**नागपूर :** फेसबुकवर ओळखी झाल्यानंतर युवकाने बारावीच्या विद्यार्थिनीला जाळ्यात ओढून बलात्कार केला. त्यातून ती दोन महिन्यांची गर्भवती झाली. पोटात दुखत असल्यामुळे ती आईसह मेयो रुग्णालयात गेली. डॉक्टरांनी गर्भवती असल्याचे निदान केल्यामुळे आईच्या पायाखालची जमीन सरकली. घडलेला प्रकार सांगितल्यानंतर याप्रकरणी पोलिसांत तक्रार देण्यात आली. अखिल राजू नागवंशी (२०, समतानगर, जरीपटका) असे गुन्हा दाखल केलेल्या आरोपीचे नाव आहे.

पीडित १६ वर्षीय मुलगी ईशा (बदललेले नाव) ही बारावीत शिकते. तिची फेसबुकवरून अखिल नागवंशी याच्याशी ओळख झाली. अखिल हा कोराडीतील एका बेकरीत काम करतो. दोघांची मैत्री झाली. त्याने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तिला ऑगस्ट २०२२ मध्ये फिरायला जायचे सांगून घरी नेले. स्वतःच्या घरी त्याने तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर ते दोघेही प्रेमसंबंधात होते. गेल्या आठवड्यात पोटात दुखत असल्याची तक्रार तिने आईकडे केली. तिला मेयो रुग्णालयात नेण्यात आले. ती दोन महिन्यांची गर्भवती असल्याचे निदान डॉक्टरांनी केले. त्यामुळे तिच्या आईने विचारपूस केली असता अखिलचे नाव समोर आले. तिच्या आईच्या तक्रारीवरून जरीपटका पोलिसांनी बलात्काराचा गुन्हा दाखल करून अखिलला अटक केली. त्याला न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

# नागपूर-जयपूर विमानसेवा ऑगस्टमध्ये!

लोकसत्ता प्रतिनिधी



**नागपूर :** देशांतर्गत विमानाने प्रवास करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचा लाभ घेत इंडिगो वेगवेगळ्या शहरादरम्यान विमानसेवा सुरू करीत आहे. आता ही कंपनी नागपूर-जयपूर विमानसेवा सुरू करण्याचे नियोजन करीत आहे. त्यांची ही सेवा ऑगस्टमध्ये सुरू होण्याची शक्यता आहे.

सध्या नागपूरहून थेट जयपूरसाठी विमान नाही. नागपूरहून जयपूरला जाण्यासाठी प्रवाशांना दिल्ली, मुंबई, इंदूरमार्गे जावे लागते. जयपूरला थेट विमानसेवा असल्यास सव्वा ते दीड तासात पोहचणे शक्य आहे. परंतु दिल्ली किंवा इतर मार्गाने गेल्यास जयपूरला पोहोचण्यासाठी अडीच ते तीन तास लागतात. अनेक दिवसांपासून थेट विमानसेवा सुरू करण्याची मागणी केली जात होती. आता इंडिगोने नागपूरहून जयपूरला थेट विमानसेवा सुरू करण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, इंडिगो एअरलाईन्स ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यापासून विमान सेवा सुरू करण्याची शक्यता आहे.

### जनसुनावणी अखेर पुढे ढकलली; जमिनीसाठी वनखात्याची मंजुरीप्रक्रिया अंतिम टप्प्यात?

# गोंडखैरीच्या कोळसा खाणीला अनेक ग्रामपंचायतींचा विरोध

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नागपूर :** कळमेश्वर तालुक्यातील गोंडखैरी येथील भूमिगत कोळसा खाणीसाठी आता वनखात्याची जमीन संपादन करण्यात येणार असल्याचे समोर आले आहे. त्यासाठी वनखात्याची मंजुरीप्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे कळते. मात्र, त्याचवेळी या खाणीला होणारा विरोध पाहता यावरील जनसुनावणी आता पुढे ढकलण्यात आली आहे. दहा जुलैला होणारी ही जनसुनावणी आता १० जुलैला होणार आहे.

अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेडची कोळसा खाण गोंडखैरी येथे प्रस्तावित आहे. या खाणीसाठी वनखात्याची काही जमीन जाणार असून त्यासाठी वनमंजुरीचा प्रस्ताव प्राथमिक टप्प्यात आहे. प्रादेशिक वनखात्याच्या तत्कालीन मुख्य वनसंरक्षकांनीच वनमंजुरीची शिफारस केल्याची चर्चा आहे. मात्र, या खाणीपासूनच काही किलोमीटर अंतरावर मानसिंगदेव अभयारण्य तसेच बोर व्याघ्रप्रकल्प देखील आहे. तर त्याचवेळी या कोळसाखाणीमुळे वायू, ध्वनी आणि जलप्रदूषणाची भीती असल्याने या प्रकल्पाला होणारा विरोध वाढत चालला आहे. ही भूमिगत कोळसा खाण आहे तर त्यासाठी एवढ्या मोठ्या प्रमाणावर जमिनीचे संपादन का, असा प्रश्न नाना गावंडे यांनी उपस्थित केला आहे.

भूमिगत खाणीसाठी ५० हेक्टर जमीन खूप झाली मात्र, या प्रकल्पात मोठ्या प्रमाणावर जमीन संपादन करण्यात येत आहे. यात कळमेश्वर तालुक्यातील ११, नागपूर ग्रामीणमधील सात तर हिंगणा तालुक्यातील २४ ग्रामपंचायती येतात. ही शहरालगतची गावे असून या खाणीमुळे त्यावर परिणाम होणार आहे. या प्रकल्पात वनखात्याची जमीन तर जाणारच, पण राष्ट्रीय महामार्ग देखील बाधित होणार आहे. त्यामुळेच या सर्व ग्रामपंचायतीचा या खाणीला होणारा विरोध वाढत चालला आहे. प्रस्तावित खाण जमिनीवर वस्त्या असून ही भूमिगत खाण असली तरीही त्याचे परिणाम होणार आहेत.

सावनेर, पारशिवनी यासारख्या भूमिगत कोळसा खाणी असणाऱ्या भागात लोकांना पाण्याचे तीव्र संकट भेडसावत आहे. त्याचीच पुनरावृत्ती येथेही होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या परिसरातील वेणा जलाशय, सुराबर्डी तलावावर देखील याचा परिणाम होईल. वेणा जलाशयातून आयुध निर्माणी व उद्योगांना पाणीपुरवठा केला जातो. प्रकल्पस्थळावरून हे जलाशय अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळेच गावकऱ्यांचा या प्रकल्पाला विरोध वाढत आहे.

> आम्ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि त्यांना सर्व परिस्थिती समजावून सांगितली. जनसुनावणीआधी या प्रकल्पाचा सविस्तर आराखडा आम्ही मागितला. तो खूप मोठा असल्याचे कारण देण्यात आले. 'ई-मेल'वर पाठवू असे सांगण्यात आले, पण अजूनही तो पाठवण्यात आला नाही. यावरून खाणीवर आधीच शिक्कामोर्तब झाल्याचे दिसून येते. मात्र, शेवटपर्यंत आम्ही प्रयत्न करणार आहोत.
>
> **- नाना गावंडे,** उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समिती.

## संक्षिप्त

### योगदिनानिमित्त वेकोलित योगाभ्यास



**नागपूर :** आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्त वेकोलि मुख्यालय स्थित कोल क्लबमध्ये योगदिनाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात सीएमडी मनोज कुमार तसेच तांत्रिक संचालक ए.के. सिंह यांनी टीम वेकोलिच्या सदस्यांसोबत योगाभ्यास केला. योगगुरू अशोक गांधी यांनी कोल क्लबमध्ये सर्वांना विविध आसने करायला लावली तसेच या आसनांबद्दल विस्तृत माहिती दिली. यावेळी वेकोलिचे महाव्यवस्थापक, विभागाध्यक्ष, वरिष्ठ अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांनी योगा केला. कार्यक्रमाचे संचालन कल्याण विभागाचे रॉबिन चटर्जी यांनी केले. यावेळी वेकोलिच्या मुख्यालयात झंकार महिला मंडळानेही योगाभ्यास केला.

### गजानन महाराज पतसंस्थेच्या अध्यक्षपदी स्वप्निल मोंढे



सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या श्री संत गजानन महाराज नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी ॲड. स्वप्निल मोंढे यांची फेरनिवड झाली आहे. संस्थेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध पार पडली असून उपाध्यक्षपदी परमानंद लोणारे यांची निवड करण्यात आली. ॲड. स्वप्निल मोंढे यांची सलग चौथ्यांदा अध्यक्षपदी निवड झाली आहे. ते विदर्भ क्रेडिट को-ऑप. फेडरेशनचे संचालक तसेच नागपूर जिल्हा फेडरेशनचे तज्ज्ञ संचालक सुद्धा आहेत. रवींद्र वसू यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडली. नव्या संचालक मंडळामध्ये अविनाश ताराडे, देवराव जिकार, चिंतामणराव झंझाडे, नारायण दोंदल, महेश गोसावी, प्रशांत कावरे, प्रतीक धंदरे, साधना ढोक व वंदना महंत यांचा समावेश आहे.

### विद्यापीठात 'फार्मा टॉक' कार्यक्रम रविवारी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात 'फार्मा टॉक' कार्यक्रम रविवार २५ जूनला सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या डॉ. ए.के. डोरले स्मृती सभागृहात आयोजित कार्यक्रमात मेडीसेसचे ब्रिज सारडा मार्गदर्शन करणार आहे. 'मै मेरा दुश्मन' असा फार्मा टॉक कार्यक्रमाचा विषय आहे. यूडीपीएस नागपूर आणि 'मी टू वुई' फाऊंडेशनच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### बालनाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी १ ते ६ ऑगस्टला

विस्तार सेवा मंडळ, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेक व बालरंगभूमी परिषद, शाखा नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरशालेय संस्कृत बालनाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी १ ते ६ ऑगस्ट विविध जिल्ह्याच्या ठिकाणी व अंतिम फेरी २८ व २९ ऑगस्ट रोजी होत आहे. ही स्पर्धा प्राथमिक व अंतिम फेरी या दोन पातळीवर आयोजित करण्यात येईल. या स्पर्धेत शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग असणार आहे. स्पर्धेतील विजयी चमूस प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक व स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात येईल. बालक व बालिका यांना उत्कृष्ट अभिनयासाठी पारितोषिक व अभिनयाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. याशिवाय दिग्दर्शन, संगीत, प्रकाशयोजना, नेपथ्य, रंगभूषा व वेशभूषा यासाठी स्वतंत्र पारितोषिक देण्यात येईल. सहभागी होणाऱ्या सर्व शाळा / स्पर्धकांना व तांत्रिक सहकार्य करणाऱ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी ५ जुलै २०२३ पर्यंत बालरंगभूमी परिषदेच्या कार्यालयाशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## दैनंदिनी

■ **राष्ट्र सेविका समिती** - राष्ट्र सेविका समितीद्वारा पथसंचलन, स्मृती मंदिर, रेशीमबाग येथून, सायंकाळी ६.३० वाजता.

# महापालिकेवर आरोपांच्या फैरी!

## नदी स्वच्छतेत भ्रष्टाचार झाल्याचा विदर्भ राज्य पक्षाचा आरोप; नियमबाह्य भरती प्रक्रिया राबवल्याचा ॲड. झांबरे यांचा आरोप

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** सध्या प्रशासकाच्या भरोशावर काम सुरू असलेल्या महापालिकेवर रोज नवनवीन आरोपांच्या फैरी झडत आहेत. ताज्या घटनाक्रमात विदर्भ राज्य पक्षाने नदी स्वच्छतेत भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप केला असून महापालिकेतील भरती प्रक्रिया नियमबाह्य असल्याचा आक्षेप ॲड. झांबरे यांनी नोंदवला आहे.

विदर्भ राज्य पक्षाच्या म्हणण्यानुसार, शहरात नागनदीसह इतर नदीनाले स्वच्छता अभियान राबवले जात आहे. मात्र, या अभियानात भ्रष्टाचार झाला आहे. याची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करत विदर्भ राज्य पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्त राधाकृष्णन बी. यांना निवेदन दिले.

नागनदीसह अनेक भागातील नाले सफाई दरवर्षी पावसाळा सुरू होण्यापूर्वी महापालिकेमार्फत केली जातात. या साफसफाईच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे जय विदर्भ पक्षाने म्हणणे आहे. नागपूर जिल्हाध्यक्ष अमुल साकुरे यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले व चौकशी करून दोषी आढळल्यास संबंधितांवर फौजदारी तथा प्रशासकीय कार्यवाही करण्याची मागणी आयुक्तांकडे करण्यात आली. यावेळी शिष्टमंडळात मुकेश मासुरकर, नरेश निमजे, विजय मोंदेकर, अशोक पटले, प्रशांत तागडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



### अनुसूचित जमाती आयोगाची आयुक्तांना नोटीस

महापालिकेतील विधि विभागात कंत्राटी पद्धतीने तीन पदांसाठीची नियुक्ती नियमबाह्य पद्धतीने करण्यात आली आहे. या नियुक्त्या रद्द करण्यात येऊन प्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी ॲड. राहुल झांबरे यांनी केली. महापालिकेने २७ मार्च रोजी कंत्राटी सहायक विधि अधिकारी हवेत म्हणून जाहिरात दिली होती. मागासवर्गीयांमधून या नियुक्त्या करणे अपेक्षित असताना तसे केले नाही. यासंदर्भात अनुसूचित जमाती आयोगाकडे तक्रार नोंदवण्यात आली. आयोगाने आयुक्तांना नोटीस बजावली. महापालिका प्रशासनाकडून नोटीसचे उत्तर देत महापालिकेने आरक्षणाधिन नसलेल्या पदाची भरती केली असल्याचे मान्य केले. मात्र, त्यावर कुठलीही कारवाई झाली नाही. यासंदर्भात सदर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे. विधी विभागात ज्या तीन कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे त्यांना नियुक्तीचे पत्र देण्यात आले आहे. मात्र, कामावर रुजू करून घेतले नाही. आयुक्तांवर या संदर्भात गुन्हा दाखल करावा, अशी मागणी ॲड. झांबरे यांनी केली.



# पीएच.डी. 'कोर्सवर्क'मधील अडचणी दूर करा

## विद्यापीठ शिक्षण मंचाचे कुलगुरूंना निवेदन

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे पीएच.डी. करताना एका वर्षात सहा श्रेयांक मिळवण्यासाठी 'एनपीटीएल'कडून देण्यात आलेले कोर्सवर्क करणे सक्तीचे करण्यात आले. यामुळे मानव्यशास्त्र, आंतरशाखीय आणि वाणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याने त्यांच्यासाठी 'एनपीटीएल' ऐवजी विद्यापीठाच्या यंत्रणेद्वारे कोर्सवर्क राबवण्याची मागणी विद्यापीठ शिक्षण मंचाद्वारे सरचिटणीस डॉ. सतीश चाफले यांचा नेतृत्वात कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांना करण्यात आली.

पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांना 'प्री-पीएच.डी. कोर्सवर्क'साठी एकूण बारा श्रेयांक घ्यावे लागणार हे विषयनिहाय 'कोर्सवर्क' संशोधन केंद्रावर करावे लागणार आहे. याशिवाय दोन श्रेयांक हे 'सेमिनार'च्या माध्यमातून मिळणार आहे. याशिवाय सहा श्रेयांकासाठी नॅशनल प्रोग्राम ऑफ टेक्नोलॉजी एनहान्स लर्निंग'द्वारे (एनपीटीएल) करावे लागणार होते. मात्र, हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना अतिशय त्रासदायक ठरणारे असून बहुतांश विद्यार्थ्यांच्या डोक्यावरून जात असल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे यापुढे सहा श्रेयांकासाठी घेण्यात येणारे कोर्सवर्क विद्यापीठाच्या 'एचआरडीसी'मार्फत घेण्याची मागणी शिक्षण मंचाकडून कुलगुरूंना करण्यात आली. यावेळी मागणी मंजूर करीत, ३ श्रेयांकासाठी विद्यापीठाने सहमती दर्शवली होती. त्यामुळे विद्यार्थ्यांना उर्वरित तीन श्रेयांकासाठी पुन्हा ऑनलाईन 'कोर्सवर्क' पूर्ण करून त्यासाठी आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार होता. याकडे लक्ष वेधून विद्यापीठ शिक्षण मंचाने विद्यापीठाचे कुलगुरूंना निवेदन देण्यात आले. याबाबत कुलगुरूंनी सकारात्मक विचार करून तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. यावेळी चर्चेत व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. योगेश भुते, अधिसभा सदस्य डॉ. रतीराम चौधरी, विद्यापीठ शिक्षण मंचाच्या नागपूर ग्रामीणचे सरचिटणीस डॉ. तुषार चौधरी व प्रा. उमेश पलीकुंडीवार हे उपस्थित होते.

# विशेष चिमुकल्यांचा नृत्याविष्कार बघून भारावले प्रेक्षक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** महापालिकेच्या शिक्षण विभागामार्फत आयोजित शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमात विशेष मुलांचा नृत्याविष्कार, नाटक, संगीत सादरीकरण बघून उपस्थित प्रेक्षक भारावून गेले. विशेष मुलांनी बहारदार नृत्ये सादर करीत उपस्थित मान्यवरांची मने जिंकली.

महापालिकेच्यावतीने अपंग मुलांसाठी ग्रीष्मकालीन शिबिराचे आयोजन करण्यात आले. सुरेश भट सभागृहात आयोजित शिबिराचा समारोपाच्यावेळी अपंग मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. अपंग मुलांचे ग्रीष्मकालीन शिबिरात विद्यार्थ्यांनी १५ ते १६ विविध विषयावर सादरीकरण केले. यात सामूहिक नृत्य, सामूहिक गायन, स्वागत गीत, एकल नृत्य, एकल गीत, पालकांचे मनोगत, पालकांचे नृत्य तसेच समावेशित शिक्षण कर्मचारी यांचे विद्यार्थ्यांना समर्पित नृत्याचे सादरीकरण करण्यात आले.

महापालिका आयुक्त राधाकृष्णन बी. यांनी या उपक्रमाचे कौतुक करत अशी कार्यशाळा दरवर्षी आयोजित करून अपंग मुलांना व्यासपीठ निर्माण करून दिले जाईल असे आश्वासन दिले. विद्यार्थ्यांसह पालकांनीही शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद देत सर्वांचा उत्साह वाढवला. यावेळी राज्य महिला आयोग सदस्य आभा पांडे, शिक्षणाधिकारी राजेंद्र पुसेकर उपस्थित होते.

## हेल्मेट सक्ती, रस्ता सुरक्षितता जनजागृती मोहिमेला प्रारंभ

**नागपूर :** परिवहन खात्याने राज्यातील अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी सर्वत्र हेल्मेट सक्ती, रस्ता सुरक्षितता समुपदेशनाचे आदेश दिले आहे. त्यामुळे नागपूर शहर, ग्रामीण, पूर्व नागपूर आरटीओ कार्यालयातील अधिकारी- कर्मचाऱ्यांनी बुधवारी जनजागृती मोहीम सुरू केली.

राज्यात रस्ते अपघातात झालेले मृत्यू, त्यात दुचाकीस्वारांची संख्या, दुचाकी चालवताना हेल्मेटचे महत्त्व सांगणारे प्रसिद्धीपत्रक सगळ्यांचे लक्ष वेधून घेत होते. आता आरटीओचे अधिकारी-कर्मचारी विविध शासकीय कार्यालय, महाविद्यालयात जाऊन जनजागृती करीत आहेत.

# सेवा ही माणसाची सहज वृत्ती - डॉ. मोहन भागवत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** मनुष्याला कुणाचेही दुःख पहावत नाही. समोर दुःखी माणूस आला तर आपण आनंदी राहू शकत नाही. ही स्वाभाविक प्रक्रिया आहे. जेव्हा आपण जगातील दुःख दूर करण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा आपण स्वतःचे सुख सुरक्षित करत असतो. सेवा ही माणसांची सहज वृत्ती आहे. असे प्रतिपादन सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले.

माधव नेत्रालय नेत्र संस्थान व अनुसंधान केंद्राच्यावतीने आयोजित सत्कार समारंभ व नेत्रांजली वार्षिक अंकाचे प्रकाशन सरसंघचालकांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला गोविंद देव गिरीज महाराज, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उद्योजक सत्यनारायण नुवाल, डॉ. हर्षवर्धन मार्डीकर आदी उपस्थित होते. डॉ. भागवत म्हणाले, आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांची पुण्यतिथी व जागतिक योग दिन हा योगायोग मानायला हवा. या सत्कार सोहळा कार्यक्रमाच्या निमित्ताने माणसे जोडण्याचे काम करण्यात आले असून ते कार्य पुढेही सुरू राहावे.



यावेळी गोविंद देव गिरी महाराज म्हणाले, समाजातील सज्जनांना एकत्र आणून संघटना बळकट आणि बलाढ्य करण्याचे काम आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांनी केले. ते मोठे योगी होते. त्यांनी योगाचा अभ्यास करून देशभक्तीचा योग्य ठिकाणी वापर करत सज्जनांना एकत्र आणत संघ मोठा केला. यातून लोकसेवेला महत्त्व देण्यात आले आहे. संपत्ती मिळवणे हे यशाचे लक्ष आहे पण ती कुठे आणि किती खर्च करायचे हे ज्याला समजले त्याचे जीवन सार्थकी लागले असे ते म्हणाले. यावेळी संजय प्रकाश राजाराम चव्हाण, मनीष रूपाणी, नरेंद्र हेटे, नदकिशोर दंडारे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन मनीषा काशीकर यांनी केले.

# आमच्याकडे मोदी, तुमचा नेता कोण?

## पाटण्यातील विरोधकांच्या बैठकीवरून मुनगंटीवारांचा सवाल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** विरोधी पक्षातील नेत्यांची पाटणा येथे बैठक होणार आहे. या बैठकीमध्ये त्यांनी फक्त भविष्यात त्यांचा पंतप्रधान पदाचा उमेदवार कोण, हे जरी जाहीर केले तरी ही बैठक महत्त्वाची ठरेल. आमच्याकडे मोदी आहेत. विरोधकांचा नेता कोण, हे त्यांनी जाहीर करावे, असे आव्हान राज्याचे वनमंत्री व भाजपचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी दिले.

मुनगंटीवार गुरुवारी नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलत होते. ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा देशभरात प्रभाव बघता सर्वच विरोधक एकत्र आले आहेत. परंतु, मोदींच्या मागे जनता आहे. सुप्रिया सुळे यांनी देवेंद्र फडणवीस यांची आधी जशी काळजी घेतली तशीच काळजी त्यांनी २०२४ मध्येही घेतली तर आम्ही पुन्हा सत्तेत येऊ.

अजित पवार प्रदेशाध्यक्ष पदासाठी इच्छुक असू शकतात. कारण उमेदवार जाहीर करताना एबी फॉर्मवर अखेरीस पक्षाध्यक्षाची स्वाक्षरी असते. भविष्याचा वेध घेत अजित पवार असे बोलले असावे, असेही मुनगंटीवार म्हणाले.

# जिल्ह्यातील ५१९ शाळांना दुरुस्तीची गरज

## ८०० पेक्षा जास्त शाळांमध्ये शौचालयाची समस्या

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** पावसाळा तोंडावर असून जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील ५१९ शाळांची दुरुस्ती करावी लागणार आहे. अनेक शाळात संरक्षक भिंतीसह शौचालयाचे बांधकामही करावे लागणार आहे.

जिल्हा शैक्षणिक गरजा निश्चिती समितीची आढावा बैठक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीत विशेषत्वाने चार प्रमुख योजनांवर चर्चा करण्यात आली. बैठकीत जिल्हा परिषदांच्या क्षेत्रातील प्राथमिक, माध्यमिक शाळांची इमारत व वर्गखोली विशेष दुरुस्ती, स्वच्छतागृह दुरुस्ती यावर चर्चा करण्यात आली. त्यात ५१९ शाळांची दुरुस्तीचा मुद्दा चर्चेला गेला. त्याचप्रमाणे शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा करून देणे आणि २७८ वर्गखोलीचे बांधकाम करणेए ३७४ शाळांमध्ये संरक्षक भिंत बांधणे, ८२७ शाळांमध्ये शौचालय बांधणे, १२८ शाळांमध्ये स्वयंपाकगृह बांधकाम करणे आदी मुद्यांवर चर्चा झाली.

शासनाकडून मंजूर केलेल्या जिल्हा परिषदांच्या १४ आदर्श शाळांचे बळकटीकरण लवकरात लवकर करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. ज्या शाळेत विज्ञान प्रयोगशाळा, संगणक प्रयोगशाळा, 'डिजिटल' शाळा, 'इंटरनेट' व 'वायफाय' सुविधा नाहीत. त्या शाळांचे सर्वेक्षण करून त्यात आवश्यक सुविधा उपलब्ध करण्याबाबत विशेष भर देण्यास शर्मा यांनी सांगितले. बैठकीला उपमुख्य कार्यकारी अधिकारी विपुल जाधव, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी सीमा नानहोर आदींची विशेष उपस्थिती होती.

### नागपूर जिल्ह्यातील पहिलाच प्रयोग; उपचार, समुपदेशन होणार

# कामठी उपजिल्हा रुग्णालयात अद्ययावत तंबाखू मुक्ती केंद्र

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** सार्वजनिक आरोग्य विभाग, बजाज इलेक्ट्रिकल्स फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर जिल्ह्यातील पहिले अद्ययावत शासकीय तंबाखू मुक्ती केंद्र कामठी उपजिल्हा रुग्णालयात सुरू झाले आहे. येथे तंबाखूचे व्यसन असलेल्यांवर उपचार, समुपदेशनाची सुविधा आहे.


कामठीतील उपकेंद्रातील केंद्राचे उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निवृत्ती राठोड यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी केंद्रात वैद्यकीय अधीक्षक डॉ. एन. धुमाळे, योग शिक्षक योगश तुलशान, डॉ. विनोद पाकधुने, डॉ. डांगोरे, डॉ. अमितकुमार धमगाये, डॉ. स्वाती फुलसंगे आणि उपजिल्हा रुग्णालयातील बरेच पदाधिकारी उपस्थित होते. नागपूरसह राज्यात तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन वाढत आहे. त्यात खर्रा, गुटखा, पानमसाला सेवन आणि बीडी-सिगारेटसह इतरही तंबाखूजन्य पदार्थांच्या धूम्रपानाचा समावेश आहे. ग्लोबल ॲडल्ट टोबॅको सर्वेक्षणात १५ ते १८ वयोगटातील मुलांपैकी २८ टक्के जणांना तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन वा धूम्रपानाचे व्यसन असल्याचे पुढे आले आहे. हे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य शासन व बजाज फाऊंडेशन एकत्र काम करत आहे.



केंद्राचे उद्घाटन करताना जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निवृत्ती राठोड सोबत इतर अधिकारी-कर्मचारी.

उपक्रमाअंतर्गत नागपूरातील कामठी उपजिल्हा रुग्णालयात अद्ययावत केंद्राचा शुभारंभ झाला. त्यात बजाज फाऊंडेशनने सामाजिक दायित्व निधीतून खुर्चा, टेबल, 'कार्बन मोनाक्साईड मीटर'सह इतरही साहित्य उपलब्ध केले आहे. सोबत प्रशिक्षणाची सोयही केली आहे. केंद्रात एक दंतरोग तज्ज्ञ आणि एक समुपदेशकही उपलब्ध राहील.

## शब्दकोडे- ६५



**आडवी विधाने :**
(१) आखाड्यात उतरलेला मल्ल
(५) पांढऱ्या पायांचा हरिण
(८) गोंद, एक चिकट पदार्थ
(९) तारणारा
(११) पत्रा कापताना मध्यबिंदू काढण्याचे एक खिळ्यासारखे हत्यार
(१२) स्पर्धा, चढाओढ
(१५) दोरीचा वा फितीचा तुकडा; कायदा, नियम
(१७) गुंग, लीन
(१८) अरण्य, जंगल
(१९) डोंगराची तुटलेली बाजू
(२१) उद्योग, धंदा
(२२) विनंती, प्रार्थना; विनयशील वर्तणूक
(२४) गळ्यापर्यंत
(२५) हर्ष, आनंद
(२६) वृत्त, खबर
(२८) फळाचा कापून ठेवलेला तुकडा
(२९) भांडण, कलह
(३०) मयूर (३२) अपकर्ष, ऱ्हास, दुःस्थिती
(३३) देणारा, देणगीदार
(३५) उपस्थित
(३६) शूर आणि उत्साही वीर

**उभी विधाने :**
(१) पागोटे बांधणारा
(२) बर्फ
(३) पांगापांग, दाणादाण
(४) मऊ, मृदू
(६) रिकामा, खोटा
(७) ग्राम, खेडे
(१०) अतिरेक, जोर
(१३) मोजका खर्च, काटकसर
(१४) पुत्र, मुलगा
(१६) भूकंप
(१८) परमुलखात जूट करून राहिलेल्या लोकांची वस्ती
(२०) संमती, दुजोरा
(२३) मोठी नदी
(२४) गगन, नभ
(२६) तरट, गोणपाट
(२७) लवण
(२९) राबता, वहिवाट, वर्दळ
(३१) बोकड, बकरा
(३२) बाण, शर
(३४) आखीव बंद कागद

**- सरोज ताठरे**

## सुडोकू - ६५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | | ६ | | १ | ९ | ५ | | |
| | | | | | | | ६ | |
| | ४ | ५ | | | | | | ७ |
| | ६ | | | | ८ | ७ | २ | |
| | | | १ | | ६ | | | |
| | ३ | ८ | ९ | | | | १ | |
| ३ | | | | | | ६ | ७ | |
| | ५ | | | | | | | |
| | | १ | ३ | ५ | | ९ | | २ |

### सुडोकू - ६४चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ८ | ६ | ५ | ७ | ४ | ३ | ९ | १ |
| ७ | ५ | ४ | ९ | १ | ३ | ८ | ६ | २ |
| १ | ३ | ९ | २ | ६ | ८ | ७ | ५ | ४ |
| ९ | ७ | ३ | ४ | ५ | ६ | १ | २ | ८ |
| ४ | १ | ८ | ३ | २ | ९ | ५ | ७ | ६ |
| ६ | २ | ५ | १ | ८ | ७ | ९ | ४ | ३ |
| ८ | ४ | ७ | ६ | ९ | १ | २ | ३ | ५ |
| ५ | ६ | १ | ७ | ३ | २ | ४ | ८ | ९ |
| ३ | ९ | २ | ८ | ४ | ५ | ६ | १ | ७ |

### शब्दकोडे -६४चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | कां | ड | तां | ड | व | ■ | अ | मा | प |
| ब | दा | म | ■ | व | ड | वा | न | ल | ■ |
| ल | ■ | रू | प | क | ■ | क | व | ■ | पा |
| क | स | ■ | र्य | ■ | वा | स | र | म | णी |
| ■ | ह | य | व | द | न | ■ | त | म | ■ |
| का | च | ■ | सा | ■ | वा | म | ■ | ता | स |
| प | र | वा | न | गी | ■ | नो | र | ■ | जा |
| ड | ■ | स | ■ | त | ह | ह | या | त | ■ |
| ■ | क | ला | ल | ■ | की | र | ■ | पा | ग |
| ब | च | त | ■ | हि | म | ■ | वे | स | ण |

# परदेशी शिष्यवृत्ती योजना अर्ज प्रक्रियेस अखेर ५ जुलैपर्यंत मुदतवाढ

## सामाजिक न्याय विभागाकडून 'लोकसत्ता'च्या वृत्ताची दखल

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**




**नागपूर :** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती, नवबौद्ध प्रवर्गातील ७५ विद्यार्थ्यांना परदेशामध्ये विशेष अध्ययनासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेंतर्गत शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. मात्र, प्रवेश निश्चिती पत्राअभावी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करताना अनेक विद्यार्थ्यांना अडचण येत असल्याचे वृत्त 'लोकसत्ता'ने प्रकाशित केले होते. याची दखल घेत अखेर सामाजिक न्याय विभागाने अर्जासाठी ५ जुलैपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील मुला-मुलींना परदेशात पदव्युत्तर पदवी आणि संशोधनात्मक अभ्यासक्रमाचे (पीएच.डी.) विशेष अध्ययन करण्यासाठी आर्थिक मदत देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश होय. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून परदेश शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागवण्यात येत असून अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २० जून होती. अर्ज करण्याआधी विद्यार्थ्यांना परदेशी विद्यापीठात प्रवेश घेणे अनिवार्य आहे. ज्या विद्यार्थ्यांचा परदेशी विद्यापीठामध्ये प्रवेश झालेला आहे त्यांनाच यासाठी शिष्यवृत्तीठी अर्ज करता येतो.

मात्र, अनेक विद्यार्थ्यांकडून कागदपत्रांची पूर्तता अजूनही झालेली नाही. तसेच काही विद्यार्थ्यांचे परदेशातील विद्यापीठाकडून निवडपत्र आलेले नाही. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्यात अडचण येत होत्या. त्यामुळे अर्जासाठी मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार ५ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून विद्यार्थ्यांना अर्ज करण्याचे आवाहन समाज कल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी केले आहे.

# नागपूरमध्ये भाजप कार्यकर्त्यांत अस्वस्थता

**राम भाकरे, लोकसत्ता**

> राज्य किंवा केंद्र सरकारकडून नियुक्त्या करताना पदाधिकाऱ्यांचा विचार केला जातो. पक्षांतर्गत कुठेही नाराजी नाही. भारतीय जनता पक्षातील कार्यकर्ता पक्ष सोडून गेला असे दिसणार नाही. उलट पक्षामध्ये बाहेरील पक्षाचे कार्यकर्ते येत आहे. काही कार्यकर्त्यांच्या अपेक्षा असतात. अपेक्षा ठेवणे वाईट नाही. ते नाराज असतील तरी योग्य वेळी त्यांना कुठे ना कुठे स्थान मिळेल.
> – गिरीश व्यास, माजी आमदार

**नागपूर :** राज्यात सत्तेत येऊन वर्षभराचा काळ लोटला तरी विविध महामंडळांवर कार्यकर्त्यांच्या नियुक्त्या नाहीत, मंत्रालयाशी संबंधित कामे होत नाहीत आणि दुसरीकडे संघटनेत नव्याने आलेल्यांना महत्त्वाची पदे दिली जातात. यामुळे भारतीय जनता पक्षातील जुन्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी असून काहींनी ती वरिष्ठांकडे बोलूनही दाखवली आहे. भाजपने लोकसभा निवडणुकीच्या तयारीला सुरुवात केली. महाजनसंपर्क अभियानाच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट कार्यकर्त्यांना देण्यात आले. मात्र हे सर्व करणाऱ्या जुन्या कार्यकर्त्यांच्या भावना पक्षात कोणी ऐकून घेत नाही, अशी भावना पक्षात वाढीस लागली आहे. पक्षाने अलीकडच्या काळात केलेल्या नियुक्त्याही याला कारणीभूत ठरल्या आहेत. काही मंडळ अध्यक्षांना विधानसभा निवडणूक प्रमुख न करता इतरांना संधी देण्यात आली. त्यांची नाराजी अधिक आहे. जे नेते निवडणूक लढवण्यास इच्छुक होते त्यांनाच निवडणूक प्रमुख केल्याने ते नाराज आहे. शहरात विधानसभा मतदारसंघनिहाय कार्यकारिणी अजूनही जाहीर केली नाही. त्यामुळे निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दक्षिण-पश्चिम मतदारसंघासह दक्षिण आणि मध्य व पूर्व नागपुरात हेच चित्र आहे. उत्तर नागपुरातील कार्यकर्ता मेळाव्यात ही बाब समोर आली. पक्षात मोठ्या प्रमाणात 'इनकमिंग' सुरू आहे. नव्याने आलेल्यांना संघटनेत जबाबदाऱ्या दिल्या जात आहे. त्यामुळे जुने कार्यकर्ते उदासीन आहेत. महामंडळांवर नियुक्त्या नाहीत, मंत्रालयात कामे होत नाहीत. अशा स्थितीत नवीन कार्यकर्ते जोडायचे कसे? असा त्यांचा सवाल आहे. आगामी महापालिकेच्या निवडणुकांसाठी अनेक माजी नगरसेवक इच्छुक आहेत, पण त्यांना त्यांच्या उमेदवारीबाबत आश्वस्त केले जात नाही. त्यामुळे त्यांचा उत्साह मावळत चालला आहे. अशा नाराजांनी त्यांचा वेगळा गट करणे सुरू केले आहे. याची दखल पक्षातील वरिष्ठांनी घ्यावी, अशी मागणी आता कार्यकर्ते उघडपणे करू लागले आहेत.

# बजाजनगरातील 'सेक्स रॅकेट'वर छापा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** अभियांत्रिकीच्या आणि बीएस्सी पदवीच्या अंतिम वर्षाला शिकत असलेल्या दोन तरुणींनी झटपट पैसा कमावण्यासाठी तसेच महागडे शौक पूर्ण करण्यासाठी देहव्यापाराच्या दलदलीत उडी घेतली. दोघींनी बाहेरचा अतिरिक्त खर्च भागवण्यासाठी दोन दलालांशी सौदा केला. गुरुवारी पोलिसांनी घातलेल्या छाप्यात दोघीही पकडल्या गेल्या. याप्रकरणी बजाजनगर पोलिसांनी दलालांना अटक केली आहे.

२१ वर्षांची तरुणी ही एका नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयात अंतिम वर्षाला शिकते. तिची २० वर्षीय मैत्रीण बीएस्सी पदवीच्या अंतिम वर्षाला शिक्षण घेत आहे. घरून मोजके पैसे मिळत असल्यामुळे दोघींनाही आर्थिक अडचण होती. दोघींची भेट 'सेक्स रॅकेट'चा दलाल लोकेश रोहिणीप्रसाद मिश्रा (३९, झिंगाबाई टाकळी) याच्याशी झाली. त्याने देहव्यापार करण्याचा सल्ला दिला. त्याने आंबटशौकीन ग्राहक शोधणे सुरु केले आणि दोघीही मागणीनुसार देहव्यापार करीत होत्या.



## कार्यालय
## नगर पंचायत अर्जुनी ता. अर्जुनी / मोर जि. गोंदिया

**Email Address:-** npmorgaon@gmail.com — **दुरध्वनी क्र.** 07196220034

नपंअ/बां.वि.जा./670/2023 — दिनांक 22/06/2023

### निविदा सूचना

मुख्याधिकारी नगर पंचायत अर्जुनी यांचे वतीने विविध योजना अंतर्गत कामे करण्यासाठी व्दि-लिफाफा पद्धतीने अनुभवी कंत्राटदारांकडून निविदेतील अटी व शर्ती नुसार निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदेचा विस्तृत नमूना नगर पंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत **दिनांक 23/06/2023** रोजी पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

- नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना सन 2022-23 बांधकाम विभाग अंतर्गत। काम अंदाजपत्रकीय रक्कम रु. 320210/- व विद्युत विभाग अंतर्गत एकूण 4 कामे अंदाजपत्रकीय रक्कम रु.3733464/-
- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना सन 2022-23 बांधकाम विभाग अंतर्गत 4 कामे अंदाजपत्रकीय रक्कम रु. 1622717/- व विद्युत विभाग अंतर्गत एकूण 2 कामे अंदाजपत्रकीय रक्कम रु.1659752/-
- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलितवस्ती सुधार योजना सन 2022-23 बांधकाम विभाग अंतर्गत 2 कामे अंदाजपत्रकीय रक्कम रु. 1078929/-
- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलितवस्ती सुधार योजना सन 2017-18,2018-19 व 2019-20 उर्वरित निधी बांधकाम विभाग अंतर्गत ।। कामे अंदाजपत्रकीय रक्कम रु. 46.98 लक्ष/-
- **निविदेचा तपशिल**

| | |
|---|---|
| निविदा प्रसिद्धी | दिनांक 23/06/2023 रोजी सकाळी 11.00 वाजता |
| कोरी निविदा विक्री व निविदा दाखल करण्याचा दिनांक | दिनांकः 23/06/2023 ते 12/07/2023 रोजी सांय 5.00 वाजेपर्यंत |
| निविदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक :- 13/07/2023 रोजी सायं. 5.00 वाजेपर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांकः 14/07/2023 रोजी दुपारी 1.00 वाजता (शक्य झाल्यास) |

**टीपः** उपरोक्त निविदा सूचना, कोरे निविदा प्रपत्र, इतर अटी व शर्ती, शुद्धीपत्रके नगर पंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास उपलब्ध आहेत.

स्वा/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत अर्जुनी

## HDFC BANK
We understand your world

रजि. ऑफिस : एचडीएफसी बँक लि., एचडीएफसी बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (प.), मुंबई-४०००१३.
शाखा : रिटेल पोर्टफोलिओ मॅनेजमेंट, एचडीएफसी बँक लि., ३ रा मजला, लँडमार्क बिल्डिंग, गोरक्षण रोड, जुने आयटी स्क्वेअर, अकोला ४४४ ००१.

### विक्रीची जाहीर सूचना (सरफेसी कायदा २००२ नुसार)

सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट रूल्स २००२ प्रमाणे 'जशी आहे तशी आणि जे काही आहे ते' या तत्वानुसार स्थावर मालमत्तेची विक्री.

| कर्जदार / जामिनदार यांची नांवे आणि कर्ज खाते क्रमांक | वसूल करावयाची थकबाकी (सुरक्षित कर्ज) | तारण स्थावर मालमत्तेचे स्थान व तपशील | राखीव किंमत व बयाणा रक्कम रु. | मालमत्ता तपासणीची तारीख | ई-ऑक्शन तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १) कमल ट्रेडर्स, बिल्डींग कॉम्प्लेक्स, नांदगाव पेठ, अमरावती. २) अमरलाल चंदूमल पिंजाणी, ३) दिलिपकुमार चंदूमल पिंजाणी, दोघेही रा. – ४१, के. एल. कॉलेज रोड, रामपुरी कॅम्प, शिवाजी नगर, अमरावती. ४) अनिल चंदूमल पिंजाणी, ५) गुरुमुख चंदूमल पिंजाणी, दोघेही रा. – ११ रोड, मिटो चक्कीजवळ, रामपुरी कॅम्प, शिवाजी नगर, अमरावती. (कर्ज खाते क्र.: ८३२१२४२७) | दि. १३/०२/२०२० पर्यंतची रक्कम रु. १,९३,९६,४६८/- | नंदगाव, पेठ, देवगाव परगणे, सर्व्हे क्र. ९८ व ९९, वॉर्ड क्र. ०३, चौपाल सागर जवळ, नांदगाव पेठ, ता. व जि. अमरावती – ४४४ ९०१ येथील बिल्डींग कॉम्प्लेक्स मधील ब्लॉक क्र. ई मधील शॉप क्र. ९३, ९४, ९५, ९६, ९७ व ९८. | राखिव किंमत: रु. १,०२,९५,७२०/- बयाणा रक्कम: १०,२९,५७२/- | दि. ०७.०७.२०२३ स. ११.०० ते दु. ०२.०० दरम्यान. | १२.०७.२०२३ स. ११.०० ते दु. १२.०० ५ मिनिटाच्या अमर्याद वाढीव कालावधीसह |

[illegible]

जा. जा. ... मिळविण्यात किंवा स्थावर मालमत्तेची / सुरक्षित मालमत्तेची तपासणी करण्यात काही अडचण आल्यास ... बँक लिमिटेडच्या संबंधित अधिकारी – श्री. सुनील कुमठेकर – ९३७१६१९५९६, श्री. सचिन बोचरे – ... sunil.kumthekar@hdfcbank.com, sachin.bochare@hdfcbank.com व ई-प्रोक्युरमेंट ... ), अहमदाबादचे अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. बिडर सपोर्ट नंबर्स: ९२६५५६२८२१, ०७९- ..., ई-मेल: gujarat@auctiontiger.net व chintan.bhatt@auctiontiger.net कोणतेही कारण न देता ... याचा व संपूर्ण लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार एचडीएफसी बँकेने स्वत:कडे राखून ठेवला आहे.
... (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८(६) अंतर्गत कर्जदार/गहाणदार यांना ३० दिवसांची नोटीस ...
(इंग्रजी नोटीसीचे हे भाषांतर असून अर्थबोध होण्यासाठी इंग्रजी मसुदाच ग्राह्य धरण्यात येईल.)
दिनांक: २२/०६/२०२३ ठिकाण : अकोला. — सही/-, अधिकृत अधिकारी, एचडीएफसी बँक लि.

## SHRI SAMARTH SHIKSHAN SANSTHA, AHERI
## CHINTAMANI COLLEGE OF ARTS & SCIENCE, GONDPIPRI
TAH. GONDPIPRI DIST. CHANDRAPUR-442702 (M.S.)
(Recognized by Govt. of Maharashtra & Affiliated to Gondwana University, Gadchiroli)
(Granted)

### WANTED

Applications are invited for the following post of Assistant Professor

| Sr. No. | Subject | No. of Posts | Nature of Posts | Category |
|---|---|---|---|---|
| 1. | Physics | 01 | Full Time | S.C. - 01<br>S.T. - 01<br>O.B.C. - 01 |
| 2. | Botany | 01 | Full Time | |
| 3. | Zoology | 01 | Full Time | |

**Pay Scale : -** As per UGC/Govt. of Maharashtra Rules.
**Educational Qualification: -** The Candidates should have following Qualification.
1. Good Academic record with at least 55% of marks or an equivalent grade of B in the 7 point scale with latter grades O.A.B.C.D.E. & F. at the master's degree level in the relevant subject from an Indian University or equivalent degree from a foreign University.
2. Besides fulfilling the above qualification, candidates should have cleared the NET or SET.

**Notes :-**
1. Relaxation of 5% of the marks i.e. from 55% to 50% at the Master's Degree may be provided to the SC/ST category candidates.
2. Relaxation of 5% of the marks i.e. from 55% to 50% at the Master's Degree may be provided to the Ph.D. degree holders who have passed their Master's degree prior to 19th September 1991.
3. Relaxation of 5% of the marks i.e. from 55% to 50% of the marks at the Master's Degree level be provided to the physically and visually handicapped candidates.
4. NET or SET shall remain the minimum eligibility condition for requirement of lecturer in University/college/Institution provided however that condition who are have been awarded Ph.D. degree in compliance of University Grants Commission (minimum standard and procedure for appeared of Ph.D. Degree) regulation 2009 shall be exempted from the requirement of the minimum eligibility condition of NET/SET for recruitment and appointment of lecturer of equivalent position in University/College/Institute NET/SET shall not be required for such master's programmers in disciplines for which there is no NET/SET.
5. Those who are already in service shall submit their application through their employer, along with No Objection Certificate from employer.
6. Educational qualification for recruitment is as per U.G.C. State Govt. & Gondwana University Gadchiroli Rules & Regulation prevailing at present and as may be revised from time to time.
7. The vacant post is being filled subject to the decision of Hon. High Court, Aurangabad Bench Petition No. 12051/2015

Complete application form with attested Xerox copies of all relevant documents along with phone/mobile No., E-mail Id, two passport size photo and Demand Draft/Postal Order of Rs. 1000/- in favor of Principal Chintamani College of Arts & Science, Gondpipri Payable at Gondpipri should reach to the President/Secretary Shri Samarth Shikshan Sanstha, Aheri, C/o, Chintamani College of Arts & Science, Near Govt. Tribal Boy's Hostel, Chandrapur Road, Gondpipri Ta. Gondpipri Dist. Chandrapur – 442702 (M.S.) within 15 days from the date of publication of this advertisement

No T.A./D.A. will be paid to attend the Interview.

Sd/- **Dr. M.N. Giriya**, Principal, Chintamani College of Art & Science, Gondpipri, Dist. Chandrapur (M.S.)
Sd/- **Swapnil Dontulwar**, Secretary, Shri Samarth Shikshan Sanstha, Aheri Ta. Aheri Dist. Gadchiroli (M.S.)

SPECTRUM

## Chintamani Education Society, Ballarpur
## CHINTAMANI COLLEGE OF SCIENCE, POMBHURNA
TAH. POMBHURNA DIST. CHANDRAPUR – 442918 (M.S.)

### WANTED

(Recognized by Govt. of Maharashtra & Affiliated to Gondwana University, Gadchiroli)
(Granted)

Applications are invited for the following post of Assistant Professor

| Sr. No. | Subject | No. of Posts | Nature of Posts | Category |
|---|---|---|---|---|
| 1. | Botany | 01 | Full Time | OBC - 01<br>EWS - 01 |
| 2. | Zoology | 01 | Full Time | |

**Pay Scale : -** As per UGC/Govt. of Maharashtra Rules.
**Educational Qualification: -** The Candidates should have following Qualification.
1. Good Academic record with at least 55% of marks or an equivalent grade of B in the 7 point scale with latter grades O.A.B.C.D.E. & F. at the master's degree level in the relevant subject from an Indian University or equivalent degree from a foreign University.
2. Besides fulfilling the above qualification, candidates should have cleared the NET or SET.

**Notes :-**
1. Relaxation of 5% of the marks i.e. from 55% to 50% at the Master's Degree may be provided to the SC/ST category candidates.
2. Relaxation of 5% of the marks i.e. from 55% to 50% at the Master's Degree may be provided to the Ph.D. degree holders who have passed their Master's degree prior to 19th September 1991.
3. Relaxation of 5% of the marks i.e. from 55% to 50% of the marks at the Master's Degree level be provided to the physically and visually handicapped candidates.
4. NET or SET shall remain the minimum eligibility condition for requirement of lecturer in University/college/Institution provided however that condition who are have been awarded Ph.D. degree in compliance of University Grants Commission (minimum standard and procedure for appeared of Ph.D. Degree) regulation 2009 shall be exempted from the requirement of the minimum eligibility condition of NET/SET for recruitment and appointment of lecturer of equivalent position in University/College/Institute NET/SET shall not be required for such master's programmers in disciplines for which there is no NET/SET.
5. Those who are already in service shall submit their application through their employer, along with No Objection Certificate from employer.
6. Educational qualification for recruitment is as per U.G.C. State Govt. & Gondwana University Gadchiroli Rules & Regulation prevailing at present and as may be revised from time to time.
7. The vacant post is being filled subject to the decision of Hon. High Court, Aurangabad Bench Petition No. 12051/2015

Complete application form with attested Xerox copies of all relevant documents along with phone/mobile No., E-mail Id, two passport size photo and Demand Draft/Postal Order of Rs. 1000/- in favor of Principal Chintamani College of Science, Pombhurna Payable at Pombhurna should reach to the President/Secretary Chintamani Education Society, Ballarpur, C/o, Chintamani College of Science, Aksapur Road, Pombhurna Ta. Pombhurna Dist. Chandrapur – 442918 (M.S.) within 15 days from the date of publication of this advertisement.

No T.A./D.A. will be paid to attend the Interview.

Sd/- **Dr. R.G. Weginwar**, Principal, Chintamani College of Science, Pombhurna, Dist. Chandrapur (M.S.)
Sd/- **Swapnil Dontulwar**, Secretary, Chintamani Education Society, Ballarpur Dist. Chandrapur (M.S.)

SPECTRUM

## महाराष्ट्र शासन
### सामान्य प्रशासन विभाग

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांचे पद भरण्याबाबतची दिनांक २२ जून, २०२३ रोजी प्रसिद्ध केलेली जाहिरात **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी त्यानुसार विहित मुदतीत अर्ज सादर करावेत.

**ठिकाण :** मुंबई
**दिनांक :** २२.०६.२०२३

स्वाक्षरी/-
**लीना संखे**
**उपसचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
महाराष्ट्र शासन
डीजीआयपीआर/२०२३-२४/१६५२

## यूनियन बँक ऑफ इंडिया / Union Bank of India

क्षेत्रिय कार्यालय, नागपूर
३४/२, आशिर्वाद कमर्शियल कॉम्प्लेक्स, सेन्ट्रल बाजार रोड, रामदासपेठ, नागपुर – १०
फोन नं. ०७१२–२४६१०४२

### शुद्धीपत्रक

सर्वांना सुचित करण्यात येते की शनिवार दि. १०.०६.२०२३ रोजी लोकसत्ता आणि इंडियन एक्सप्रेस, नागपुर ह्या वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या ई लिलाव बिक्री सुचना – अचल संपत्ती विक्री करिता विक्री सुचना मध्ये अ.क्र. २ मध्ये कर्जदार मे. ओम साई राईस मिल यांच्या राखीव किंमत आणि ई.एम.डी. अजाणतेपणे चुकीची प्रकाशित असे प्रकाशित झाली आहे.
तरी राखीव किंमत आणि ई.एम.डी. खालील उल्लेखित प्रमाणे वाचावे.
अ.क्र. २.१ : राखीव किंमत : रु. ७२,८२,८००.०० (रुपये बहात्तर लक्ष ब्याऐंशी हजार आठशे फक्त), ई.एम.डी. : रु. ७,२८,२८०.०० (रुपये सात लक्ष अट्ठावीस हजार दोनशे ऐंशी फक्त)
अ.क्र. २.२ : राखीव किंमत : रु. ४०,९६,८००.०० (रुपये चाळीस लक्ष शहाण्णव हजार आठशे फक्त), ई.एम.डी. : रु. ४,०९,६८०.०० (रुपये चार लक्ष नऊ हजार सहाशे ऐंशी फक्त)
अ.क्र. २.३ : राखीव किंमत : रु. ९९,६८,४००.०० (रुपये नव्याण्णव लक्ष अड्डसष्ट हजार चारशे फक्त), ई.एम.डी. : रु. ९,९६,८४०.०० (रुपये नऊ लक्ष शहाण्णव हजार आठशे चाळीस फक्त)
इतर सर्व तपशील सारखेच राहतील.

दिनांक : १०.०६.२०२३
स्थळ : नागपूर

अधिकृत अधिकारी
युनियम बँक ऑफ इंडिया

जीवनसाथीच्या निवडीसाठी एकमेव मंगल मार्ग
दर रविवारी लोकसत्ता'तून
जीवनसाथी

## लोकसत्ता क्लासिफाइड्स




### नोकरीविषयक
### पाहिजेत
**OTHERS**

आयुर्वेदिक कंपनीला शिक्षित / बेरोजगार महिला, पुरूष पाहिजेत. घरीबसून औषध पॅकिंग करून दरमहा २५०००-३००००/- कमवा. (रजिस्ट्रेशन शुल्क २१५०/-) संपर्क. 9777752472
0070848250-1

### जागासंबंधी
### मालमत्तासंबंधी

READY 1/2/3/4BHK Flats & Doctors Chambers at Khamla, BajajNagar, Jaitala, Dabha, Hajaripahad, Untkhana, Sakkardara,Gandhi Builders- 8888820901/2, 7666883935 .
0080077274-1

जाहिरात छोटी, प्रतिसाद मोठा
संपर्क-२५०६९०४, २५०६९०३

### यात्रा विशेष
### यात्रासहल

दोस्तीटूर- नेपाळ- लुंबिनीसह, सौराष्ट्र- गिरनारसह, लेह लडाख, चारधामयात्रा, नर्मदापरिक्रमा, पुरी- गंगासागर- सुंदरबन, हंपी- बदामी, काश्मीर- वैष्णोदेवी, आसाम- पूर्वांचल, दुबई. 9594880123/ 9702251584.
0070839968-4

### महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

### यात्रासहल

श्रीरामकृष्ण- शास्त्रोक्त- नर्मदापरिक्रमा-२४-१०-२०२३ / १६-११-२०२३/ ०४-१२-२०२३// त्रिस्थळीयात्रा- नैमिष्यारण्यासह- १९-११-२०२३// कर्नाटक- कुर्गसह- १६-११-२०२३// कुरवपूर- पिठापूर- ३०-१०-२०२३/ १७/११/२०२३// आसाम// केरळ- तामिळनाडू- २८-१०-२०२३// हंपी- बदामी- १६-११-२०२३/ ०१-१०-२०२३// स्टॅच्यू- युनिटीसह- सौराष्ट्रदर्शन- २५-१०-२०२३/ २०-११-२०२३// राजस्थान- १८-११-२०२३/ १९-१२-२०२३// मध्यप्रदेश- १७-११-२०२३// अंदमान- १७-११-२०२३// चारधामयात्रा- २८-०९-२०२३/ बापट- ९८२००२३१०६/ ९१३७००१३९५.
0070802458-22

## SBI भारतीय स्टेट बँक / State Bank of India
### समुद्रपूर शाखा
समुद्रपूर (05445) शाखा, एपीएमसी, गीरड रोड, समुद्रपूर, जि-वर्धा, पीन-442305

### सांकेतिक ताबा सुचना (अचल संपत्ती करीता)

ज्याअर्थी, भारतीय स्टेट बँक, प्राधिकृत अधिकारी या नात्याने वित्तीय प्रतिभूतीकरण व पुनर्रचना आणि प्रतिभूती अमलबजावणी 2002 (54 चे 2002) नियम अंतर्गत तसेच प्रतिभूती हिताधिकार (अमलबजावणी) सरफेसी ॲक्ट 2002 च्या नियम 9 सह वाचल्या जाणा-या कलम 13(12) अंतर्गत मांग सूचना खालील उल्लेखित खात्या समोर ही सूचना प्राप्तीनंतर 60 दिवसांचा आत भरपाई करण्याच्या उद्देशाने सुचना दिली होती.
कर्जदार यांनी या रक्कमेची परतफेड न केल्यामुळे एतद् व्दारा कर्जदार आणि सर्व सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की खालील सही करणा-यांनी उक्त नियमावली नियम 8 सह वाचल्या जाणा-या आणि उक्त अधिनियमाच्या कलम 13(4) च्या अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन बँकेस गहाण असलेल्या खालील मालमत्तेचा सांकेतिक ताबा बँकेने घेतला आहे.
विशेष करुन कर्जदार आणि सर्व सामान्य जनतेला एतद् व्दारा वरील संपत्तीच्या विषयी काहीही घेणे देणे न करण्याकरीता ताकीद दिली जात आहे. तसेच पुढील संपत्तीचे व रक्कमेवरील व्याजाचे आणि अन्य खर्चाचे देणेघेणे भारतीय स्टेट बँक, व्याज सह इतर प्रभाराधिन राहील.

| अ. क्र. | कर्जदार / जमानतदार यांचेनाव | शाखा | अचल संपत्तीचे वर्णन | मांग सुचनेची तारीख | ताबा सूचना दिनांक | थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री . दिलीप विश्वनाथ क्षीरसागर आणि सौ. सविता दिलीप क्षीरसागर | समुद्रपूर शाखा | सर्व भाग आणि तुकडा समाविष्ट संपत्ती अर्जदार श्री. दिलीप विश्वनाथ क्षीरसागर आणि सौ. सविता दिलीप विश्वनाथ क्षीरसागर (नोंदनीकृत गहानदार) रहिवासी घर प्लॉट नं. 124. मौजा- बेला, पीएचएन 28 सर्वे नं.713 / 4, ता. उमरेड जि. नागपूर एरिया 288.00 चौ.मी आणि चतुर्सिमा:- पुर्व: प्लॉट नं. 143, पश्चिम: 12 मी लेआउट रोड, उत्तर: प्लॉट नं. 125, दक्षिण: प्लॉट नं. 123 | 17.02.2022 | 17.06.2023 | रु. 541486.64/- + अधिक व्याज + इतर खर्च |
| 2. | श्री . कमलाकर दाजिबा भुरे | समुद्रपूर शाखा | सर्व भाग आणि तुकडा समाविष्ट संपत्ती अर्जदार श्री. कमलाकर दाजिबा भुरे (नोंदनीकृत गहाणदार) रहिवासी हाऊस नं. 30, नगरपंचायत संपत्ती नं. 793, वार्ड नं. 14, सर्वे नं. 33 / 2, प्लॉट नं. 1980 चौ.फुट एरिया (जिएफ) मौजा समुद्रपूर, ता-समुद्रपूर जि. वर्धा पीन 442305 आणि चतुर्सिमा:- पुर्व: अस्तीत्वद प्लॉट नं. 31, पश्चिम: प्लॉट नं. 29, उत्तर: बरसकर यांचे लेआउट, दक्षिण: लेआउट रोड, | 06.04.2023 | 16.06.2023 | रु. 547980/- + अधिक व्याज + इतर खर्च |
| 3. | श्री . वासुदेव उत्तम पंतवाने | समुद्रपूर शाखा | सर्व भाग आणि तुकडा समाविष्ट संपत्ती अर्जदार श्री. वासुदेव उत्तम पंतवाने (नोंदनीकृत गहाणदार) रहिवासी हाऊस नं. 15, सर्वे नं. 41 / 2, संपुर्ण एरिया 1660 चौ. फुट, आरईजी नं. 807, दिनांक 11.07.2000 मौजा रेंकापुर मौजा नं. 170, पीएच नं. 28 ता-समुद्रपूर जि. वर्धा पीन 442305 आणि चतुर्सिमा:- पुर्व: प्लॉट नं. 8, पश्चिम: लेआउट रोड, उत्तर: प्लॉट नं. 14, दक्षिण: लेआउट रोड, | 06.04.2023 | 16.06.2023 | रु. 434568/- + अधिक व्याज + इतर खर्च |
| 4. | श्री . अविनाश मानिकराव जामुनकर | समुद्रपूर शाखा | सर्व भाग आणि तुकडा समाविष्ट संपत्ती अर्जदार श्री. अविनाश मानिकराव जामुनकर (नोंदनीकृत गहाणदार) रहिवासी हाऊस नं. 3, सर्वे नं. 123 / 3 मौजा शहांलांगडी, मौजा नं. 159, पीएम नं. 6. संत तुकडोजी वार्ड ता. हिंगणघाट, जि. वर्धा पीन 442301 संपुर्ण प्लॉट एरिया 2178 चौ.फुट आणि चतुर्सिमा:- पुर्व: प्लॉट नं. 02, पश्चिम: लेआउट रोड, उत्तर: लेआउट रोड,दक्षिण: प्रोफेसर कॉलनी | 06.04.2023 | 16.06.2023 | रु. 675312/- + अधिक व्याज + इतर खर्च |

दिनांक : 17 / 06 / 2023
ठिकाण : समुद्रपूर

अधिकृत अधिकारी
भारतीय स्टेट बँक

# एका सामन्याच्या आधारे निवड!

## आशियाई क्रीडा स्पर्धेकरिता सहा आंदोलक कुस्तीगिरांना विशेष सवलत

**पीटीआय, नवी दिल्ली**

**कुस्ती महासंघाचे** कामकाज पाहण्यासाठी भारतीय ऑलिम्पिक संघटनेने (आयओए) नियुक्त केलेल्या हंगामी समितीने सहा आंदोलक कुस्तीगिरांना आशियाई क्रीडा स्पर्धा आणि जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवडीसाठी विशेष सवलत दिली आहे. त्यांची केवळ एका सामन्याच्या आधारे या स्पर्धांसाठी भारतीय संघात निवड केली जाणार आहे.

भारतीय कुस्ती महासंघाचे मावळते अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर महिला कुस्तीगिरांच्या लैंगिक शोषणाचे आरोप करताना देशातील आघाडीच्या कुस्तीगिरांनी आंदोलन पुकारले होते. या आंदोलक कुस्तीगिरांपैकी विनेश फोगट, बजरंग पुनिया, साक्षी मलिक, संगीता फोगट, सत्यवर्त कडियन आणि जितेंदर किन्हा यांना आशियाई क्रीडा स्पर्धा व जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठीच्या निवड चाचण्यांना मुकण्याची मुभा देण्यात आली आहे. आंदोलक कुस्तीगिरांना या निवड चाचण्यांमधील विजेत्यांविरुद्ध खेळण्याची ५ ते १५ ऑगस्ट या कालावधीत संधी मिळेल. या एका लढतीत विजय मिळवल्यास त्यांचे भारतीय संघातील स्थान निश्चित होईल.

ब्रिजभूषण यांच्याविरोधातील दीर्घकाळ चाललेल्या आंदोलनामुळे आपल्याला सरावासाठी पुरेसा वेळ मिळालेला नाही. त्यामुळे आपल्यासाठी ऑगस्टमध्ये निवड चाचणीचे आयोजन केले जावे अशी विनंती आंदोलक कुस्तीगिरांनी क्रीडा मंत्रालयाकडे केली होती.

हंगामी समितीला आशियाई क्रीडा स्पर्धांसाठीची निवड चाचणी १५ जुलैपूर्वी घेणे बंधनकारक आहे. त्यानंतर भारतीय खेळाडूंची अंतिम यादी आयोजकांना देणे गरजेचे आहे. आधी निवड चाचणीचे आयोजन करून भारतीय ऑलिम्पिक समिती (आयओए) १५ जुलैपूर्वी खेळाडूंची नावे आशिया ऑलिम्पिक समितीला (ओसीए) देऊ शकेल. त्यानंतर आंदोलक कुस्तीगिरांना निवड चाचणीतील विजेत्यांविरोधातील सामना जिंकण्यात यश आल्यास त्यांच्या नावांचा अंतिम यादीत समावेश करता येऊ शकेल. मात्र, त्यामुळे निवड चाचणीत विजयी ठरणाऱ्या खेळाडूंना आशियाई क्रीडा स्पर्धेपासून दूर राहावे लागेल.



### निर्णयावर प्रश्न उपस्थित

केवळ एका सामन्याच्या आधारे कुस्तीगिरांची भारतीय संघात निवड करण्याच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. "भारतीय कुस्तीमध्ये आता बदल होत आहेत असे म्हटले जाते. मात्र, त्यात खरेच तथ्य आहे का? आताही पूर्वीप्रमाणेच गोष्टी घडत आहे. काही कुस्तीगिरांना विशेष सवलती मिळत आहेत. आधी कुस्ती महासंघाकडून आणि आता हंगामी समितीकडून काही कुस्तीगिरांना फायदेशीर ठरणारे निर्णय घेतले जात आहेत. या कुस्तीगिरांची केवळ सामन्याच्या आधारे निवड होणार आणि आमच्या मुलांना पूर्ण निवड चाचणी स्पर्धेत खेळावे लागणार, हा अन्याय आहे," अशी भावना एका कुस्तीगिराच्या वडिलांनी व्यक्त केली.

# प्रणॉय उपांत्यपूर्व फेरीत


## कश्यप, सिक्की रेड्डी-रोहन जोडीचे आव्हान संपुष्टात

**तैपेइ :** भारताचा अनुभवी बॅडमिंटनपटू एच. एस. प्रणॉयने आपली लय कायम राखताना इंडोनेशियाच्या टॉमी सुगिआर्तोला सरळ गेममध्ये नमवत तैपेइ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत (सुपर ३०० दर्जा) पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला.

**तैपेइ खुली** बॅडमिंटन स्पर्धा

प्रणॉयने जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या सुगिआर्तोचा २१-९, २१-१७ असा सहज पराभव केला. उपांत्यपूर्व फेरीत त्याचा हाँगकाँगच्या अँगस एजी का लोंगशी सामना होईल. या स्पर्धेत प्रणॉय हा एकमेव भारतीय खेळाडू शिल्लक आहे. गेल्या महिन्यात मलेशिया मास्टर्स स्पर्धा जिंकणाऱ्या प्रणॉयने इंडोनेशिया खुल्या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत स्थान मिळवले होते. त्याला अग्रमानांकित डेन्मार्कच्या व्हिक्टर अ‍ॅक्सेलसेनकडून पराभूत व्हावे लागले होते. परंतु, सध्या सुरू असलेल्या तैपेइ स्पर्धेत त्याने चांगला खेळ केला आहे. सुगिआर्तोविरुद्ध प्रणॉयने सामन्याचा पहिला गेम सहज जिंकला. मात्र, दुसऱ्या गेममध्ये सुगिआर्तोने त्याच्यासमोर आव्हान उपस्थित केले. पण प्रणॉयने आपला खेळ उंचावत विजय नोंदवला.

अन्य भारतीय खेळाडूंनी मात्र निराशा केली. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील माजी पदकविजेता पारूपल्ली कश्यपने स्थानिक खेळाडू सू लि यांगकडून १६-२१, १७-२१ अशी हार पत्करली. मिश्र दुहेरीत सिक्की रेड्डी व रोहन कपूर जोडीला तैपेइच्या चियु सिआंग चिये व लिन शियाओ मिनकडून १८-२१, १८-२१ असा पराभव पत्करावा लागला.




जाहिरात

आरोग्यमंदिर
स्वास्थ्य - समस्या आणि समाधान

**प्रश्न-** माझा १२ वर्षांचा मुलगा अतिशय एक्टिव असतो. शाळेच्या टीम साठी फूटबॉल देखील खेळतो. त्याचा दिनक्रम खूपच व्यग्र असतो व त्यामुळे त्याला अभ्यास करण्यासाठी कमी वेळ मिळतो. आजकाल त्याला थकवा जाणवतो व अभ्यासामध्ये लक्ष केंद्रित करण्यास देखील त्रास होतो. कृपया काही उपाय सांगा.

**उत्तर-** एका मातेच्या दृष्टिकोनातून तुमची चिंता समजू शकतो व ती दूर करण्यासाठी काही उपाय सुचवत आहोत. सर्वप्रथम त्याच्या आहारामध्ये शरीराचे बळ वाढवणारे व मेध्य (बुद्धिवर्धक) पदार्थ जसे खजूर, अंजीर, जर्दाळु, मनुके, मखाणा, भोपळ्याच्या बिया, अक्रोड, बदाम, पिस्ते इत्यादींचा समावेश करावा, जे खेळण्यासाठी आवश्यक उर्जा देऊ शकतात. एकाग्रता व आकलन शक्ती वाढविण्यासाठी द्राक्षोविन स्पेशल, सुप्रीम हेल्थ टॉनिक १० मि.लि. समभाग कोमट पाण्यासोबत दिवसातून दोन वेळा जेवणानंतर देऊ शकतात. यामध्ये ब्राह्मी, अश्वगंधा, शतावरी, विदारीकंद यासारख्या मेध्य औषधी द्रव्यांची उपस्थिती आहे, ज्यामुळे एकाग्रता आणि मानसिक शक्ती वाढविण्यास मदत होते. दररोज आहारामध्ये गायीचे तूप व एक ग्लास कोमट दुधाचा आवश्यक समावेश करावा.

**आयुर्वेदिक चिकित्सकांच्या सल्ल्याने औषधांचे सेवन करणे योग्य आहे.**







अर्थसत्ता

# विकास दर ६.३ टक्क्यांपुढे

## 'फिच'कडून वाढीव सुधारित अंदाज

**पीटीआय, नवी दिल्ली**

**भारताचा विकास** दर चालू आर्थिक वर्षात ६.३ टक्क्यांवर राहील, असा सुधारित अंदाज 'फिच' या आंतराष्ट्रीय पतमानांकन संस्थेने गुरुवारी वर्तवला. फिचने आधी विकास दर ६ टक्के राहण्याचे अंदाजले होते.

चालू वर्षातील पहिल्या तिमाहीत अर्थव्यवस्थेच्या वाढीला गती मिळाली आहे. यामुळे फिचने विकास दराचा अंदाज वाढविला आहे. मागील आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा वाढीचा दर ७.२ टक्के आणि त्याआधी २०२१-२२ आर्थिक वर्षात तो ९.१ टक्के होता. फिचने नमूद केल्यानुसार, भारतीय अर्थव्यवस्थेची व्यापक पातळीवर वाढ होत आहे. त्यामुळे सकल राष्ट्रीय उत्पादन (जीडीपी) यंदा जानेवारी ते मार्च तिमाहीत ६.१ टक्क्यांवर गेले. वाहनांची विक्री, खरेदी व्यवस्थापकांचा कल आणि कर्ज वितरणातील वाढ या बाबी मागील तीन महिन्यांत सकारात्मक आहेत. त्यामुळे चालू आर्थिक वर्षासाठी विकास दराचा अंदाज वाढवून ६.३ टक्के करण्यात आला असल्याचे या जागतिक संस्थेने म्हटले आहे.

फिचने मार्च महिन्यात भारताच्या विकास दराचा चालू आर्थिक वर्षासाठीचा अंदाज ६.२ टक्क्यांवरून ६ टक्के असा घटवला होता. वाढती महागाई आणि व्याजदरातील वाढ यामुळे हा अंदाज घटवण्यात आला होता. जागतिक पातळीवर कमी होणारी मागणीही याला कारणीभूत ठरली होती. आगामी २०२४-२५ आणि २०२५-२६ या आर्थिक वर्षात भारताचा विकास दर ६.५ टक्के राहील, असा अंदाजही फिचने व्यक्त केला आहे.

### वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था

भारत ही जगात सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. जागतिक पातळीवरील व्यापार मंदावला असून, त्याचा काही प्रमाणात परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होईल. रिझर्व्ह बँकेने गत वर्षभरात व्याजदरात केलेल्या अडीच टक्के वाढीचा पूर्ण परिणाम दिसणे अजून बाकी आहे. मागील वर्षी महागाई मोठ्या प्रमाणात वाढल्याने ग्राहकांची क्रयशक्ती कमी झाली आहे. तसेच करोना संकटामुळे कुटुंबांकडील आर्थिक गंगाजळीही कमी झाली आहे. असे असले तरी सरकारकडून भांडवली खर्चात वाढ झाली आहे. वस्तूंचे कमी होणारे भाव आणि कर्ज वितरणातील वाढ याचा फायदा आगामी काळात गुंतवणुकीला होईल, असे फिचने म्हटले आहे.

# महागाईविरोधात अर्धी लढाई अद्याप बाकी -रिझर्व्ह बँक

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई:** केवळ निम्मेच काम फत्ते झाले आहे, महागाई दर अपेक्षित लक्ष्याच्या आत आणण्याची निम्मी लढाई अद्याप लढली जायची आहे, असे मत रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी जूनमध्ये झालेल्या पतधोरण समितीच्या बैठकीत व्यक्त केले आणि समितीतील इतर पाच सदस्यांसह व्याजदरात कोणताही बदल न करण्याच्या बाजूने कौल दिला.

गव्हर्नर दास यांच्या अध्यक्षतेखालील पतधोरण समितीच्या (एमपीसी) ६ ते ८ जून या कालावधीत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त गुरुवारी प्रसिद्ध करण्यात आले. त्यानुसार, भारताच्या अर्थव्यवस्थेच्या मूलभूत बाबींमध्ये सुदृढता दिसून येत आहे आणि विकासाच्या शक्यताही व्यापक बनण्यासह त्यात सातत्याने सुधार दिसत आहे, असेही दास यांनी मत व्यक्त केले. जूनमधील सलग दुसऱ्यांदा द्विमासिक आढावा बैठकीत रेपो दर एमपीसीने अपरिवर्तित ठेवला.

महागाई कमी झाली असली तरी, महागाईविरुद्धचा लढा अजून संपलेला नाही. विकसित होत असलेल्या महागाई-वाढीच्या दृष्टिकोनाचे दूरदर्शी मूल्यमापन करणे आवश्यक आहे आणि परिस्थिती उद्भवल्यास कारवाई करण्यास कायम सज्ज राहणे आवश्यक आहे, असा त्यांनी या बैठकीत सावध इशारा दिल्याचे इतिवृत्त सांगते.

# नफावसुलीने सेन्सेक्स-निफ्टीत घसरण

**मुंबई:** ऐतिहासिक उच्चांकी पातळीला सर करणाऱ्या दोन दिवसांच्या तेजीनंतर काहीशी विश्रांती म्हणून आणि अमेरिकेतील आणि युरोपीय बाजाराचा नकारात्मक कल पाहता भाव वधारलेल्या समभागांमध्ये झालेल्या नफावसुलीने गुरुवारच्या अस्थिर व्यवहाराची अखेर मुख्य निर्देशांकांच्या घसरणीने झाली.

सेन्सेक्स गुरुवारचे बाजारातील व्यवहार थंडावले तेव्हा २८४.२६ अंश घसरणीसह, ६३,२३८.८९ वर स्थिरावला. सेन्सेक्समधील ३० पैकी तब्बल २० समभाग घसरणीत राहिले. सत्रारंभीच्या व्यवहारांत मात्र सेन्सेक्सने ६३,६०१.७१ अशा दिवसांतर्गत व्यवहारातील नवीन विक्रमी शिखराला गवसणी घातली.




हे पत्र **मुद्रक आणि प्रकाशक विरेंद्र विद्याधर रानडे** यांनी मालक, दि इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - दि इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी लोकमत, प्लॉट नं. १९२, २०७ आणि २०८, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, बुटीबोरी, नागपूर-४४११०८ येथे छापून प्लॉट. नं. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, अंबाझरी ले-आऊट, अंबाझरी, नागपूर-४४००१० येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी क्रमांक : २२३०४२१, २२३६८९७, फॅक्स क्रमांक : २२३६९८६. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी क्रमांक : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. दूरध्वनी : ०२०-६७२४१०००, फॅक्स : ०२०६७२४११४७. ■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : देवेंद्र गावंडे*** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Loksatta, RNI. No. 54743/92, Dated 30-4-92.
© दि. इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.
epaper.loksatta.com